साप्ताहिक

# माणूस

दीड रुपया


१९ जुन ८२



## ८ चेंडूत ३ बळी

रवीशास्त्री

## न संपलेली मुक्त संगीत चर्चा





## ज्वलंत विषयाला सरळ भिडण्याचं नाकारणारा सागर सरहद्दींचा 'बाजार'

"रिझर्व्ह बँकेने अलिकडे स्वीकारलेल्या कर्जविषयक धोरणामुळे अवजड उद्योगधंदे धोक्यात आलेले आहेत. वेगवेगळ्या कारखान्यांच्या गुदामात ट्रॅक्टर्स, डिझेल इंजिन्स यांचे साठे वाढताहेत. अशावेळी रास्त भावाच्या मागणीसाठी किसानांनी जर शंभरेक दिवस या वस्तुंची खरेदी करायची नाही असे ठरविले तर ?"........

इकडे महाराष्ट्रातील वृत्तपत्रे 'शरद जोशी संपले' अशा समजुतीत वावरत असतानाच, तिकडे पंजाबात, वरीलसारखे विचार सभासभातून व्यक्त करून हजारो किसानांची शक्ती ते आपल्यामागे उभी करीत आहेत.

तीन दिवस मुक्काम....खन्ना अधिवेशन.

दिनांक ३१ मे–मानसा (जि. भटिंडा)

दिनांक १ जून–नवा शहर ( जि. जालंधर )

दिनांक २ जून–फिरोजपूर

दिनांक ३ जून–गोविंदबालसाहेबा (जि. लुधियाना)

या दौऱ्याचा वृत्तांत

पुढील अंकापासून क्रमशः

# शरद जोशींबरोबर....पंजाबात

# शिवाय....

सत्तेवर आल्यानंतर
बंगालच्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या
व्यक्तिमत्वात झालेले बदल टिपणारी खास वार्तापत्रे

# लाल राज्यात सात दिवस

निखिल वागळे

जुलै अखेर या दोन्ही लेखमाला 'माणूस' मधून येत राहणार असल्याने एकाही आठवड्याचा अंक चुकवता येण्यासारखा नाही.

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : तिसरा

१९ जून १९८२

किंमत : दीड रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४ ३४५९

मुखपृष्ठावरील छायाचित्रे

१. रवी शास्त्री

२. 'महाराष्ट्र हेरल्ड'चे संपादक श्री.वाघ, 'गानवर्धन' या संस्थेचे प्रमुख श्री. कृ. गो. धर्माधिकारी व प्रा. सगोराम.

३. 'बाजार'मध्ये सुप्रिया पाठक, स्मिता पाटील.


# जन्मशताब्दी : एका आधुनिक चार्वाकाची

पुण्यात जूनच्या पहिल्या आठवड्यात संरक्षणतज्ज्ञांचे एक चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात आसाममधील अस्थिरतेकडे लोकांचे लक्ष वेधण्यात आले. पाकिस्तान आणि चीन या बाह्य शत्रूंपासून जेवढा धोका आपल्याला आहे, त्यापेक्षाही आसाम आणि लगतच्या राज्यांतील अस्थिरतेमुळे निर्माण होणारा धोका जास्त गंभीर आहे, असा इशाराही या चर्चासत्रात संरक्षणतज्ज्ञांनी दिलेला आहे.

याच संदर्भात, चर्चासत्रात अशी माहिती देण्यात आली की, इंडोनेशियाच्या शालेय पाठ्यपुस्तकात अंदमान-निकोबार ही बेटे इंडोनेशियाची आहेत असे दाखवले जाते. भारत सरकारने याबद्दल आक्षेप घेतला आहे, अशी काही माहिती मात्र चर्चासत्रात पुढे आली नाही.

उद्या फॉकलंडप्रमाणे काही वाद निर्माण झाला आणि युद्ध भडकले तर आपली बाजू आपण कशी सिद्ध करणार आहोत ?

मूर बेटाबाबतचा वाद गेल्याच वर्षी बांगलादेशाने माजवला होता !

इंडोनेशिया असे काही करणारच नाही याची शाश्वती काय ? सबंध बंगालचा उपसागर आपलाच आहे, असा दावा, मलेशियाचे पंतप्रधान टुंकु अब्दुल रेहमान यांनी पूर्वीच करून ठेवलेला आहे.

तेव्हा अंदमान-निकोबार व इतर बेटे यांचे भारताशी असलेले नाते यापुढे केवळ राजकीय-संरक्षणात्मक पातळीवर किंवा आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित न ठेवता, सांस्कृतिकदृष्ट्या हा भाग आपण भारताच्या, भारतीय जनतेच्या अधिक जवळ आणण्याचा प्रयत्न करायला हवा.

आसाम हा तर अंदमानप्रमाणे मूळ भूमीपासून अलग नसलेला, भारताचा अविभाज्य भाग आहे. तरीपण सांस्कृतिक-धार्मिकदृष्ट्या तो भारताशी समरस न झाल्याने, राजकीय आर्थिकदृष्ट्याही तो तुटलेला व दुर्लक्षित राहिला. काश्मीर वाचवण्यासाठी पं. नेहरूंनी किती आटापिटा केला ? आजही काश्मीरशी आपली अस्मिता जोडली गेलेली आहे. पण काश्मीरपेक्षा दसपट मोठा व महत्त्वाचा असलेला आसाम मात्र शत्रूच्या घशात चाललेला असताना, आपण, आपले सरकार निद्रिस्त राहिलो. कारण आसामचे उर्वरित भारताशी सांस्कृतिक-धार्मिक पातळीवर तसे संबंधच आजवर कमी आले.

आपली यात्रेची ठिकाणे सगळी उत्तरप्रदेशातली, हिमालयातली. दक्षिणेकडचे रामेश्वर-कन्याकुमारीही आपल्याला जवळचे वाटते. पण शतकानुशतके जेथे भारतीय यात्रेकरू जाताहेत, असे एकही यात्रास्थान आसामात नाही. म्हणून आसाम भारतात राहिला काय, शत्रूने बळकावला काय किंवा फुटून तो अलग झाला काय, भारतीयांना याचे सुखदु:ख आज तरी सारखेच आहे.

चीनी आक्रमणाच्या वेळी आसामवर पाणी सोडायची नेहरूंनी तयारी ठेवली नव्हती का ?

अशीच स्थिती उद्या अंदमान-निकोबार बेटांची होणार नाही कशावरून ?

म्हणून सर्व भारतीयांचे अंदमान हे एक नवे यात्रास्थान, स्फूर्तिस्थान व्हायला हवे.

सर्वप्रथम जेथे स्वातंत्र्य अवतरले, १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच जो भारतीय भूभाग सर्वप्रथम स्वतंत्र झाला, तो ही समुद्रवलयांकित भूमी. १८५७ पासूनच्या असंख्य स्वातंत्र्यवीरांचे, भारत स्वतंत्र व्हावा म्हणून सशस्त्र मार्गाचा अवलंब करणाऱ्या सहस्रावधी क्रांतिकारकांचे हे तपस्थान. पं. नेहरूंनी स्वातंत्र्य मिळाल्यावर म्हटले होते की, भाक्रा-नानगल हीच आपली नवी तीर्थक्षेत्रे व्हायला हवीत. पण अजून तरी तसे काही झालेले दिसत नाही. दिसणारही नाही. साबरमतीचा आश्रम तीर्थाचे ठिकाण म्हणून लोक मानतील. जेथे पं. नेहरूंना व इतर काँग्रेसनेत्यांना डाबून ठेवले होते, तो अहमदनगरचा किल्लाही यात्रास्थान ठरू शकेल. कारण देशासाठी केलेल्या त्यागाची ही प्रतीके आहेत. अंदमान हे सर्वोच्च प्रतीक. काँग्रेसवाल्यांनी खोटा इतिहास जनतेच्या गळी उतरवण्याचा गेल्या ५०-६० वर्षे कितीही प्रयत्न केला असला,

तरी आपले स्वातंत्र्य केवळ अहिंसेने मिळालेले नाही हे सत्य आता लोकांना हळूहळू पटत चालले आहे. क्रांतीकारकांच्या त्यागकथा, त्यांचे शौर्य आणि हौतात्म्य यांच्या गाथा घरोघर पोचत आहेत, जनतेच्या अंतःकरणात त्यांच्याविषयी आदर आणि भक्तिभाव फुलत आहे. राज्यकर्त्यांनी कितीही दडपले तरी सत्य आज नाही उद्या, मान्यता पावल्याशिवाय कसे राहील ?

¤

पोर्टब्लेअर. दि. २८ मे १९८२

अंदमान-निकोबार द्वीपसमूहाची राजधानी पोर्टब्लेअर येथे सावरकर जन्मशताब्दी समारोह समितीच्या वतीने सेल्युलर जेलच्या १२३ नं. कोठडीतील सावरकरांच्या प्रतिमेला अध्यक्ष श्री. लक्ष्मण सिंह (भू. पू. संसद-सदस्य), उपाध्यक्ष श्रीमती जयदेवी व सचिव श्री. गोविंदराव हर्षे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून वर्षभराच्या होणाऱ्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. हा कार्यक्रम पोर्टब्लेअर स्थित सेल्युलर जेलमध्ये सकाळी ९ वा. संपन्न झाला.

श्री. पंडित (मानव विज्ञान विभागाचे डायरेक्टर), पी. टी. आय. चे श्री. मुजुमदार, लाइट ऑफ अंदमान या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक श्री. परशुराम, श्री. शरदचंद्र गुप्ते, विवेकानंद केंद्राचे जीवनव्रती श्री. नागभूषण, शासनाच्या वतीने श्री. आर. एस. बाली ( सचिव, समाजकल्याण विभाग ) इत्यादी मान्यवर मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित होती.

त्याच दिवशी सायंकाळी, शिक्षक प्रशिक्षण संस्थानच्या सभागृहात समितीच्या वतीने एक सभा आयोजित करण्यात आली. सभेची सुरुवात सावरकररचित 'जयोस्तुते श्री महन्मंगले' व 'सागरा प्राण तळमळला' या कवितांच्या हिंदी अनुवादाच्या सुस्वर पाठाने सौ. फाले यांनी केली.

अध्यक्षांच्या स्वागतानंतर स्थानीय कवी व कवयित्रीद्वारा सावरकरांच्या जीवनावर स्वरचित कविता-वाचन झाले. त्यानंतर समितीचे सचिव श्री. हर्षे वर्षभराच्या कार्यक्रमाची रूपरेखा सांगताना म्हणाले, 'जन्मशताब्दी समारोहाच्या अनुषंगाने वर्षभरात वक्तृत्वस्पर्धा, निबंधलेखनस्पर्धा, कवितावाचन (स्वरचित), चित्रकलास्पर्धा इत्यादी उपक्रम बाल, कुमार व कॉलेज विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात येतील.'

तदनंतर स्वातंत्र्यसैनिक श्री. बॅनर्जींनी सावरकरांच्या जीवनावर प्रकाश टाकला. श्री. पंडित आपल्या भाषणात म्हणाले, 'आपल्या जीवनसर्वस्वाचा होम करणाऱ्या सावरकरांनी ज्या चेतनेने प्रेरित होऊन देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात संपूर्ण कुटुंबाची आहुती दिली, ती प्रेरणा, ती चेतना आज लुप्त झाली आहे. त्या चेतनेचे पुनर्निर्माण हेच खरे कार्य ठरेल.'

श्री. शरदचंद्र गुप्ते आपल्या भाषणात म्हणाले, 'सावरकर केवळ स्वातंत्र्यसैनिकच नव्हते, तर एक समाजसुधारक होते.' रत्नागिरी येथे स्थानबद्ध असताना त्यांनी केलेल्या समाज सुधारणेच्या कार्याचा आढावा घेताना ते म्हणाले, 'अस्पृश्यता निवारणाचे फार मोठे कार्य सावरकरांनी पतितपावन मंदिराची स्थापना करून केले. दलित व हरिजनांना मंदिरात प्रवेश मिळावा, समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे, म्हणून त्यांनी हिरीरीने प्रयत्न केले. जे ते बोलत, ते ते आचरणात आणीत. सावरकर हिंदुत्वनिष्ठ होते; पण त्यांचा कर्मकांडावर विश्वास नव्हता. धर्मांतराला ते विरोध करीत. धर्मांतरित बंधूना परत आपल्यात आणण्यावर त्यांचा कटाक्ष असे. कारण सावरकरांचे स्पष्ट मत होते की, भारतात धर्मांतराचा अर्थ राष्ट्रांतर आहे.'

लाइट ऑफ अंदमानचे संपादक परशुराम आपल्या भाषणात म्हणाले की, सावरकरांच्या प्रयत्नामुळे आज अंदमान-निकोबार भारताचा भूभाग आहे. अंदमानमध्ये आर्यसमाजाच्या कार्याचा पाया अप्रत्यक्षपणे सावरकरांनी घातला. सेल्युलर जेलमधील वास्तव्यात कैद्यांना हिंदी त्यांनी शिकविले व जेलमध्ये त्या काळी असणाऱ्या कैद्यांना धर्मांतरित होण्यापासून वाचविले. त्याचे ऋण आम्ही कसे विसरणार ? सावरकरांचे विचार स्थानीय लोकापर्यंत पोहचवून त्यांचा या समितीच्या कामात सहयोग असावा अशी त्यांनी विनंती केली.

अध्यक्ष श्री. लक्ष्मणसिंह यांनी समितीतर्फे लवकरच एक पोहण्याची शर्यत आयोजित केली जाईल व विजेत्याला फिरती ढाल देण्यात येईल अशी घोषणा करून उपस्थितांना, वक्त्यांना व शासनाच्या सहयोगाबद्दल शासनाला धन्यवाद दिले.

कार्यक्रमाचे संचालन श्री. सेवाराम सेतिया, प्राध्यापक, गव्हर्नमेंट कॉलेज, पोर्टब्लेअर, यांनी केले.

¤

असे हे सत्य हळूहळू मान्यता पावत आहे आजवर दडपला गेलेला सशस्त्र क्रांतीप्रयत्नांचा इतिहास हळूहळू प्रकाशात येत आहे. या ज्वलंत इतिहासापासून स्फूर्ती घ्यावी असे भारतीय जनतेला वाटू लागलेले आहे.

अंदमानला स्थापन झालेल्या सावरकर जन्मशताब्दी समारोह समितीच्या पहिल्या बैठकीला पुण्याच्या 'एकता' मासिकाचे संपादक श्री. रामदास कळसकर हे उपस्थित होते. पूर्वी ते संघाचे प्रचारक होते व सध्याही मासिकाच्या संपादनाबरोबरच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांचे संघकार्यही चालू आहे; आणि एका दुर्धर रोगाशी सामनाही ! या सामन्याची वाच्यता नाही. जाहिरातबाजी नाही. अशी कार्यकर्ती माणसे जर अंदमानातील सावरकर-जन्मशताब्दी समारोह समितीमागे उभी असतील तर शासनाचे पाठबळ लाभो न लाभो, सावरकरांचे, भारतीय स्वातंत्र्यसमराचे एक भव्य स्मारक तेथे उभे राहणे अवघड नाही. हे स्मारक उभारण्यासाठी, उभारले गेल्यानंतर ते पाहण्यासाठी भारतीय मंडळी मग तेथे जाऊ लागतील, आज वेगळे वाटणारे, दूरचे वाटणारे हे बेट मग भारताचाच एक खराखुरा भाग होऊन जाईल. खरे तर सावरकरांची तीन ठिकाणी स्मारके या जन्मशताब्दीनिमित्त व्हायला हवीत. एक पूर्वकिनाऱ्यावर, अंदमानला – 'स्वातंत्र्यवीर' सावरकरांचे. दुसरे पश्चिम किनाऱ्यावर, रत्नागिरीला–जात्युच्छेदक-विज्ञानवादी–'हिंदू संघटक' सावरकरांचे आणि तिसरे मुंबईचे–'अखंड भारतवादी' सावरकरांचे. सावरकरांच्या जीवनाची ही तीन पर्वे आहेत; आणि या तीनही पर्वांत सावरकर हा एकाकी झुंज देणारा एक योद्धाच होता. आज त्यांचे 'जयोस्तुते' रेडिओ-टिव्हीवर प्रसंगोपात्त लागत असले तरी हे स्वातंत्र्यगीत जेव्हा त्यांना स्फुरले तेव्हा, एक माथेफिरू क्रांतिकारक, एक दहशतवादी, म्हणूनच त्यांची संभावना, त्या काळातल्या थोरामोठ्याकडून होत होती. ज्यावेळी त्यांनी रत्नागिरीत समाजसुधारणेची चळवळ

केली त्याही वेळी त्यांना अनुसरणारे हाताच्या बोटावर मोजता येण्याइतकेच होते. आणि शेवटच्या पर्वात तर काय ? सैनिकीकरणाचा, अखंड भारतप्रित्यर्थचा सगळा लढा म्हणजे प्रवाहाविरुद्धचे पोहणे. कुठली श्रद्धा त्याना हे अखंड संघर्षशील जीवन जगण्याचे बळ देत होती ? बरेचसे सावरकर बुद्धिनिष्ठ, तर्कवादी आहेत–एक आधुनिक चार्वाकच हा– आगरकरानंतरचा; पण हिंदू समाजात पुनरुत्थानाची एक सुप्त शक्ती आहे,आजवर अनेकदा पराभूत होऊनही हा समाज पुन्हा पुन्हा वर उठलेला समाज आहे, अशी त्याची एक मनोमन श्रद्धा होती. 'हिंदू अश्वत्थाचे मी एक सळसळते पान आहे,' अशी त्यांची स्वत:विषयीची भावना होती. ही भावना, ही श्रद्धा त्याना बळ पुरवीत होती, एकाकी अवस्थेतही झुजत राहण्याची.

सावरकराची ही श्रद्धा अगदीच अंध:श्रद्धा नसावी.

या अश्वत्थ–भावनेलाही 'लब्धप्रकाश इतिहास निसर्गमानाचा' काही आधार लाभलेला असावा.

कारण तशा घटना अवती-भवती खूप घडत आहेत.

अदमानात स्थापन झालेली सावरकर जन्मशताब्दी समारोह समिती ही अशा अनेक घटनापैकी एक.

–श्री. ग. मा.

मुंबई वार्ता

# मुंबईतील वाहतूक आणि उपायुक्त पसरिचा

गर्दी ही कुठल्याही महानगराला भेडसावणारी अपरिहार्य समस्या असते. वाढते उद्योगधदे, रोजगाराच्या संधी, महत्त्वाचं व्यापारी उलाढालीचं केन्द्र या साऱ्यामध्ये गर्दी मुळी अध्याहृतच असते. त्यातही दिल्लीसारख प्रशस्त पसरण्यासाठी वाव असलेलं मोकळं-ढाकळं शहर असेल, तर गोष्ट वेगळी. तिथे गर्दीचा एवढा बाऊ वाटत नाही; पण मुबईची गोष्टच वेगळी. सात बेटं एकमेकाना जोडून केलेलं शहर. समुद्र माग हटवून, खाड्या बुजवून आणि उंच इमारती बाधून, जास्तीत जास्त जमीन मिळवण्याची केलेली अर्धसफल धडपड. जिथे इमारतीना जागा मिळायची मारामार, तिथे मैदानं किंवा प्रशस्त रस्ते याची तर गोष्टच न केलेली बरी. सगळेच रस्ते अगदी गिरगावातले गल्ली–बोळ नाहीत खरे, पण अभिमानान मिरवावेत असे दिल्लीसारखे शानदार रस्तेही मुबईकडे नाहीत. दादर, गिरगाव, फोर्टसारखा कुठलाही भाग घ्या. तिन्हीत्रिकाळ गजबज आणि अडलेल्या वाहनाची राग. विपुल वाहनं, चिचोळे रस्ते, अनेक क्रॉसिंग्ज आणि वळणं, या साऱ्यामुळं रस्त्यावरचा प्रवास म्हणजे बेळखाऊ चैनच वाटते जणी सकाळ– सध्याकाळी, गर्दीच्या वेळी महमदीअली रोडवरच्या गर्दीतून वाट काढत क्रॉफर्ड मार्केटपासून व्ही. टी. ला जायलासुद्धा तास–तासभर लागू शकतो. उखडलेले रस्ते, न संपणारी आणि पडणारी बाधकामं या राखीव अडचणी आहेतच.

एकूण काय, मुबईची वाहतूक ही मुंबईच्या अन्य वैशिष्ट्याप्रमाणेच एक वैशिष्ट्यपूर्ण समस्या आहे आणि ती साधीसुधी नसून प्रत्येक मुबईकराला भेडसावणारी, (जिव्हाळ्याची) इत्यादी समस्या आहे. तशात जवळ येणारा पावसाळा म्हणजे वाहतुकीचं आरोग्य बिघडायची हमी. वाहतुकीच्या या समस्याबाबत तत्संबधित अधिकाऱ्याना काय म्हणायचंय ते समजून घ्यावं, म्हणून श्री. पी. एस. पसरिचाना भेटायचं ठरवल. पसरिचा पोलीस-उपायुक्त (वाहतूक) या स्थानावर आहेत आणि गेली तीन वर्षं मुंबईचे वाहतूकप्रमुख आहेत. त्याच्या मुलाखतीतून मुबईच्या वाहतूक समस्या आणि त्या सोडवण्यासाठी सरकारी पातळीवरून काय उपाय योजले जाताहेत याची पुष्कळशी कल्पना येते.

अपेक्षेप्रमाणेच जागेची कमतरता ही प्रमुख अडचण आहे. मुबईचं क्षेत्रफळ अवघं ४३८ चौरस किलोमीटर आहे. इथल्या कुठल्याही दोन ठिकाणामधलं अधिकात अधिक सरळ अंतर फक्त ४५ किलोमीटर आहे आणि एकूण रस्त्यांची लाबी १४१० किलोमीटर भरते. हे शहर किती गजबजतं आहे, हे दाखवण्यासाठी ही आकडेवारी उद्बोधक ठरावी. इथली लोकसंख्या ९० लाखाच्या घरात आहे. याशिवाय कायम इथेच वास्तव्य न करणारी अशी – फ्लोटिंग पॉप्युलेशनही बरीच आहे. फेरीवाले सुमारे २ लाख आहेत, आणि ३५ लाख मुबईकर झोपडपट्टीतून राहतात. सगळे उद्योगधंदे आणि व्यापार–व्यवहार इथे एकवटलेले आहेत. ५५ कापड-गिरण्या आहेत. बंदरं आहेत. शहराच्या अगदी मध्यवर्ती गजबजत्या भागात फक्त ४ चौरस किलोमीटरच्या भागात १६०० वाहतूक कंपन्याची कार्यालयं आहेत. इथल्या वाहनाची सख्या ४ लाखांच्या आसपास आहे आणि मुबईच्या रस्त्यावर दररोज ७० नवीन वाहनाची भर पडत असते. ३०० नवी कुटुंबं आणि २५०० माणसं मुंबईत रोजच येत असतात.

१९७० साली मुबईची लोकसंख्या ६१ लाख होती. रस्त्यांची लांबी १००८ किलोमीटर होती, तर वाहनांची संख्या १ लाख ७० हजार होती. १९८० साली लोकसंख्या ८२ लाख झाली. रस्त्याची लांबी १४१० किलोमीटर्स एवढी वाढली, तर वाहनसंख्या ३ लाख ७५ हजार झाली. या शतकाच्या अखेरीपर्यंत म्हणजे २००० साली मुंबईची लोकसंख्या १ कोटी ३५ लाख होईल असा अदाज आहे आणि वाहनांची संख्या १५ लाख. या आकडेवारीवरून हे सहजच लक्षात येईल की, वाहनसंख्या आणि लोकसख्या, रस्त्यापेक्षा बऱ्याच पुढे धावताहेत !

बी. इ. एस. टी. च्या बसनं प्रवास करणंही कष्टाचं झालं आहे. कारण व्यवस्थित शिस्तबद्ध रांगा झपाट्यानं नाहीशा होताहेत. प्रवासी रांगा लावेनासे झाले आहेत. कारण ज्या फुटपाथवर रांगा लावायच्या, त्या फुटपाथांवर झपाट्यानं अडथळे निर्माण होत असतात. अगोदरच फुटपाथ अरुंद. त्यातही त्यावर झोपडपट्टी, फेरीवाले यांचं अतिक्रमण झालेलं. भिकाऱ्यानी मांडलेलं ठाण, उखडलेले रस्ते. कधी बाधकामासाठी, कधी विद्युतसंबंधी कामासाठी, कधी टेलिफोनसाठी, तर कधी

ड्रेनेजसाठी. त्यामुळे रांगा रस्त्यावर येतात. बसेसही मध्येच कुठे तरी थाबतात. त्यातून मागच्या वाहतुकीचा खोळंबा होतो हे निराळंच.

वाहतुकीच्या या समस्यांना तोंड देण्यासाठी सिलेक्टिव पार्किंग–नो पार्किंगच्या व्यवस्था हा एक महत्त्वाचा उपाय आहे. ठराविक वाहनं, ठराविक दिवशी, ठराविक वेळात, ठराविक ठिकाणी उभी करण्याची परवानगी देणं किंवा तशी बंदी करणं, यातून गर्दीचं योग्य वाटप होतं ! वाहतूकविभागाची साधन–सामुग्री वाहतुकीच्या पसाऱ्याच्या मानानं मर्यादित आहे. वाहतूकनियमनासाठी रोज साधारण ७०० जणाचा कर्मचारीवर्ग उपलब्ध असतो. त्यांच्याकडे २८ गाडया १५० फटफटया आणि १२ क्रेन्स आहेत.

मुंबईची रचना एखाद्या रिबिनीसारखी चिंचोळी आहे. त्यातच मुंबईची पुष्कळशी कार्यालयं दक्षिण मुंबईत एकवटलेली आहेत. उत्तर मुंबई ही बरीचशी निवासस्थानांची आहे. त्यामुळं मुंबईची वाहतूक बरीचशी एकमार्गी, एकदिशेची आहे. सकाळी कानाकोपऱ्यातून माणसं आणून दक्षिण मुंबईत रिचवली जातात आणि संध्याकाळी ती तिथून परत ओतली जातात ! कांदा–बटाटाबाजार, कापडबाजार इत्यादी मुंबईतले गजबजते भाग, आपल्या मूळ जागा सोडून अन्यत्र हलवता येतील असं सध्या तरी दिसत नाही. या सगळ्या गोष्टींचा अंदाज घेऊन विल्बर स्मिथ या परकीय सल्लागारानं १९६० मध्येच भाकित केलं होतं की, योग्य काळजी घेतली नाही, तर १९८० पर्यंत इथली वाहतूक समस्या हाताबाहेर जाईल, आणि ते आज जाणवतंच आहे. अॅलन व्हूरीज अॅंड असोसिएटस् या अमेरिकन कंपनीनं नुकताच इथल्या वाहतूकसमस्याचा अभ्यास केला आणि आपल्या अभ्यासाचे, सूचनांचे ३ खंड सादर केले. त्यामध्ये मुख्यतः नवे वन–वे, स्काय–वॉक्स, फूटब्रिज, सब–वे, को–ऑर्डिनेटेड सिग्नल्स इत्यादींचा समावेश आहे.

अॅलन व्हूरीज अॅंड असोसिएटस्च्या या सूचना बऱ्याच खर्चिक आहेत आणि त्या सगळ्याच जशाच्या तशा प्रत्यक्षात आणणं शक्य नाही. उपायुक्त स्वतः पसरिचांचेही या संदर्भात बरेच बेत आहेत. हळूहळू संपूर्ण दक्षिण मुंबईची वाहतूकच एकमार्गी करावी अशी त्यांची एक मूलगामी योजना आहे आणि पायऱ्या–पायऱ्यांनी वाहतूकविभाग ती प्रत्यक्षात आणतो आहे. शिवाय विभागाच्या कामकाजात अंतर्गत कार्यक्षमता वाढावी म्हणूनही त्यांनी काही नव्या कल्पना काढल्या आहेत. वाहतूकसंबंधी गुन्हे आता अधिक तत्परतेनं शोधता येतात. वेगमर्यादेचा भंग करण्याचे ७० प्रकार रडार एका तासात शोधून काढू शकतो. १९७७ साली वाहतूकनियमांचा भंग केल्याचे ३,७०,९३५ प्रकार शोधून काढले गेले आणि दंडापोटी २४,४४,२३३ रुपये वसूल केले गेले. तर १९८० साली ७,२०,५९३ गुन्हे शोधले गेले आणि त्यांचा दंड म्हणून ८५,५०,५०५ रुपये एवढी रक्कम वसूल केली गेली. खेरीज मुंबईतल्या काही मोक्याच्या ठिकाणी खास ट्रॅफिक बूथ्स् बसवण्यात आलेले आहेत. या बूथ्स्मधून वाहतूकनियंत्रण तर होतंच; पण त्याबरोबरच प्रवाशांना मार्गदर्शनही होतं. टाईमटेबल्स, प्रथमोपचाराची साधनं यासारखं साहित्यही या बूथ्समध्ये उपलब्ध असतं. अशा प्रकारचे बूथ्स व्ही. टी., चर्चगेट, बॉम्बे सेन्ट्रल, दादर, विमानतळ इत्यादी ठिकाणी बसवले गेले आहेत. याबरोबरच सहार विमानतळावर परदेशाहून येणाऱ्यांची फसवणूक होऊ नये, म्हणून टॅक्सीचं ठराविक अंतरापर्यंत ठराविक भाडं ठरवून देण्याची कल्पनाही पसरिचाची. वॉटर सेफ्टी पॅट्रोल हीही अशीच एक योजना. खरं म्हणजे ती काही पूर्णपणे वाहतूक विभागाच्या अखत्यारीतली नाही; पण निःसंशय उपयोगाची. या योजनेखाली, विशेषतः उत्सवाच्या दिवसात समुद्रकिनाऱ्यावर निष्णात पोहोणाऱ्यांचं पथक गस्त घालतं आणि त्यामुळं अडचणीत सापडणाराना तात्काळ मदत उपलब्ध होऊ शकते. मादाम कामा रोडवरच्या एका छोटया बागेमध्ये अशी खेळणी ठेवली आहेत की, त्यातून मुलांना वाहतूक आणि वाहतूकनियंत्रणविषयक शिक्षण देता येईल.

अनेक देशांमधल्या वाहतुकीच्या अभ्यासानंतर पसरिचांनी काढलेला निष्कर्ष हा त्याच्या सगळ्या योजनामधला गाभा आहे. मुंबईसारख्या चिंचोळ्या रस्त्यावर एकमार्गी वाहतूक असणंच सोयीचं पडेल, असं त्यांच मत बनलं आहे. पादचारी आणि बसेससाठी वेगळे आणि बाकीच्या वाहतुकीसाठी वेगळे मार्ग असावेत. व्ही. टी. स्टेशनजवळ पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणं सुलभ व्हावं म्हणून व्ही. टी. स्टेशन आणि भाटिया बागेमधला रस्ता वाहनांना बंद केला जावा (हा बदल घडून आला आहे), चर्चगेटस्टेशनजवळ वाहनांच्या डावी–उजवीकडे वळण्यावर बंदी घालण्यात यावी–ज्यामुळे पादचाऱ्यांची सोय होईल. मुंबईच्या अगदी मध्यभागी पोचणारे महात्मा गांधी रोड आणि हजारीमल सोमाणी रोड, हे फक्त दक्षिणेकडे वाहनं नेतील, तर मेयो रोड केवळ उत्तरेकडे वाहनं नेईल. पसरिचांच्या गुतागुतीच्या योजनेमधले हे केवळ काही महत्त्वाचे तपशील झाले. हे बदल क्रमशः घडून येताहेत आणि त्यांचा फायदा निश्चितच दिसून येतो आहे, असा पसरिचांचा दावा आहे. १९७८ साली अपघातांचं प्रमाण २४३०८ होतं, ते १९८१ साली २३१६१ वर आलं आहे आणि या योजना राबवल्या, तर अधिकही कमी होऊ शकेल.

वरकरणी पाहू गेलं, तर वाहतूक हा विषय किती तरी रुक्ष आणि साधा; पण प्रत्यक्षात मात्र तो स्वतः वाहतुकीइतकाच गुंतागुंतीचा आणि वळणा–वळणाचा आहे. वाहतूकसमस्या बहुविध आहेत. पादचाऱ्यांची सोय, सुरक्षितता, वाहनांचा जलद प्रवास, इंधनाची बचत, वेळेची बचत, वाहतुकीनं होणारं प्रदूषण आणि रस्त्याच्या बाजूला राहणाऱ्या नागरिकांवर त्याचे होणारे परिणाम, त्यांच्या सोयी–गैरसोयी, गुतागुंतीच्या क्रॉसिंग्जमध्ये वाहनांची सुरक्षितता या साऱ्याबरोबर कारपार्किंग, पादचाऱ्यांसाठी बेटं आणि रस्त्याचं सौंदर्य, प्रसन्नता टिकवण्याची आवश्यकता, त्यासाठी छोटयाशा बागा या साऱ्यांचा एकसंध विचार म्हणजे वाहतूकनियंत्रण. तरुण, तडफदार पसरिचांशी बोलताना अशी भावना आली की, जी सरकारी अधिकाऱ्यांशी बोलताना क्वचितच होते. नाही तर पादचारी आणि वाहनधारक यांच्या अडचणी सरकारी पातळीवर तत्त्वतः मान्य झालेल्याच असतात; पण त्या सोडवण्यासाठी नव्या–नव्या कल्पना करून त्या प्रत्यक्षात आणल्या जातात आणि सरकारी यंत्रणांची अवाढव्य चक्रंही त्यासाठी फिरू शकतात, हे पसरिचांनी लक्षात आणून दिलं.

–ललिता बर्वे

दलित साहित्य संमेलन !

# प्रतिसाद कमी का?

४।५।६ जूनला नगरला भारतीय दलित साहित्य समेलन पार पडले. संमेलनाला एकूण महाराष्ट्रातून आणि खुद्द नगर शहरातून मिळालेला प्रतिसाद अतिशय 'पुअर' होता. सयोजनातला गोंधळ, S T ची भाडेवाढ किंवा सुट्टया संपत आल्या इत्यादी कारणे नक्कीच या निराशाजनक प्रतिसादामागे नव्हती; पण समेलनाच्या या स्वरूपाबद्दल मात्र खूपच गंभीरपणाने विचार करावा लागणार आहे. 'नगाला नग' म्हणून संमेलन भरवले, आता भरून काढू कसर पुढच्या संमेलनाला' असा विचार करून चालणार नाही.

अलीकडे साहित्य संमेलनाची संख्या वाढू लागली आहे. जिल्हा संमेलने, विभागवार संमेलने, ग्रामीण साहित्य संमेलन, ख्रिस्ती संमेलन, आता आदिवासी साहित्य समेलनही होऊ लागले आहे. रायपूर संमेलन, लेखकाची पारितोषिके या संदर्भात 'साहित्य आणि समाज' या विषयावरची चर्चा अधिकाधिक स्पष्टतेने होऊ लागली आहे. लेखक आणि शासनाच्या संबंधासारखी चर्चा अनेक अंगानी पुढे येत आहे. निखळ कलावादीही या मैदानात उतरले आहेत, आक्रमक झाले आहेत. या चर्चेत एक महत्त्वाची भूमिका दलित साहित्याच्या चळवळीने बजावली आहे. दलित साहित्याने कलावादी समीक्षेला तडे दिले होते, आव्हान निर्माण केले होते आणि त्यामुळे प्रस्थापित साहित्याच्याच गोटात शासन–लेखक संबंधांसारखे वाद झडू लागले. या गोटातील लोकशाहीवादी लेखक वाचक–रसिकांनी वेगळी संमेलने भरविली आणि त्यामुळे दलित साहित्याच्या चळवळीलाही या सर्व प्रश्नांना पुन्हा उत्तरे द्यावी लागणार आहेत नगरच्या दलित साहित्य संमेलनाकडून या अपेक्षा होत्या आणि या अपेक्षाचा पूर्णत भंग झाला आहे नामांतराच्या प्रश्नाची आणि ठरावाच्या अंमलबजावणीची इंदिरा कॉंग्रेसने केलेली गोची, दिवसेंदिवस वाढत जाणारे जातीय अत्याचार, शहरी संघटित कामगारांपासून ग्रामीण असघटितांपर्यंत सर्वांच्याच लोकशाही हक्काची दिवसेंदिवस होत चाललेली बिकट अवस्था, निखळ कलावादी, भोंदू लाचार साहित्यिकांचे साहित्यिक जीवनात वाढू लागलेले प्राबल्य– या पार्श्वभूमीवर दलित साहित्य समेलन भरले होते हे समेलन जर बौद्धवादी साहित्यकाराचे किंवा केवळ आंबेडकरवादी साहित्यकाराचे असते तर वरील अपेक्षा ठेवल्याही नसत्या. ज्यांनी दलित साहित्याच्या चळवळीसबंधी काही मूलभूत माडणी केली आहे, असे रावसाहेब कसबे, बाबूराव बागूल, दया पवार आदी मडळी ज्या दलित साहित्य संसदेत आहेत त्यांच्यातर्फे हे समेलन भरले होते आणि म्हणून अपेक्षा होत्या; पण त्या अपेक्षाचा भंग झाला आहे !

समेलनात बऱ्याच विषयावर परिसंवाद झाले. सामाजिक ताणतणाव, ग्रामीण स्त्रीची कोंडी, संस्कृती ३॥ टक्क्याची असते का? ग्रामीण साहित्य, जनसाहित्य, दलित साहित्य आदी विषयाबरोबरच पुरोगामी पत्रकाराचे एक समेलनही झाले. ५।६ सन्माननीय वक्त्याचा अपवाद वगळता राणा भीमदेवी थाटात भाषणे करणाऱ्यांची संख्या अधिक होती. दलित चळवळीला, दलित साहित्याला पुढे नेणारी काही माडणी यामधून झाली नाही.

संमेलन–अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन होते. गुजरातमधील दोन दलित साहित्यिक, कर्नाटकातील एक वगळता अन्य कोणत्याही प्रांतातील साहित्यिक दिसले नाहीत किंवा संदेशांच्या यादीत अशा एकाही संघटनेचा संदेश वाचला गेला नाही. आज भारतातल्या प्रत्येक प्रांतात दलित साहित्याच्या नसल्या तरी जनवादी साहित्याच्या मोठ्या चळवळी उभ्या रहात आहेत. कलावादी समीक्षेला प्रश्न करणारी जनवादी साहित्यसमीक्षाही पुढे येत आहे. दिल्लीमध्ये काही महिन्यापूर्वी जनवादी लेखक समीक्षकांनी एक जाहीरनामाही प्रसिद्ध केला आहे. या घटनांची नोंदही या 'अ. भा.' संमेलनाने घेतली नाही. रावसाहेब कसबेंच्या भाषणात दलित साहित्याची चळवळ स्वतः:च्या दोस्तशक्तीचा शोध घेत आहे असे म्हटले आहे. हिंदीतील जनवादी साहित्यकारानी साहित्यविषयक चळवळीत समीक्षा किंवा लेखनसदर्भात अतिशय मोलाची भर घातली आहे दलित साहित्याची खरीखुरी दोस्तशक्ती या जनवादी परंपरेत आहे; पण या प्रवाहाची नोंदही हे संमेलन घेऊ शकले नाही साहित्यविषयक प्रश्न हे सामाजिक, राजकीय कोंडीतून तयार होत असतात. ही कोंडी केवळ एका प्रातात होत नसते. कोंडी करणाऱ्या शक्ती राष्ट्रीय पातळीवरच्या असतात आणि म्हणून ही कोंडी फोडणारे प्रवाह राष्ट्रीय पातळीवर निर्माण व्हावे लागतात. अशा प्रवाहाशी नाते निर्माण करावे लागते; पण तशा तऱ्हेचा विचार, सूतोवाच, इच्छा दिसून आली नाही.

मूलभूत आर्थिक, राजकीय, सामाजिक बदलाशी बांधील असलेल्या दलित साहित्य संमेलनाचे स्वरूप केवळ जत्रा, एकत्र येणे अशा स्वरूपाचे नसावे. कारण मग जत्राच भरवायची तर त्यात हवसे, नवसे आणि गवसेही आले हे समेलन दलित साहित्य चळवळीला पुढे नेणारे, प्रत्येक पाऊल पक्के रोवत पुढे नेणारे, मागच्या अनुभवाचे परखड आत्मपरीक्षण करणारे असले पाहिजे आणि जर असे स्वरूप राहिले नाही तर दलित साहित्य समेलनात आणि अन्य मराठी साहित्य समेलनात काहीही फरक रहाणार नाही. नगरमध्ये तसेच काहीसे घडले असे वाटते प्रमाण कमी असेल; पण घडले आणि म्हणूनच अतिशय परखड आत्मपरीक्षणाची वेळ दलित साहित्य चळवळीवर आली आहे असे वाटते.

एक गोष्ट खरी आहे की, दलित साहित्याची चळवळ ही दलित चळवळीचा भाग असल्याने, आज दलित चळवळीला जे स्वरूप आले आहे, त्याचे प्रतिबिंब दलित साहित्यचळवळीत उमटणे सहाजिक आहे पँथर्सच्या वेगवेगळ्या गटातील कार्यकर्त्यांची, नेत्यांची अनुपस्थिती या समेलनाला होती. दलित साहित्याबद्दल मित्रत्वाचे नाते सागणारे काही साहित्यिक, विचारवंतही संमेलनास नव्हते.

या कारणांचा दलित साहित्य संसदेने शोध घ्यायला हवा. दलित साहित्यचळवळीवर बाहेरून होणारे हल्ले आणि दलितांच्या वेगवेगळ्या गटांमुळे होणारी अंतर्गत कोंडी यामध्ये इंदिरा कांग्रेसचे विचारवंत आणि नेते यापेक्षाही चळवळीशी बांधिलकी मानणारे डावेच जवळचे मित्र रहाणार आहेत. हल्ले आणि कोंडीला तोंड देताना, त्यांची दिशा शोधताना इंदिरा कांग्रेसप्रणीत विचारवंत नक्कीच उपयोगी पडणार नाहीत दलितांवरच्या अत्याचाराला जेवढे जातीयवादी जबाबदार आहेत तेवढाच जातीयवादाने पोखरलेला इंदिरा कांग्रेस पक्षही जबाबदार आहे, याची नोंद दलित साहित्याच्या चळवळीने घ्यायला हवी. संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्षीय भाषणात माधवराव बागलांनी यशवंतराव चव्हाणांचे कौतुक केले. हा 'कौतुकाचा' उतारा मुद्दाम जसाच्या तसा देत आहे.

'या वेळी यशवंतरावजी मुख्यमंत्री असते तर ही मागणी (नामांतराची) खात्रीने मान्य झाली असती. यशवंतरावजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी भारतातील सर्व राज्यांच्याअगोदर नवदीक्षित बौद्धांना व अस्पृश्यांना सवलती देण्याचे जाहीर केले यशवंतरावजींची पद दलितांच्या समस्या सोडविण्याची मूळ दृष्टी, तळमळ व शुद्ध हेतू पाहूनच भारतीय पक्षनेत्याने व नवदीक्षित बौद्ध जनतेने नागपूर येथे १६ डिसेंबर १९६० रोजी दीक्षाभूमीमैदानावर खासदार दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड सत्कार केला. ती भूमीही पुढे त्यांच्या मालकीची झाली.

यशवंतरावांनी गुलामी पद्धतीची महार वतनी पद्धत रद्द केली व आंबेडकरांच्या ह्यातीत त्यांना यश मिळाले नाही ते यशवंतरावांनी आपल्या आमदानीत अस्पृश्यांच्या पदरात टाकले. त्यांनी त्या जमिनी रयतावा करून त्यांच्याच मालकीत ठेवल्या. त्यामुळे त्यांच्या इच्छेप्रमाणे त्या त्यांना विकता येतील अगर आपल्याकडे ठेवता येतील. यशवंतरावजींनी आंबेडकरजयंतीची सुट्टी दिली. पार्लमेंटसमोर आंबेडकरांचा स्टॅच्यू (पुतळा) उभा करणाऱ्या समितीचे ते स्वत: अध्यक्ष झाले."

आंबेडकर आणि दलितांच्या चळवळी नसत्या तर यशवंतरावांनी हे केले असते का? आणि प्रश्न असा की, यशवंतराव अजूनही नामांतराच्या लढ्यात सहभागी होऊ शकतात. वरील उताऱ्यावर अधिक प्रतिक्रिया व्यक्त करण्याची गरज नाही. याहूनही अधिक वेगळा भ्रम कोणता असू शकतो?

आणि म्हणूनच हे सर्व प्रकार बघता आत्ताच जर दलित साहित्य चळवळीने विचार केला नाही तर त्याची मराठी साहित्यसंमेलनासारखी अवस्था ठरलेलीच आहे!

संमेलनातले सांस्कृतिक कार्यक्रम चांगले झाले. प्रा. बी. एम्. महालेंची वड एकांकिका, औरंगाबादचे पत्रकार सुधीर गवाणे यांचे धर्मांतर नाटक, शेख जैनू चांद यांचे कलापथक हे कार्यक्रम चांगले झाले. मूलभूत समस्यांना कोणताच धर्म उत्तर देऊ शकणार नाही असे उत्तर सांगणारे सुधीर गवाणेंचं नाटक, वड एकांकिका अभिनयदृष्टचाही सरस होत्या.

पूर्वी खाणीमध्ये अगदी खोलवर विषारी वायू आहे किंवा नाही ते पहाण्यासाठी पिंजऱ्यातून साळुंक्या खाली सोडत. साळुंकी फडफड करीत असेल, गुदमरत असेल तर विषारी वायू आहे असे समजत. सामाजिक जाणीवेच्या साहित्यकाराची भूमिका त्या साळुंकीसारखी असते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, साहित्यिक क्षेत्रातली गुदमर तो व्यक्त करतो. संमेलनाच्या व्यासपीठावरून एखादा लक्ष्मण माने, एखादा अनिल अवचट, एखादे दिनकर सांक्रीकर ही सारी गुदमर व्यक्त करतात. उरलेले बरेच मात्र सारी 'मज्जा' आहे अशाच तालात!

पुढचे दलित साहित्यसंमेलन तरी असे नको. तूर्तास एवढेच!

—लता भिसे

## परराष्ट्र

# इस्राइलमध्ये युद्ध

## मूळ प्रश्न अनिर्णित

वा. दा. रानडे

लेबाननमध्ये इस्राइलने आक्रमण केल्याने सुरू झालेल्या युद्धात इस्राइलने सहा दिवसांनी एकतर्फी युद्धतहकुबी जाहीर केली. तरीही दिवसभर चकमकी चालू राहिल्या. सातव्या दिवशी मात्र दोन्ही बाजूंनी युद्धतहकुबी मान्य केल्याने हे युद्ध आता थांबले आहे; पण मूळ प्रश्न काही सुटलेला नाही.

दक्षिण लेबाननमध्ये पॅलेस्टाइन मुक्ति संघटनेच्या गनिमी दलांचे तळ आहेत. तेथून इस्राइलच्या प्रदेशात हल्ले होत. हे तळ आहेत तोपर्यंत हल्ले थांबणार नाहीत तेव्हा हे तळ नष्ट करण्याच्या उद्देशाने इस्राइलच्या फौजांनी ही मोहीम केली, आणि बेरूतजवळ त्यांच्या फौजा येऊन ठेपल्या. दक्षिण लेबाननचा टापू इस्राइल बळकावणार काय अशी शंका निर्माण झाली. लेबाननची फाळणी होऊन एक भाग इस्राइलच्या ताब्यात व दुसरा सीरियाच्या ताब्यात जाऊन स्वतंत्र राष्ट्र म्हणून त्याचे अस्तित्व संपुष्टात येईल असेही अंदाज काही निरीक्षकांनी केले; पण या युद्धातून तरी तसे काही घडलेले नाही. युद्धतहकुबी झाली असली तरी इस्राइलने फौजा काढून घतलेल्या नाहीत. दक्षिण लेबाननमधील पॅलेस्टिनी गनिमांचे तळ नष्ट झाले आहेत आणि आपल्या प्रदेशावर त्यांचे हल्ले होणार नाहीत अशी खात्री झाल्यावर

आमचे सैनिक मागे घेण्यात येतील, असे इस्राइलच्या एका प्रवक्त्याने सांगितले. पॅलेस्टिनी गनिमी काही काळ शांतता राखतील; पण त्याचे तळसुद्धा नष्ट झालेले दिसले तरी ते पुन्हा उभारले जाऊन हल्ले होण्याचा धोका पूर्णपणे संपला आहे असे म्हणता येणार नाही. पॅलेस्टिनी अरबाचे स्वतत्र राष्ट्र स्थापन होईपर्यंत हा असंतोष आणि त्यातून होणारे दहशती हल्ले धुमसतच राहतील.

पॅलेस्टाइनचा प्रश्न निर्माण होण्याचे मूळ कारण युरोपातील देशांनी केलेला यहुदींचा छळ. जर्मनीत हिटलरच्या राजवटीत तर या छळाने कळस गाठला. यहुदींना परागदा व्हावे लागले. त्याना स्वतःचा देशच राहिला नाही. पॅलेस्टाइन हा पूर्व भूमध्यसमुद्रालगतचा ३०४२९ चौरस मैल क्षेत्रफळाचा देश-पहिल्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंत तो ऑटोमन साम्राज्याचा भाग होता. पॅलेस्टाइनचा बहुतेक भाग आज इस्राइलने व्यापलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाने पॅलेस्टाइनचा कारभार ब्रिटनकडेसोपविला बाल्फोटजाहीरनाम्यानुसार पॅलेस्टाइनमध्ये यहुदीचे राष्ट्र निर्माण होईल अशी राजकीय व आर्थिक व्यवस्था ब्रिटनने तेथे निर्माण करावी, त्याचबरोबर तेथील इतर रहिवाशांचे नागरी व धार्मिक हक्क सुरक्षित राहतील याकडेही लक्ष द्यावे' अशी जबाबदारी ब्रिटनवर टाकण्यात आली. १९१९ मध्ये पॅलेस्टाइची लोकसंख्या जवळजवळ पूर्णपणे अरबच होती; पण त्यानंतर दरवर्षी मर्यादित प्रमाणात युरोपातून परागदा झालेले यहुदी तेथे येऊन राहू लागले. होप सिम्पसन आणि पासफील्ड यांनी १९३० मध्ये सादर केलेल्या अहवालात पॅलेस्टाइनमध्ये यहुदीची आवक आता थाबवावी आणि अरबाचे बहुमत असलेले विधिमंडळ तेथे स्थापन करावे अशी शिफारस केली होती; पण यहुदीच्या विरोधामुळे ती योजना रद्द करण्यात आली. जर्मनीतील यहुदीच्या छळानंतर त्यांची पॅलेस्टाइनमधील आवक खूपच वाढली. पॅलेस्टाइन यहुदीचे राष्ट्र व्हावे असे आमचे धोरण नाही, तसेच ते अरबाचे राष्ट्र असल्याचा दावाही आम्हाला मान्य नाही. दहा वर्षांत स्वतंत्र पॅलेस्टाइन राज्य स्थापन व्हावे, त्यात यहुदी आणि अरब या दोन्ही जमातींची सत्तेत भागीदारी असावी आणि त्याचे हितसंबध सुरक्षित राखले जावेत असे आपले धोरण ब्रिटनने १९३९ मध्ये जाहीर केले. दुसऱ्या महायुद्धानंतर पॅलेस्टाइनवर ब्रिटिशाची सत्ता चालू राहण्यास यहुदींनी जोरदार विरोध केला. तेव्हा ब्रिटनने हा प्रश्न फेब्रुवारी १९४७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे सोपविला. यूनोच्या खास समितीने पॅलेस्टाइनच्या फाळणीची शिफारस केली. ती यूनोच्या सर्वसाधारण सभेने मान्य केली. ब्रिटिशांनी १४ मे १९४८ ला पॅलेस्टाइनवरील आपली सत्ता सपुष्टात आणली. इस्राइल हे यहुदीचे स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आले; पण फाळणीच्या ठरावात शिफारस केल्याप्रमाणे अरब वस्ती असलेल्या पॅलेस्टाइनच्या भागाचे काही स्वतंत्र राज्य स्थापन झाले नाही. या अरब राज्याचा ४० टक्के भाग इस्राइलने व्यापला.जॉर्डन नदीच्या पश्चिम तीरावरचा पॅलेस्टाइनचा भाग जॉर्डनने बळकावला आणि गाझापट्टी इजिप्तने घेतली. त्यानंतर १९६७ च्या युद्धात इस्राइलने सबध पॅलेस्टाइन आपल्या ताब्यात आणला आणि अरब देशानी इस्राइलचे स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व मान्य केल्याशिवाय आम्ही बळकावलेला अरब प्रदेश सोडणार नाही असे जाहीर केले.

इस्राइलच्या स्थापनेने पॅलेस्टाइनचे पंधरा लाख अरब निर्वासित झाले. अविभक्त पॅलेस्टाइन राज्य स्थापण्यासाठी पॅलेस्टाइन मुक्तिसंघटना त्यांनी स्थापन केली. यहुदी आणि अरब यांचे संयुक्त पॅलेस्टाइन राज्य स्थापणे हा त्याचा मूळ उद्देश होता. इस्राइलचे अस्तित्व आम्ही मान्य करतो, पॅलेस्टिनी अरबांचे स्वतंत्र राज्य त्यांनी मान्य करावे अशा तडजोडीस पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेचे अध्यक्ष आराफत तयार होण्याची शक्यता; पण पॅलेस्टिनी अरबांमधील काही गनिमी गट इस्राइलचे अस्तित्व मानण्यास अजून तयार नाहीत. पॅलेस्टिनी अरबाचे स्वतंत्र राज्य मानण्यास इस्राइलनेही आतापर्यंत सतत नकार दिलेला आहे. पॅलेस्टिनी अरबाचे स्वतंत्र राज्य झाले तर इस्राइलच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल अशी भीती इस्राइलला वाटते. इस्राइलच्या सीमा सुरक्षित राहतील अशी हमी अरब देशानी तर द्यायला हवीच; पण अमेरिका वर शिया या बड्या राष्ट्रानीही अशी हमी दिली पाहिजे. इस्राइलला अशा स्वरूपाचा समझोता मान्य करायला भाग पाडण्यासाठी अमेरिकेचे दडपण आणले पाहिजे. तसेच पॅलेस्टिनी अरबाचे स्वतंत्र राज्य होत असेल तर त्यानी इस्राइलशी सघर्ष थाबविला पाहिजे. अरबांचा बळकावलेला प्रदेश इस्राइलने परत केला पाहिजे; पण त्याच्या बदला इस्राइलचे अस्तित्व अरब देशानी मान्य केले पाहिजे. बड्या राष्ट्रांच्या हमीने असा व्यापक समझोता झाल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही; पण त्या दिशेने हालचाली चालू असल्याचे सध्या तरी दिसत नाही. □


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
मूल्य : रुपये पंधरा
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पुणे ३०

## कामगार वृत्त

### भा. म. संघाच्या प्रयत्नामुळे

# 'मर्फी' पुन्हा सुरू होण्याच्या मार्गावर

कामगारक्षेत्रातील डॉ. दत्ता सामंतांच्या घोडदौडीला शह देण्यास सर्व कामगार-नेते आणि खुद्द सरकारदेखील अपयशी ठरत असतानाच या कामी भारतीय मजदूर संघ नेटाने पुढे येत असल्याने कामगारांच्या आशा उंचावल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत डॉ. सामंतांनी अनेक धुरीणांचे बालेकिल्ले सहजगत्या काबीज केले. एके काळी कामगारक्षेत्रात ज्यांची कर्तबगारी, बुद्धिमत्ता नावाजली जात होती आणि ज्यांच्या नावाचा दराराही खूप होता त्या आर. जे. मेहतांचे, फर्नांडिसांचे अनेक किल्ले डॉ. सामंतांनी जाताजाता काबीज केले. ही परिस्थिती इथपर्यंत येऊन पोहचली होती की, डॉ. सामंतांचे आगमन झाल्यानंतर कोणीही त्या-ठिकाणी नेतृत्व करण्यास धजावत नसे मग ती कंपनी सहा महिने बंद राहिली, नाही तर वर्षभर बंद राहिली तरी कोणीच त्याची फिकीर करीत नसे. हे दहशतीमुळे होत होते की, आणखी कशामुळे हा प्रश्न उभा रहात असला तरी हा अनुभव आहे हे नक्की !

अशा प्रकारची परिस्थिती असतानाच भारतीय मजदूर संघ या कामगार संघटनेने काही ठिकाणी डॉ. सामंतांना शह तर दिलाच पण डॉ. सामंतांच्या आगमनाने ज्या कंपन्या सहा–सहा महिने बंद होत्या त्यात नेटाने पाऊल टाकून त्या कंपन्या चालूही करून दाखवल्या. सांडू, कॅमलिन आदी कंपन्यांत डॉ. सामंतांचे नेतृत्व आल्यावर तेथील कंपन्या काही महिने बंद होत्या. कामगार कंटाळले होते. घरी बसून त्यांची चूल पेटणारी नव्हती म्हणूनच या कामगारांनी अन्य कामगार संघटना शोधावयास सुरुवात केली. कामगारांच्या न्याय्य मागण्या जी संघटना मिळवून देऊ शकेल आणि त्या मिळवण्या-साठी जरूर पडल्यास दोन हात करू शकेल, अशी संघटना कामगारांना हवी होती. कामगार आपण होऊनच भारतीय मजदूर संघाकडे आल्यानंतर संघाने नेतृत्व स्वीकारून अशा काही कंपन्या चालूही करून दाखवल्या.

ह्या ज्या कंपन्या चालू झाल्या, त्याने कामगारांच्या आशा उंचावल्या होत्या. बंद असणाऱ्या कारखान्यातील कामगारांना वाटत होते की, आपल्याही कारखान्यात असं काही तरी व्हावं व एकदाचा कारखाना सुरू व्हावा. असं जरी वाटत असलं तरी कामगारांनीच पुढं सरसावयास हवं होतं. कामगार होते तेथेच राहिले; पण भारतीय मजदूर संघ ज्या जोमाने पुढं यावयास हवा होता तसा तो येऊ शकला नाही अशी टीका मात्र भा. म. सं वर होऊ लागली. टीकेला भा. म. सं. डगमगणारा नव्हता आणि त्याला काहीही करून लोकप्रियताही मिळवावयाची नव्हती ! म्हणून आपल्या आहे त्याच पद्धतीने त्याने आपले काम चालू ठेवले. याच पद्धतीचा परिणाम आणखी काही कामगारांच्यावर झाला.

ठाणे येथील 'मर्फी इंडिया' ही रेडिओ कंपनी गेल्या वर्षाच्या २३ ऑक्टोबर ८१ पासून टाळेबंदीमुळे बंद आहे. कारखान्याच्या आवारात कामगारांनी हवा तसा धिंगाणा घातला व योग्य उत्पादन दिलं नाही या कारणावरून व्यवस्थापकांनी येथे टाळेबंदी घोषित केली आहे.

या मर्फी रेडिओ कंपनीचे उल्लेखण्या-सारखे एक वैशिष्टच आहे. येथे एकूण १४६० कामगार आहेत. पैकी पन्नास टक्के कामगार ह्या महिला आहेत. दुसरे वैशिष्टच असे की; पती-पत्नी दोघेही काम करतात, अशा येथील कामगारांची संख्या सुमारे २२३ आहे. म्हणजे इतक्या कुटुंबातून गेल्या आठ महिन्यांपासून मिळवणारे असे कोणीच नाही.

व्यवस्थापकांनी टाळेबंदी का केली याची कारणेही तशी विचार करण्यासारखी आहेत. येथे 'मर्फी एम्प्लॉइज युनियन' नावाची अंतर्गत संघटना गेल्या २५ वर्षांपासून आपले काम करीत आली होती. या संघटनेने १९७२ साली व्यवस्थापकांबरोबर एक करारही घडवून आणला होता. कराराची मुदत संपून बराच कालावधी लोटल्याने अंतर्गत युनियनने डिसेंबर १९८० मध्ये व्यवस्थापकांबरोबर आणखी एक करार करून कामगारांना काही लाभ मिळवून देण्याची योजना आखली. या करारानुसार कामगारांना घरभाडेभत्ता, प्रवासभत्ता नवीनच मिळणार होता व त्यांच्या महागाई-भत्त्यातही वाढ होणार होती. या करारानुसार प्रत्येक कामगाराला ३२०० रुपयांची थकबाकीही मिळणार होती.

तयार झालेल्या ह्या कराराला मूर्त स्वरूप येणार, इतक्यातच डिसें. ८० मध्ये मर्फी रेडिओ कंपनीत डॉ. दत्ता सामंतांचे आगमन झाले. डॉ. सामंत आल्याने कामागारांच्या आशा उंचावल्या. अंतर्गत युनियनने तयार केलेल्या करारापेक्षा डॉ. सामंत आणखी फायदे मिळवून देतील ह्या आशेने कामगारांनी उचल खाऊन डॉ. सामंतांचा झेंडा खांद्यावर घेतला.

सामंतांच्या आगमनाने व्यवस्थापकांनाही थोडा धक्का बसला. तयार करण्यात आलेल्या करारावर प्रकरण भागणारे नाही हे ओळखून व्यवस्थापकांनी डॉ. सामंतांशी संपर्क साधला. ह्याच करारावर बोलणी चालू झाली आणि त्यात सुधारणा करून श्रमिक कामगारांस ३२०० रुपये थकबाकी देण्या-ऐवजी ती ३८०० रुपये द्यावी हे दोघांच्यात निश्चित झाले; पण ३८०० रुपये देताना व्यवस्थापकांनी डॉ. सामंतांना काही अटी घातल्या. त्यातील पहिली अट अशी की, उत्पादन पाच टक्क्यांनी वाढवून द्यावे आणि कामगारांना त्या वर्षाचा ८·३३ टक्के इतका बोनस द्यावा. दोघांच्यात झालेला हा लिखित करार होता.

यानुसार जानेवारी ८१ मध्ये प्रत्येक कामगाराला ३८०० रुपये थकबाकी

देण्यात आली. ती कामगारांनी आनंदाने स्वीकारलीही.

पण दिवाळी जसजशी जवळ येऊ लागली तशी कामगाराच्यात बोनसच्याबाबतीत कुज-बूज सुरू झाली डॉ. सामंत आल्याने ह्या वर्षी बोनस मोठ्या प्रमाणावर मिळाला पाहिजे अशी मागणी काही कामगारांनी डॉक्टरा-पाशी केली. आणि गंमत अशी की, या वर्षी ३० टक्के बोनस मिळावा अशी मागणी करणारे पत्र युनियनने व्यवस्थापकाना पाठवलेही !

ह्या पत्राने व्यवस्थापक मोठ्या चक्रात पडले. ८·३३ टक्के बोनस मिळावा असा लेखी करार झाला असताना डॉ. सामंत ३० टक्के बोनस मिळावा अशी मागणी काय करतात हेच व्यवस्थापकांना समजेनासे झाले; पण ह्याबाबतीत त्यानी निर्णय घेतला, की काहीही झाले तरी चालेल; पण यात तड-जोड नाही !

ह्या गोष्टीने वातावरण तापत होते. ह्या एकाच मुद्द्यावर कामगार तासंतास चर्चा करू लागले अशी परिस्थिती असतानाच टिपणीस नावाच्या एका शिपायाने ८·३३ टक्के इतका बोनस स्वीकारून पैसे घेतले. टिपणीसने पैसे घेतले म्हणून इतर कामगार खूपच सतापले. काही त्याला मारण्यासाठीही धावले !

ह्या प्रकार होऊन देखील व्यवस्थापक स्वस्थ म्हणजे 'जैसे थे' च असल्याने काम-गार कमालीचे संतापले. चिडलेल्या २५० महिलानी २१ ऑक्टोबर रोजी जनरल मॅने-जर जॉर्ज मथन यांना कारखान्याच्या आवा-रातच घेराव घातला. महिलांनी नको त्या शिव्या जनरल मॅनेजरना वाहिल्या. वाता-वरण खूप तप्त झाले २१ ऑक्टोबरप्रमाणे २२ तारखेलाही तीच परिस्थिती होती. व्यवस्थापकांना कोणता तरी निर्णय घेणे भाग होते. त्यांनी बोनसची टक्केवारी वाढवण्या-ऐवजी कंपनीला कुलूप लावण्याचाच निर्णय घेतला आणि २३ ऑक्टोबर ८१ पासून मर्फीत टाळेबंदी लागूही झाली !

कारखाना व्यवस्थापकांनी तडकाफडकी बंद केलेला असला तरी तो केव्हा तरी चालू होणे अगत्याचेच होते. त्यासाठी प्रारंभी डॉ. सामंतांच्या कमिटी मेंबर्सनी प्रयत्नही केले. मोर्चे काढले; निवेदने दिली; पण याची कोणतीही दाद व्यवस्थापकांनी घेतली नाही. डॉ. सामंतच नकोत, ह्रा एकमुखी निर्णय व्यवस्थापकांनी न बोलून घेतला. याने पहिला उत्साह मावळला. कमिटी मेंबर्सही नंतर नंतर गप्प बसून राहिले.

ही परिस्थिती ओळखूनच विचारी काम-गारांनी हातपाय हलवण्यास सुरुवात केली. बोलवून देखील डॉ. सामंत कामगारांना निश्चित वेळी भेटत नव्हते. डॉक्टरांचा व्यापच वाढला होता. २॥ लाख गिरणीकामगाराचे ते नेतृत्व करू लागल्याने डॉ. सामंतांना पूर्वी-इतका वेळच नव्हता; मग ते तरी काय करणार ?

कामगारांना पर्याय शोधणे आवश्यकच होते. त्यासाठी त्यांनी आपल्या हालचाली चालूही केल्या होत्या; पण इतक्यातच कमिटी-मेंबर्सनी डॉ सामंताच्या घरासमोर, बगीच्या-मध्ये, ३ एप्रिल रोजी सकाळच्या प्रहरी एक जाहीर सभा बोलावली. या सभेला डॉ. सामंत उपस्थित राहणार असल्याने महिला कामगारांनी गर्दी केली होती. सभेला ३००—३५० कामगार उपस्थित होते.

येथे खूपच खबळ माजली. अनेक गोष्टींचा गौप्यस्फोटही झाला. चिडलेल्या कामगारांनी डॉ. सामंताना कारखाना चालू करण्याच्या प्रगतीविषयी विचारले, तेव्हा निराश झालेले डॉ. सामंत म्हणाले की, कंपनीचे डायरेक्टर श्री. कोठारे हे माझे काहीही ऐकण्यास तयार नाहीत. चिडलेल्या कामगारांनी डॉ सामंताना अनेक प्रश्नानी छेडले तेव्हा डॉक्टरांनी तब्बल सहा महिन्यांनंतर असा गौप्यस्फोट केला की, ३८०० रुपये देताना १५७ कामगारांना कमी करण्यात येईल असे व्यवस्थापकांनी आपणास सांगितले होते; पण वारंवार आपण ही घटना पुढे ढकलली असेही ते या मिटिंगमध्ये म्हणा-ल्याचे समजते. डॉ. सामंतानी ही गोष्ट आपणाला खूप उशिराने सांगितल्याबद्दल कामगार संतापले. एका महिला कामगाराने डॉ. सामंताना प्रश्न केला की, पूर्वीच्या एम्प्लॉईज युनियनच्या ७०००० रुपयाचा फंड आपण घेतलात. शिवाय ३८०० रुपये मिळ-वून दिले म्हणून प्रत्येक कामगारांकडून ५० रुपये अशी २,००,००० रुपये डोनेशनही आपण मिळवली. इतके पैसे जवळ असताना संपाच्या काळात कामगारांना आपण कोण-तीही आर्थिक मदत दिली नाही. उलट त्या पैशाचा आपल्या कमिटी मेंबर्सनी हवातसा उपभोग करून घेतला. यावर आपल्याकडे उत्तर आहे का ? डॉ. सामंत या महिलेला कोणतेच समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत; पण असे कळते की, काही कामगाराना डॉ. सामंतांनी मदत केली आहे.

अतिशय तप्त वातावरणातच ही मिटिंग संपली. ह्या मिटिंगमुळे कामगारांना अनेक गोष्टी उमगल्या एक म्हणजे डॉ. सामंताच्या हातून टाळेबंदी उठणे कठीण असल्याचे त्यांनी जाणले. यातूनच पाच–दहा कामगारानी धाडस करून भारतीय मजदूर संघाशी संपर्क साधला बोलणी चालू झाली आणि प्रमुख कार्यकर्त्यांची एक मीटिंग भा. म. संघाच्या दादर कार्यालयात पार पडली. त्यानंतर दोन मीटिंगस् ठाण्याच्या कार्यालयात पार पडल्या.

या दोन-तीन सभांतून कामगाराची उप-स्थिती वाढत होती. म्हणूनच १ मे रोजी ठाण्याच्या नीलकंठ व्यायाम शाळेत भा. म. सं ने एक जाहीर सभा बोलावली. या सभेने मात्र डॉ. सामंताच्या कार्यकर्त्यांचे पित्त खव-ळले. जे कामगार सभेला जातील त्यांना दमदाटी देण्याचा प्रकार सुरू झाला. कामगार ठाणेस्टेशनवरून सभेसाठी जात असतानाच अशी दमदाटी दिली जात होती. याच वेळी पांडे आणि माजरेकर हे दोन कामगार मिटिं-गला जात आहेत म्हणून सामंतांच्या काम-गारानी त्याना मारहाणही केली. मारहाणीची बातमी जेव्हा भा. म सं. ला समजली तेव्हा संघाने नौपाडा पोलीसस्टेशनवर एक मोर्चा नेऊन, मारहाण करणाऱ्या त्या लोकांना अटक करण्याची मागणी करून केस नोंदवली. ह्या प्रकार होऊनही ठरलेली ही सभा झालीच!

या प्रकाराने जवळ आलेला कामगार अधिक संघटित झाला. आपले रक्षण करण्या-साठी कोणी तरी आहे हा विश्वास त्याच्या मनी निर्माण झाल्याने त्याची जिद्दही वाढली आणि ह्याच जिद्दीतून वृत्तपत्रात जाहीर करून भा. म. सं. ने १३ मे रोजी येथील आनंदाश्रम सोसायटी हॉलमध्ये आणखी एक जाहीर सभा बोलावली पूर्वीच्या प्रकाराची ह्या वेळी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून भा म. संघाचे सर्व कार्यकर्ते तयारीनिशी आले होते. पोलिसानीही चांगले संरक्षण देऊ केले होते. ह्या सभेत कामगारांनीच अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. भारतीय मजदूर संघाच्या

नेतृत्वाखालीच कंपनी उघडण्याची शपथ कामगारांनी ह्या वेळी घेतली. त्यासाठी कामगारांच्या सह्या गोळा करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. सुमारे हजार कामगारांनी भा. म. संघाचे नेतृत्व मान्य केले तर कंपनी उघडण्यासाठी भा. म. संघ आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करील, असा विश्वास श्री. रमण शहा यांनी कामगारांना बोलून दाखवला. या सभेत श्रीमती जयाबेन नायक आणि प्रभाकर ओक यांचीही भाषणे झाली.

कामगारांनी १३ मे ला घेतलेल्या शपथेनुसार आतापर्यंत सुमारे पाचशेहून अधिक कामगारांच्या सह्या जमा झाल्या आहेत. आवश्यक ते बहुमत मिळताच भा. म. संघ कामगार आयुक्तांशी वाटाघाटी करणार असून प्रश्न लवकरात लवकर मिटवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

मर्फीतील कामगारांसाठी तातडीच्या तीन मागण्या भा. म संघाने हाती घेतल्या आहेत. कोणत्याही कामगाराला कामावरून कमी केले जाणार नाही, ही यातील पहिली मागणी आहे. तसेच २३ ऑक्टोबरपासून टाळेबंदी सुरू झाल्याने व्यवस्थापकानी ऑक्टोबर महिन्याचा पगारच कामगारांना अद्याप दिलेला नाही, तो लागलीच द्यावा ही त्यांची दुसरी मागणी आहे आणि कंपनी चालू होताच कामगारांना काही तरी अॅडव्हान्स द्यावा ही आणखी एक मागणी असणार आहे.

काही हितसंबंधी व्यक्तींना मर्फी कायमचीच बंद रहावी असे वाटते. मर्फी बंद असल्याने बुशची मागणी वाढली आहे. ही बुश कपनी मर्फीला लागूनच असल्याने आणि तेथेही डॉ. सामंतांचेच नेतृत्व असल्याने, आहे हीच स्थिती बुशवाल्यांना व डॉक्टरांच्या कार्यकर्त्यांनाही हवी आहे असे येथे सर्वत्र बोलले जाते; पण काहीही असले तरी मर्फी आता उघडण्याच्या मार्गावर आहे. प्रक्रिया चालू झाली आहे.

यश आज ना उद्या येईल यात संदेह नाही.

—मोहन शंकर कुलकर्णी
घाटकोपर



स. शि. भावे

# सामान्य माणसेच खरी बुद्धिवादी

बुद्धिवाद खराखुरा समजला आहे असे कोण असतात? बुद्धिमंत? बुद्धिजीवी? बुद्धिवादी? एकेकांची साक्ष काढली तर कणखर, पण सहिष्णु, बुद्धिवादी वृत्ती क्वचितच आढळते.

बुद्धिमंतांच्या जीवनात आणि विचारात, बुद्धीला बहुधा एक महत्त्वाचे साधन एवढेच महत्त्व असते. मूल्याचे महत्त्व असतेच असे नाही मूल्य बहुधा कोणते तरी वेगळेच असते.

हे मूल्य परंपरेने आलेले असते. समाजात स्थिर झालेले असते. त्या त्या काळी कोणते मूल्य प्रस्थापित आहे आणि खास त्या काळचे आहे हे बुद्धिमंतांना उत्तम समजते. बुद्धिमंतच ते! त्याना हे समजणारच. उदाहरणार्थ, आपल्या मुलाला 'ज्यूनियर केजी' पासून इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे शिक्षण मिळाले पाहिजे हे ते अचूक ओळखतात किंवा आपल्या व्यवसायाला आणि गिऱ्हाईकाला सारखेच हितकारक काय हे ते उत्तम ओळखतात. (इंग्रजीत customer किंवा client हा शब्द सर्वसाधारण अर्थानेही शोभून दिसतो. मराठीतल्या 'गिऱ्हाइका'चे मात्र नेहमी गिऱ्हाईक होते. विषयांतर वाटेल; पण तसे नाही. *मला हा शब्द, client या अर्थाने,* गंभीरपणे वापरायचा आहे हे ध्यानात घ्यावे.)

तर बुद्धिमंत डॉक्टरला हे चागले माहीत असावे लागते की, रोगाचे अचूक निदान होणे, रोग्यावर अचूक इलाज होऊन रोगी व्याधिमुक्त होणे—आणि याबरोबरच डॉक्टर हा व्यवसायही भरभराटीत चालणे—ह्या घटकांना सारखेच महत्त्व आहे. म्हणून मग तो निदान अचूक करतो, इलाज अचूक करतो, रोग्यास पुरता बरा करतो; आणि हे सारे करत असतानाच रोग्याशी कायमचा व्यावसायिक संबंध जोडून ठेवतो. क्लायंट म्हणून रोग्याला पक्के बाधून ठेवतो.

होते ते साधारणपणे असे:

निदान सागताना डॉक्टर सांगतात—'हा आहे तुमचा आजार; पण या आजारात इतरही अनेक आजारांच्या छटा असू शकतात. त्यांच्याबाबत सावध राहिलं पाहिजे. घाबरू नका. मी आहे!' हे निदान ऐकून माणूस मनानेच कायमचा रोगी—आणि क्लायंट-होतो.

बरे वाटल्यावर घरी धाडताना डॉक्टर सांगतात—'आता तुम्ही पूर्ण बरे झालात. तथापि, 'इम्यूनिटी' शंभर टक्के 'रिस्टोअर' झालेली नाही. असं करा, महिन्या-दोन-महिन्यांनी सहज येत चला.'—हे शेवटचे वाक्य विश्वासात घेत, खालच्या पट्टीत आणि हलक्या आवाजात उच्चारलेले असते. नतर पाठीवर एक हलकी थाप आणि पुन्हा मोठ्या आवाजात—'माझी एक गंमत आहे. म्हणजे काय की, मी बरी केलेली माणसं पुन्हा पुन्हा भेटलेली मला आवडतात!'

येथे डॉक्टरांनी आपणाला एकदम जिंकलेले असते. अशा डॉक्टराकडे आपण येतो रोगी म्हणून. त्याच्याकडून जातो ते कायमचे क्लायंट म्हणून!

बुद्धिमंत स्वतःच्या बुद्धिवैभवाचा वापर हा असा करीत असतात.

¤

म्हणजे, तसे पाहिलेतर हे बुद्धि-जीवीच; पण त्यांचा गट वेगळा मानावा लागतो. कारण सारे बुद्धि-जीवी हे बुद्धिमंत असतातच असे नाही!

बुद्धिमत नसलेल्या बुद्धिजीवींची पद्धत वेगळी असते. त्यांना वेगळी पद्धत घ्यावीच लागते. आपणही बुद्धिमंत आहोत असा आभास त्याना आधी निर्माण करावा लागतो. असा आभास जसा इतरांसाठी, तसाच त्यांच्या स्वत.साठीही आवश्यक असतो.

बुद्धिवर चाललेली आपली जीविका इतरांना हास्यास्पद वाटू नये, यासाठी बुद्धिमंत असल्याचा आभास इतरांपुढे निर्माण करायचा असतो. याची एक सोपी वाट म्हणजे समानार्थक शब्दाचा मारा, अशा वेगाने आणि

अशा आत्मविश्वासाने ह्या मारा करायचा की, ऐकणाऱ्याला वाटायला हवे की, केवढे हे शब्द-वैभव ! गडकऱ्यांचे 'खलनायक' एवढेच म्हणून भागणार नाही. 'खलनायक' पाठोपाठ 'खलपुरुष', 'दुष्ट पुरुष' 'व्हिलन' अशी दहाबारा शब्दांची कारिका नंतर ताबडतोब मुखातून यायला हवी. बुद्धिमंत असण्याचा आभास निर्माण होण्यासाठी अशी कारिका म्हणजे एक अमोघ शस्त्रच असते !

बुद्धिमंतपणाचा आभास निर्माण करण्यासाठी वापरायचे दुसरे महत्त्वाचे शस्त्र म्हणजे एक गोष्ट वेगवेगळ्या प्रकारानी सांगणे. यात खरे म्हणजे पुनरुक्ती होत असते; पण वाक्ये निरनिराळी वापरण्याने ती ऐकणाऱ्याच्या चटकन लक्षात येत नाही. विषयाची मांडणी विविध प्रकारानी चालू आहे असेच त्याला वाटत राहते. दिसायला शहाजोग अशा वाक्यांशाची या विविधतेसाठी मदत होते. 'मी काय म्हणेन', 'मला म्हणायचंय ते असं', किंवा 'तो त्याचाच एक महत्त्वाचा भाग आहे', 'आपण विचार केल्यास आपणास हे सहज पटेल' इत्यादि इत्यादि वाक्यांश वापरले की, विविधतेचा परिणाम होते. भारदस्तपणाचे वातावरणही तयार होते. असे वाक्यांश अनेक सांगता येतील; पण वाचकाच्या मार्मिकपणाबद्दल खात्री असल्याने दिग्दर्शनात्मक चार वाक्यांश वर दिले आहेत. (यात असे दोन वाक्यांश प्रस्तुत लेखकानेही वापरले आहेत, हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात येईल. प्रस्तुत लेखक मग्न आहे. तो दुसऱ्या म्हणजे बुद्धिजीवी वर्गात मोडतो. वास्तव बुद्धिमंतपणाचा आभास निर्माण करण्याची त्यास गरज आहे. हे वास्तव वाचक समजूदारपणाने लक्षात घेतील व लेखकाविषयी सहानुभूतीची दृष्टी ठेवितील अशी आशा वाटते.)

बुद्धिमंतपणाचा आभास निर्माण करण्याचे तिसरे हमखास शस्त्र म्हणजे 'नावे फेकणे', अर्थात Names dropping यात औपचारिक नावे शक्यतो टाळायची असतात. म्हणजे श्री. रा. श्री. जोग असा उल्लेख करायचा नाही. 'रामभाऊ' असा करायचा. यापेक्षा आणखी एक पद्धत आहे. ती अधिक परिणामकारक ठरते. 'मामिना म्हणजे महादेव भिकाजीना मी तात्या म्हणायचो,' अशी सुरुवात करायची नि मग सतत 'तात्या' म्हणायचे. म्हणजे वाचकाच्या डोक्यावर. यातले आणखी एक तंत्र म्हणजे 'तात्या व आपण' अशा दोघाच्याच, म्हणजे दोघे असतानाच्याच, कथा सांगायच्या. 'तात्या' विचारे इहलोकाच्या पलीकडे गेलेले असतात. एका अर्थाने ते सुदैवी असतात. 'हे खरे', किंवा 'ते खोटे' अशी तपासणी करण्याच्या जबाबदारीतून ते सुटलेले असतात. त्यांच्या या 'गैरहजेरीतील मदती'ने आपल्या कथा मस्त रंगतात.

मधून मधून या कथात तात्यांची खरी गुणग्राहकता डोकवावी. 'माझ्यादेखील ही गोष्ट लक्षात आली नव्हती. ती तुझ्या कशी रे तात्काळ लक्षात आली, गुलामा !' असे म्हणून आपल्या पाठीवर तात्यानी शाबासकीची थाप कशी मारली याचे चित्रमय वर्णन कथेत करावे. पुढील पिढ्यासाठी असा तपशील आवश्यक तसाच उपयुक्त असतो.

वरील त्रिविध पद्धतीने आणि इतरही अनेक पद्धतीनी बुद्धिजीवी लोक 'आपण बुद्धिमंत आहोत' हे इतरासमोर शाबीत करीत असतात. हे शाबीत करता करता हळूहळू त्याची स्वत.चीच तशी खात्री पटते की, ते बुद्धिमंत आहेत. बुद्धिमंतपणाविषयी इतराची खात्री पटणे ही सामाजिक गरज असते, स्वतःचीच तशी खात्री पटणे ही व्यक्तीची मानसिक गरज असते. न्यूनगंडाने जगून कोणी सुखी होत नाही. प्रत्येक जण स्वतःतील न्यूनगंड दूर कसा होईल या चिंतेत व त्या तजविजीत असतो. कधी उलटलेला (inverted) आत्मविश्वास असे रूप त्याला मिळते, तर कधी आभासात्मक आत्मविश्वासाचे मिळते. पैकी आभासात्मक आत्मविश्वास चांगला. कारण त्याचा दुसऱ्यांना भरपूर त्रास होतो; पण ज्याचा त्याला होत नाही. Inverted आत्मविश्वासाचा त्रास मात्र इतरांप्रमाणे ज्याचा त्यालाही होतो.

एक मात्र खरे. बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचा विचार बुद्धिजीवी लोकाना कधी करता येत नाही. कारण स्वत.ला बरे करणे, स्वत.तील उणीव, स्वत.ला बाधू नये म्हणून झटणे, यातच त्याची बुद्धीची पुंजी वापरली जात असते. बुद्धिमंत लोकांना बुद्धिवादाची कदर नसते. बुद्धिजीवी लोकांना बुद्धिवाद परवडू शकत नाही.

¤

आता, तिसऱ्या प्रकारचे लोक, जे बुद्धिवादी असतात किंवा तसे समजले जातात, त्यांचा विचार येतो.

या लोकांना बुद्धिवादाचे अजीर्ण झालेले असते, असे सर्वसाधारणपणे दिसते बुद्धिवादी भूमिकेवर त्याची इतकी कमालीची श्रद्धा असते की, ह्या श्रद्धेपुरती त्याची बुद्धिवादी भूमिकादेखील सुटते, ते क्रोधाविष्ट होतात, क्वचित अपशब्दांचा माराही करतात.

साधे कुतूहल, साधी भावनात्मकता, साधे अज्ञान, असा सर्व क्षेत्रातला साधेपणा त्याना खपत नाही. जीवनातल्या साधेपणाची जणू त्यांना भीती वाटते. साधेपणात मनाला सरळपणाची गुंगी आणण्याची ताकद असते. या ताकदीला आपण वश तर होणार नाही ना, अशा दराऱ्यात बुद्धिवादी लोक वावरत असतात

साधेपणात दुसऱ्याचा विरोध मावळवण्याची ताकद बुद्धिवाद्याना आवडत नाही. माणसाने कसे कडोविकडी भांडावे, युक्तिवाद करावे, वाद टोकापर्यंत भाडावे हे त्याना आवडते. त्यामुळेच आपण होऊन भाडण सोडून देणारा माणूस त्याना आवडत नाही. असा माणूस म्हणजे त्यांना एक कोडेच असते. बुद्धि शाबूत असला माणूस आपली बाजू अशी लढाई न करता सोडून देईल हे त्यांना पटत नाही. तो एक तर त्याना बावटळपणा तरी वाटतो किंवा लढाई सोडून माघार घेणाऱ्याचा किंवा पराभव मान्य करणाऱ्याचा, काही तरी डाव असला पाहिजे, असेच त्यांना वाटत राहते.

त्यांच्या बुद्धिवादी भूमिकेने त्यांना सर्व पर्याय सारख्या महत्त्वाने जाणवत असतात आणि नवे नवे पर्याय सुचत राहतात त्यामुळे बिचाऱ्यांना निःशंकपणाचे समाधान कधी मिळतच नाही. सारखा विचार चालू, शंका चालू, विविध पर्यायाची तुलना चालू. या साऱ्यात समाधान कोठून व कसे मिळणार ? बरे, स्वत.च्या आवडी–नावडीने नेहमी माणसाच्या शंकेचा निरास होतो; पण ही पद्धत आत्मनिष्ठ-खाजगी होते. यापद्धतीने वस्तुनिष्ठ निर्णय मिळत नाही. सबब, खऱ्या बुद्धिवादी लोकाना या पद्धतीचा सतत धसका असतो.

अनेकदा त्यांच्या मनात भावनेची आदोलने चालतात, वादळे उठतात. महत्त्वाचे निर्णय भावनांनी केव्हाच घेऊन टाकलेले

असतात. अशा वेळी, बुद्धिवादावर असीम श्रद्धा असणाऱ्यांचा मानसिक छळ होतो. निर्णय तर झालेले असतात. निर्णयांची पद्धती अशास्त्रीय, म्हणून बेभरंवशाची, हेही मनाला पटलेले असते. 'बुद्धि-श्रद्धा-वाद्यां' ची मने अशा संघर्षात अनेकदा फाटतात, जखमी होतात. बाहेरून आग्रही आणि आतून हळवे असे हे लोक फाटलेल्या मनाची लक्तरे जन्मभर आवरीत बसतात. हे लोक खऱ्या अर्थाने बिचारे असतात.

¤

हाती असे लागते की, बुद्धिमंत आणि बुद्धिवाद-आग्रही-यापैकी कोणीही खरे बुद्धिवादी नसतात. म्हणजे असू शकत नाहीत. त्यांच्या त्यांच्या विशिष्ट अवस्था अथवा भूमिका, त्यांच्या खऱ्या अर्थाने बुद्धिवादी असण्याच्या आड येतात

मग खरे बुद्धिवादी कोण ?

तर आपणांसारखी सामान्य माणसे हीच खऱ्या अर्थाने बुद्धिवादी असतात.

मात्र आपण बुद्धिवादी आहोत, हे यांना माहीत नसते. असे माहीत नसणे ही तर त्यांच्या निखळ बुद्धिवादी असण्याची खरी खूण असते:

त्यांच्या निरागस बुद्धिवादी असण्याच्या आणखी काही खुणा अशा :

एक तर नश्वरता ही नैसर्गिक वास्तवता म्हणून सामान्य माणसानी स्वीकारलेली असते. जे जन्मणार, ते एक दिवस जाणार हे त्यांना माहीत असते. म्हणून मृत्यूने, ताटातुटीने, विरहाने, भाडणाने हे लोक दुःखी होतात; पण मर्यादेपलीकडे व्याकुळ होत नाहीत.

जुन्या पिढीतल्या अशिक्षित बायका आपल्या मुलाविषयी बोलताना सांगतात- 'हा सुरेश. हा नवसाचा आहे. याच्या आधीचे चांगले चार झाले होते; पण लाभले नाहीत. सुरेशनतरची मात्र सारी जगली.' आता, न लाभलेल्या मुलांबद्दल वाईट न वाटणे कसे शक्य आहे ? ते वाईट वाटलेले असतेच. सांगतानाही डोळ्यांच्या कडा लाल झालेल्या जाणवतात; पण आक्रस्तळेपणा नसतो, की लोळागोळा होणे नसते. दुःखही नॉर्मल असते. ते दुखरेपणाच्या किंवा किंकाळण्याच्या टोकांना जात नाही. मृत्यूचा स्वीकार वास्तव म्हणून, त्यानी केलेला असतो. मृत्यूच्या भीतीत सापडून ते कधी नामोहरम होत नाहीत.

दुसरे म्हणजे, वास्तवतेच्या ह्या स्वीकाराने जीवनाचे तात्पुरतेपण त्याना उत्तम उमजलेले असते. उत्कर्षाने, विजयाने आनंद होणे आणि ऱ्हासाने, पराजयाने वाईट वाटणे, हे स्वाभाविक आहे. सामान्य माणसांनाही आनद होतो, वाईट वाटते; पण ते तेवढ्यापुरतेच असते. जय काय, पराजय काय, सारे प्रसंग तात्पुरते असतात हे त्यांनी जाणलेले असते. ते तसे त्यांना कोणी शिकवलेले नसते; पण त्यानी जगता जगता ते जाणलेले असते.

तात्पुरतेपणाचा वास्तव म्हणून स्वीकार केला की, आग्रह संपायलाच हवा. 'अगदी पाच म्हणजे पाचाच्या ठोक्याला नव्हे, पाचदहा मिटं मागेमागे'. 'नाही आला पहिला नंबर तर त्याचं काय एवढं. साऱ्याचाच कसा पहिला नंबर येणार ?' 'लहान वय होतं. पण काय करणार ? त्याची वेळ आली. गेला !' अशी समजूतदार वाक्ये सामान्य माणसे हरघडी बोलत असतात. सहजपणे, जगण्याच्या पद्धतीचा अविभाज्य भाग म्हणून.

या वाक्यात दुखरी अगतिकता नसते, तर मानवी वास्तवाचा शहाण्या बिनतक्रारीने केलेला सहज स्वीकार असतो. सारे काही साजरे करून घेणे ही सामान्य माणसाच्या बुद्धिवादाची तिसरी महत्त्वाची खूण आहे. हजार गोष्टीत नव्याण्णव वाईट असतील तर त्या मनावर घेऊ नयेत. जी एक चांगली असेल तिचा उपभोग घ्यावा, आस्वाद घ्यावा; ती पूर्णपणे आत्मसात् करावी, या वृत्तीने सामान्य माणसे साऱ्या गोष्टी साजऱ्या करून घेतात. साधे उदाहरण पाहा. आपली जिवाभावाची वस्तू असते. कोणी येते अन् त्याच्या हातून ती मोडते-फुटते. अशा वेळी चिडून, वैतागून, शिव्या देऊन काय होणार ? फुटलेले काय परत येणार आहे ? अशा वेळी काय करावे ? तर 'वस्तू फुटणारच. आज तुमच्या हातून फुटण्याचा योग होता', असे म्हणावे, नि मोकळे व्हावे !

देव आणि दैव यांच्यावर सारे घालून सामान्य माणसे अशी मोकळी होत असतात. देव, दैव किंवा भूतपिशाच किंवा आजचे महंत-बुवा यांचा आधार सामान्य माणसे जरूर घेतात; पण बुद्धिवादाच्या आग्रही अभिमान्यांना वाटते तसे ते अंधश्रद्ध नसतात. भासतात तितके ते अगतिकही नसतात.

एक हातचा म्हणून किंवा भोज्या म्हणून, किंवा (संताच्या 'बीज' गणिताप्रमाणे) अज्ञात 'क्ष' म्हणून सामान्य लोक देव-भूत -बुवा यांचा स्वीकार करतात. प्रसंगाप्रमाणे या सर्वांची ते यथेच्छ चेष्टाही करतात. हां, ही चेष्टा ही सामान्यांच्या बुद्धिवादाची सर्वांत महत्त्वाची खूण आणि अपरिवर्तनीय पुरावा आहे. सामान्याच्याजवळ मूलग्राही विनोदबुद्धी असते. हसत आणि हसवत ते जगतात.

हा खरा बुद्धिवाद. बुद्धिमंत, बुद्धिजीवी आणि हट्टी बुद्धिवादी यानी तो समजून घेतला तर जगाचे भले होईलच; पण खुद्द त्याचे कष्ट किती हलके होतील ! मग ते रडणार-चिडणार नाहीत, तोंड वाकडे करणार नाहीत, मोकळे होतील, आप-सुखी होतील. मग त्यांच्या निरनिराळ्या रंगाच्या सदऱ्यांचा हट्ट संपेल.

¤

मला वाटते, उत्तरमीमासेचे एक आवर्तन येथे पुरे करावे. संपादकांनी सधी दिली. वर्षभर अनेकानी शाबासकी दिली, आनंद मिळाल्याचे सांगितले. अनेकांनी मागे (उभे) राहून प्रोत्साहन दिले. संपादक, वाचक आणि मित्र यांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे. ☐


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अवती भवती

शरद कृष्णन्

## □ राष्ट्रपतिभवनाचे नवीन मानकरी कोण ?

सार्वत्रिक निवडणुकांची एक छोटी फेरी अलीकडेच पार पडली. निकालांवरून नजर टाकली तर लक्षात येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निवडणुकीमध्ये तसा सर्वच राजकीय पक्षांनी मार खाल्ला. सत्ताधारी असलेल्या इंदिरा काँग्रेस पक्षाच्या पायाखालची वाळूही सरकली आणि आता या दिव्यातून बाहेर पडल्यावर राष्ट्रपतींच्या निवडणुकीचे नगारे वाजू लागले आहेत. या निवडणुकीचा जो मतदारसंघ आहे. त्यामध्ये लोकसभा व राज्यसभा यांचे सदस्य आणि राज्याच्या विधानसभांचे सदस्य यांचा समावेश होतो. या मतदारसंघावरून नजर टाकली तरी लक्षात येणारी पहिली गोष्ट म्हणजे या मतदारसंघावर इंदिरा काँग्रेसचे भरपूर वर्चस्व आहे आणि निवडणूक झालीच तर इंदिरा काँग्रेसचा उमेदवार अगदी सहज निवडून येण्यासारखा आहे. विरोधी पक्षांना ही वस्तुस्थिती माहीत असल्यामुळेच राष्ट्रपतिपदाचा उमेदवार एकमताने ठरवावा असे टुमणे त्यांनी लावले आहे. नऊ प्रमुख विरोधी पक्षांनी या संदर्भात पंतप्रधानांना एक पत्र लिहिले आहे. तसेच संभाव्य उमेदवार म्हणून काही नावेही हवेत सोडून दिली आहेत. या पत्राबाबत इंदिराजी तशा उदासीन आहेत. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचे निमित्त करून आपल्याला अडचणीमध्ये पकडण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी या संदर्भात त्यांची भावना आहे. विरोधी पक्षाच्या हेतूबद्दलही त्यांना शंका आहे. खेरीज त्यांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे आगामी लोकसभा निवडणुका जेव्हा होतील, त्यांचे निकाल इंदिरा काँग्रेसला फारसे अनुकूल गेले नाहीत तर निदान राष्ट्रपतीभवनातून तरी आपल्या पक्षाला आणि आपल्या स्थानाला धक्का लागू नये म्हणूनच ज्याला राजकीय महत्त्वाकांक्षा नाही आणि अडचणीच्या वेळी जो इंदिरा काँग्रेसबद्दल आणि व्यक्तिशः इंदिराजींबद्दल सहानुभूती दाखवू शकेल असा राष्ट्रपती इंदिराजींना हवा आहे. अशी व्यक्ती राष्ट्रपतीभवनात बसवणे त्यांना अवघड मुळीच नाही; परंतु याबाबत विरोधी पक्षांनी हालचाली सुरू केल्या असल्याने त्या चांगल्याच सावध झाल्या आहेत.

### व्यक्तिगत गाठीभेटी

विरोधी पक्षांनी लिहिलेल्या पत्राला त्यांनी उत्तर दिले नसले तरी या संदर्भात प्रमुख विरोधी नेत्यांची भेट घेऊन त्यांनी आपल्या मनात काय आहे याचा थोडासा अंदाज त्यांना दिला आहे. राष्ट्रपतीपदाची मागील निवडणूक झाली त्या वेळी इंदिरा काँग्रेस प्रमुख विरोधी पक्ष होता. त्या वेळचे या पक्षाचे नेते यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रपतीपदाची निवडणूक शक्यतो एकमताने व्हावी असा प्रस्ताव पुढे मांडला आणि तो जनता पक्षाने स्वीकारला. कारण तसे करणे सोयीचे होते इंदिरा काँग्रेस विरोधी पक्ष म्हणून असला तरी लोकसभेमध्ये त्यांचे चांगले १५२ खासदार होते. राज्यसभेत तर त्यांचे बहुमत होते आणि दक्षिणेमध्ये हा पक्ष त्या वेळीही भक्कमपणे आंध्र व कर्नाटक या दोन्ही राज्यांत सत्ता राबवीत होता. आज विरोधी पक्षांची एकत्रित संख्याही १५२ च्या जवळपास नाही. खेरीज राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीबाबत जनता पक्षाच्या घटकपक्षामध्ये एकमत होणे अवघड होते. स्वाभाविकपणे सर्वमान्य उमेदवार निवडावा ही कल्पना पुढे येताच ती स्वीकारली गेली. मोरारजीभाईंनी जी तीन नावे प्रथम सुचविली त्यामध्ये संजीव रेड्डी यांचे नावही नव्हते. त्यांनी सौ. रुक्मिणीदेवी, श्री. के. एस हेगडे व मरहूम एम सी. छगला अशी तीन नावे सुचविली. त्यापैकी रुक्मिणीदेवी यांच्या नावास मान्यता देऊन चव्हाणांनी पंतप्रधानांसमोर पेच निर्माण केला. कारण जनता पक्षामध्येच या नावाला उदंड विरोध होता. रुक्मिणीबाईंचे नाव मागे पडले आणि मग श्री. संजीव रेड्डी व श्री. हेगडे अशी दोन नावे सुचवण्यात आली. विरोधी पक्षाने रेड्डींच्या नावास मान्यता दिली आणि सर्वमान्य उमेदवार म्हणून रेड्डी एकमताने निवडले गेले. अशा प्रकारे सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या मान्यतेने राष्ट्रपतीभवनात प्रवेश करणारे ते पहिलेच राष्ट्रपती झाले ! जनता पक्ष सत्ताभ्रष्ट झाल्यावर राष्ट्रपतीभवनाला भलतेच महत्त्व आले. असेही म्हणतात की, संजीव रेड्डी यांना जबर राजकीय महत्त्वाकांक्षा होती. राष्ट्रपतीभवन हे सत्ताकेंद्र होण्याचा संभव आहे हे लक्षात घेऊनच त्यांनी चौधरी चरणसिंग यांचे सरकार कोसळल्यावर अन्य कोणाला संधी न देता लोकसभा विसर्जित करून टाकली. निवडणुकीमध्ये कुणालाच बहुमत मिळणार नाही आणि राष्ट्रपतींना महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागेल असा त्यांचा अंदाज होता. आता हा अंदाज साफ चुकल्याने राष्ट्रपतीभवन निस्तेज झाले आणि शक्तिशाली इंदिराजी प्रचंड बहुमत पाठीशी घेऊन पुन्हा सत्तेवर आल्या. अडचणीच्या वेळी राष्ट्रपती भवन किती महत्त्वाचे ठरू शकते याची त्यांना पुरेपूर कल्पना असल्याने ज्याला राजकीय महत्त्वाकांक्षा आहे आणि ज्याची विरोधी पक्षांशी विशेष जवळीक आहे अशा व्यक्तीस त्या कदापीही राष्ट्रपतीभवनात येऊ देणार नाहीत. त्यामुळेच या संदर्भात यशवंतरावांचे नाव पुढे येण्याचा सुतराम संबंध नाही. राजकीय खेळी म्हणून विरोधी पक्षांनी बाबू जगजीवनराम यांचे नाव पुढे रेटले तरी इंदिराजी त्यालाही मान्यता देणार नाहीत. विद्यमान राष्ट्रपती हिदायतुल्ला यांना कायद्याचे नको तेवढे ज्ञान आहे. खेरीज सर्वोच्च न्यायालयामधील सर्वोच्च पद त्यांनी भूषवले असल्याने त्यांच्या नावाचा विचार करण्यास त्या तयार होणार नाहीत.

## बी. डी. जत्ती यांची दाट शक्यता

इंदिराजींतर्फे जी नावे पुढे रेटली जात आहेत, त्यामध्ये अग्रस्थानी माजी उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती यांचे नाव अग्रस्थानी आहे. इंदिराजींच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारांबाबत ज्या अपेक्षा आहेत त्या जत्ती बरोबर पूर्ण करतात. माजी उपराष्ट्रपती म्हणून ते साऱ्या देशाला परिचित असले तरी त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा नाही. आगामी सार्वत्रिक निवडणुकीनंतर इंदिरा काँग्रेस जर अडचणीत आली तर राष्ट्रपतीभवनातून जेवढे सहकार्य करणे शक्य आहे तेवढे सहकार्य जत्ती यांच्याकडून मिळेल असा विश्वास इंदिराजींना आहे. खेरीज पूर्वी त्यांनी उपराष्ट्रपती म्हणून काम केले असल्याने याबाबत आपण पूर्वीचेच संकेत पाळत आहोत असे इंदिराजींना म्हणता येईल. अन्य पर्यायी नावे म्हणून विद्यमान संरक्षणमंत्री श्री. आर. व्यंकटरामन, तसेच माजी मंत्री सरदार स्वर्णसिंग यासारखी नावे त्यांच्या नजरेसमोर आहेत. विरोधी पक्षांनी सुचवलेली श्री. हिदायतुल्ला आणि जगजीवनराम ही नावे इंदिराजींकडून स्वीकारली जाणार नाहीत. तेव्हा उमेदवार सर्वमान्य असावा असा प्रस्ताव स्वीकारला गेला तरी विरोधी पक्षांनी सुचवलेल्या नावास मान्यता देण्याऐवजी इंदिराजी विरोधी पक्षांनी आपला उमेदवार स्वीकारावा यासाठी आग्रह धरतील आणि तसा तो स्वीकारला गेला तर उत्तमच; पण समजा, जमले नाहीच तर त्यामुळे इंदिराजींचे फारसे बिघडण्यासारखे नाही. निवडणूक झालीच आणि थोडी–फार फाटाफूट झाली तरीही आज त्यांचे सामर्थ्य एवढे मोठे आहे की, त्यांना हवा असलेला उमेदवार त्या राष्ट्रपतीभवनात नेऊन बसवू शकतात !

## मतमोजणीचा मामला–गुंतागुंतीचा

राष्ट्रपती पदासाठी निवडणूक झालीच तर संसदेच्या दोन्ही गृहांचे सदस्य तसेच राज्यांच्या विधानसभांचे सदस्य यांना मतदान करता येते. मतदानाचा हक्क या सर्वांना असला तरी त्यांच्या मताचे मोल भिन्न असते. खासदाराच्या मताचे मोल ७०२ इतके असते तर विधानसभेच्या सदस्याचे मोल तो कोणत्या राज्याच्या विधान सभेचा सदस्य आहे यावरून निश्चित करण्यात आले आहे. उ प्रदेशामधील आमदाराच्या मताचे मूल्य २०८ आहे तर सिक्कीम विधान सभेच्या आमदाराचे मूल्य सर्वांत कमी म्हणजे केवळ ७ आहे. एक मतदार एक मत असे या निवडणुकीचे स्वरूप नसल्याने मामला तसा गुंतागुंतीचा आहे. मात्र एक गोष्ट नक्की की उमेदवार एकमताने ठरू शकला नाही आणि समजा निवडणूक अपरिहार्य ठरली तर इंदिराजींच्या पक्षाचा उमेदवार राष्ट्रपती म्हणून निवडला जाईल. त्या जे नाव सुचवतील त्याला त्यांचा पक्ष एकमुखी मान्यता देईल. थोडी फार मते इकडे–तिकडे झाली तरी १९६९ साली झालेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या वेळी काँग्रेस पक्षाने आपल्या पक्षाचा उमेदवार जसा फेकून दिला तसे या वेळी होणार नाही; आणि सत्ताधारी पक्षाचा उमेदवार अगदी सहजगत्या निवडून येऊ शकेल.

एखादी राजकीय चाल चालावी अशा पद्धतीने विरोधी पक्ष या निवडणुकीच्या संदर्भात हालचाली करत आहे. अशा हालचालींना पुरून उरण्याचे राजकीय चातुर्य इंदिराजींजवळ आहे. त्यामुळेच विरोधी पक्षांनी 'एकमताने उमेदवार ठरवू या' असा गळा काढला असला तरी त्या प्रतिसाद देत नाहीत. पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्यामध्ये सामंजस्य असले तर ते उत्तमच; पण समजा ते नसलेच तर या दोन श्रेष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये तणावपूर्ण वातावरण नसावे असे इंदिराजींना वाटते. त्यांचे व फकरुद्दिन अलि साहेबांचे छान जमले. कै. व्ही. व्ही. गिरी आणि इंदिराजी यांचेही चांगले सूत होते. संजिव रेड्डी यांची निवड काही त्यांनी केली नाही. त्यांच्या पक्षाने रेड्डींच्या नावास अनुकूलता दर्शवली होती तरी खुद्द इंदियाजींना रेड्डींचे नाव तेवढे पसत नव्हते. पुढे त्यांचे वाईट दिवस मागे पडून त्या सत्तेवर आल्यावर त्यांनी राष्ट्रपती भवनाशी तसे औपचारिक संबंध ठेवले. हा आपला मनुष्य नाही हे त्यांचे विद्यमान राष्ट्रपतीबद्दलचे मत असले तरी त्यांनी तणाव टाकले. अगदी अलिकडे हरियानाच्या राज्यपालांनी मंत्रीमंडळ बनवण्याबाबत जे निर्णय घेतले ते राष्ट्रपतींना आवडले नाहीत. त्यांनी या संदर्भातील आपली नाराजी पुरेशा परखडपणे व्यक्त केली; परंतु इंदिराजींनी लगोलग त्यांची भेट घेऊन वातावरण अगदीच गढूळ होणार नाही याची दक्षता घेतली. निवडणुकीनंतर वारंवार राष्ट्रपती भवनात जाऊन चर्चा करणे त्यांना आवडणार नाही तेव्हा अशा चर्चेची वेळच येऊ नये या दृष्टीनेच त्या उमेदवाराची निवड करतील यात संदेह नाही. एकमताने उमेदवार निवडू या. असा प्रस्ताव विरोधी पक्षांनी पुढे ठेवला. त्या वेळी इंदिराजी बचावात्मक पवित्रा घेतील असा विरोधी पक्षांचा अंदाज होता; पण इंदिराजींनी कोणताच पवित्रा न घेऊन आधी निम्मी हवा काढून टाकली आणि मग ज्येष्ठ विरोधी पक्ष नेत्यांच्या गाठी–भेटी घेऊन आपल्याला पसंत असलेल्या उमेदवाराची नावे पुढे रेटली. विरोधी पक्षांना न दुखवता तसेच सर्वसाधारण जनतेमध्येही नाराजी पसरणार नाही अशा पद्धतीने इंदिराजी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचे खटले आवरतील. आज तरी वातावरण असे आहे की बहुधा निवडणूक टाळली जाईल; परंतु निवडणूक झालीच तर ती अगदीच एकतर्फी असेल आणि त्या निवडणुकीद्वारा इंदिराजींचा उमेदवार राष्ट्रपती भवनात प्रवेश करील. संभाव्य आणि सध्या चर्चेत असलेल्या नावाचा विचार केला आणि इंदिराजींचा या निवडणुकीकडे पाहण्याचा दूरदर्शी दृष्टीकोन लक्षात घेतला तर हा मजकूर प्रसिद्ध होउपर्यंत बी. डी. जत्ती राष्ट्रपती भवनाच्या दिशेने वाटचाल करू लागले असतील; आणि त्यातून समजा जत्ती यांचे नाव मागे पडलेच तर त्यांच्या नावाबरोबर जो गुण समूह आहे त्याच्याशी ज्यांची कुंडली तंतोतंत जुळते अशीच व्यक्ती त्यांच्याऐवजी निवडली गेलेली असेल !

# □ या ! काश्मीरचे दरवाजे खुले आहेत !

शेर–ए–कश्मीर शेख अब्दुल्ला हे या ना त्या निमित्ताने सतत प्रकाशात असतात. कश्मीरचे राजकारण आपल्या मताप्रमाणेच हालले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. जे त्यांच्या मताला विरोध करतात ते कश्मीरी जनतेचे शत्रू असा त्यांचा साधा सरळ दृष्टिकोन आहे. शेख साहेबांची मुदतही तशी आता भरत आली आहे. कश्मीर विधानसभेच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असतानाच त्यांनी आपण आता विधानसभा निवडणूक लढवणार नाही असे घोषित करून टाकले आहे. मात्र आपण बाजूला होत असतानाच सत्तासूत्रे

आपल्या पक्षाच्या इतकेच नव्हे तर आपल्या कुटुंबाच्या हातून निसटणार नाहीत अशी दक्षता त्यांनी घेतली असून आपले चिरंजीव डॉ. फरुक अब्दुल्ला याचे नेतृत्व छान रुजवले आहे. निवडणुकी जवळ आल्या असल्याने काश्मिरी मुस्लिम जनतेच्या भावना चेतवल्या जाव्यात असे काही तरी कोलित हाती असणे जरूर असल्याने शेख अब्दुल्ला यांनी अलीकडेच आपल्या विधानसभेकडून एक विधेयक मंजूर करून घेतले. या विधेयकाप्रमाणे १९५४ पूर्वी जे काश्मीरचे नागरिक होते आणि जे पाकव्याप्त काश्मीरमध्ये अथवा पाकिस्तानमध्ये अथवा अन्यत्र निघून गेले त्यांना जर आता काश्मीरमध्ये यायचे असेल तर त्यांच्यासाठी काश्मीरचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत केवळ हे संबधित लोकच नव्हे तर त्याची मुले-बाळे जरी आपले वाडवडील काश्मीरचे रहिवासी होते, हे सिद्ध करू शकली तर त्यानाही काश्मीरमध्ये मुक्त प्रवेश देण्यात येणार आहे. थोडक्यात म्हणजे जे आता जन्मसिद्ध परकीय नागरिक आहेत त्यांना त्याचे वाडवडील काश्मीरमध्ये होते हे थातुर–मातुर पुराव्याच्या आधारे सिद्ध करता आले तर शेखसाहेब अशा मडळीना काश्मीरमध्ये येण्याची मुभा देऊ इच्छितात. काश्मीर आधीच परकीय हस्तकांनी पुरेसा पोखरलेला आहे; त्यात काश्मिरचे दरवाजे जर असे सरसहा सर्वांसाठी खुले करण्यात आले तर अनेक पचमस्तंभी लोक काश्मीरमध्ये प्रवेश करणे शक्य आहे. आता हा धोका शेख साहेबाना उमगत नसेल असे कसे म्हणावे? पण या धोक्याकडे कानाडोळा करून ते काश्मीरमध्ये परत येऊ इच्छिणाऱ्या मंडळीसाठी काश्मीरचे दरवाजे उघडू इच्छितात. या संदर्भात जम्मू-काश्मीर विधानसभेने मजूर केलेले विधेयक आता राज्यपालाकडे पाठवण्यात आले आहे. राज्यपाल बी. के. नेहरू हे या विधेयकाच्या संदर्भात फारसे अनुकूल नाहीत. अर्थात विधानसभेने मंजूर करून पाठवलेल्या या विधेयकाच्या संदर्भात ते फारसे काही करूही शकत नाहीत. तूर्तास त्यांनी हे विधेयक भारत सरकारच्या ॲटर्नी–जनरलकडे मतप्रदर्शनार्थ पाठवले आहे. त्यांची ही कृती घटनात्मकदृष्टया कितपत समर्थनीय आहे या बाबतही दुमत आहे. दरम्यान देशाच्या इतर भागातून आणि केंद्रशासनाकडूनही या विधेयकाला विरोध होत आहे. इतकेच नव्हे तर अशा स्वरूपाचे विधेयक मंजूर करून घेऊन जम्मू–काश्मीर विधानसभा आपल्या अधिकारांचे उल्लंघन करत आहे असेही केद्राचे मत आहे. शेखसाहेबांचे त्या बाबत म्हणणे असे की, विधेयक विधानसभेपुढे ठेवण्यापूर्वी आपण या बाबतीत केंद्रीय गृहखात्याचा सल्ला घेतला होता. आता ही बाब जर खरी असेल तर असा सल्ला विचारला गेला त्या वेळी केंद्रीय गृहखाते काय झोपा काढत होते काय ? असा प्रश्न निर्माण होतो. शेखसाहेबाना योग्य तो सल्ला वेळीच का दिला गेला नाही हेही समजू शकत नाही.

एक गोष्ट खरी की, भारत संपूर्ण काश्मीरवर दावा करत असल्याने पाकव्याप्त काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे आणि म्हणूनच या आझाद काश्मीरच्या नावे जम्मू-काश्मीर विधानसभेच्या २५ जागा मोकळ्या सोडण्यात आल्या आहेत. आझाद काश्मीर हा आपण जर भारताचा अविभाज्य भाग मानतो तर तेथील लोकाना काश्मीरच्या कोणत्याही भागात येण्यास विरोध का असावा? असा प्रश्न उपस्थित करता येईल; परंतु शेखसाहेब या मर्यादा अवाजवी ताणत आहेत. इतकेच नव्हे तर अलीकडेच त्याना या साऱ्या प्रकाराला जातीयवादाचे स्वरूप आणले असून त्या विधेयकाला अल्पसंख्य हिंदूंचा विरोध आहे असे विधान केले आहे. या विधेयकावरून वातावरण तापवायचे व आगामी विधानसभा निवडणुकीच्या वेळी मुस्लिमाच्या जातीय भावनेला फुकर घालून पदरी लाभ पाडून घ्यायचा, असे हिणकस राजकारण यामागे दडलेले आहे. अगदी अलीकडेच पंतप्रधानानी याबाबत राष्ट्रपतीची भेट घेतली व या विधेयकाबाबतचा केंद्र शासनाचा दृष्टिकोन स्पष्ट केला. या विधेयकाला मजुरी तर मिळू नये आणि ती दिली जात नाही म्हणून शेखसाहेबाना त्याचा राजकीय फायदाही उठवता येऊ नये या दृष्टीने केंद्र शासनाचे प्रयत्न आहेत. इदिराजी आणि शेखसाहेबांचे संबंध सलोख्याचे नाहीत. त्यात या विधेयकाच्या बाबतीत काश्मीर शासनाने आग्रही भूमिका घेतली असल्याने हे संबंध आणखीनच ताणले गेले आहेत. शेखसाहेबाना अभिप्रेत आहे अशा पद्धतीने जर काश्मीरचे दरवाजे उघडले गेले तर देशाच्या सरहद्दीवर असलेल्या या नाजूक राज्यामधील परिस्थिती आणखी बिघडेल यात कोणताही संदेह नाही या विधेयकाबाबत शेख अब्दुल्ला यानी जी जातीय भूमिका घेतली आहे त्याबाबत काश्मीरचे माजी राज्यपाल करणसिंग यानी तीव्र चिंता व्यक्त केली आहे शेखसाहेबाची कितीही इच्छा असली तरी राष्ट्रीय हिताचा विचार करता काश्मीरमध्ये असा सरसहा मुक्त प्रवेश देणे परवडण्यासारखे नाही. विविध नेत्यानी काश्मिरच्या मुख्यमंत्र्यानी या विधेयकाबाबत जी ताठर भूमिका घेतली आहे त्याबाबत आश्चर्य व्यक्त केले असून या प्रकरणी जातीय राजकारण खेळवले जाऊ नये अशी इच्छा व्यक्त केली आहे. शेख अब्दुल्ला यांचे आजवर उदंड चोचले पुरवण्यात आले; पण त्याच्या परत येण्याचे फायद्यापेक्षा तोटेच अधिक झाले. आता त्यानी आपल्या राज्य विधानसभेकडून मंजूर करून घेतलेल्या विधेयकाला कायद्याचे स्वरूप आले तर बेदिली माजल्यावाचून रहाणार नाही आणि म्हणूनच हे विषारी विधेयक बाजूस सारून शेख अब्दुल्ला यांना त्यांच्या मर्यादा दाखवून देणे जरूर आहे. ☐


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

फिरोझ रानडे

# श्याम वर्षाचा झाला नाही तोच....

‘काय ग राधा, तुला काय काय वाटते मंत्र्यांना बोलवावे की बोलावू नये?’ श्याम बाल्कनीत खुर्चीवर बसून मनाशी गंभीरपणे विचार करत होता राधा बाल्कनीत आली आहे ह्याची त्याला तिच्याकडे न बघताच कल्पना आली होती.त्याने तिच्याकडे न बघताच तो प्रश्न विचारला होता. मराठी नाटकातून पूर्वी कसे व्हावयाचे ? प्रेमाचे गाणे असो वा रागावणे असो, ते त्या पात्राकडे बघून म्हटले वा बोलले जावयाचे नाही. सगळी वाक्ये प्रेक्षकाकडे बघून फेकली जावयाची; तरी पण ते वाक्य ज्या पात्राला उद्देशून असेल ते पात्र त्याचे उत्तर देत असे वा उत्तरादाखल अभिनय करत असे.

‘नच सुंदरि करू कोपा’ हे गाणे कोणाही कृष्णाने ‘सुंदरी’कडे बघून म्हटल्याचे बघितले आहे कोणी ? ह्याची दोन कारणे संभवतात. एक तर रंगभूमीवर सुंदरी नसे सुंदरा असे. कदाचित त्या कृष्णाच्या मनात प्रेक्षकातल्याच कोणा सुंदरीला उद्देशून कोपा करू नकोस म्हणून विनवायचे असेल; पण ह्याचा अर्थ रंगभूमीवरची सुंदरी कोपा करत नसे असे नाही ती कोपाचा अभिनय करत असे.

राधाने मराठी रंगभूमीवर कधी काम केले नसले तरी ती मराठी संस्कृतीत वाढलेली होती. त्यामुळे तिला प्रेक्षकाकडे फेकलेल्या वाक्यांना उत्तर देण्याची सवय होती. सर्वसामान्य तऱ्हेचा प्रश्न असता तर तिने योग्य ते उत्तर दिलेही असते; पण प्रश्न असामान्य तऱ्हेचा व असामान्य लोकांबाबतचा म्हणजे मंत्र्यांच्याबाबतचा असल्यामुळे ती भांबावून गेली.

खरं म्हणजे राधाचं–बाकी लोकांच्या दृष्टीने फालतू; पण तिच्या दृष्टीने महत्त्वाचा असा काही तरी प्रश्न श्यामकडे घेऊन आली होती; पण आता श्यामच स्वत: हरवल्यासारखा गंभीरपणे विचार करत होता. तो तिचा प्रश्न काय सोडवणार ?

गेले चार–पाच महिने श्यामचे असेच चालले होते. अगदी नक्की बोट ठेवून बोलावयाचे म्हणजे जेव्हापासून श्याम कथा वगैरे लिहायला लागल्यापासून म्हणजे लेखक झाल्यापासून श्याममध्ये जमीन–अस्मानाचा फरक पडला होता. पूर्वी श्याम फार बोलका वा बडबड्या म्हणून प्रसिद्ध होता. आता त्याचे बोलणे खूप कमी व जबाबदारीचे होत असे. पूर्वी तो विचारी म्हणून प्रसिद्ध नव्हता. आता तो तासचे तास गाठ–निरगाठ–उकल–अर्थात साहित्यातली करण्यात घालवत असे.

कधीकधी तो मोठा सुस्कारा टाकून, ‘आपण काय ह्या भलत्याच जातीत जन्माला आलो आहोत’ असे म्हणत असे. प्रथम राधाला त्याच्या बोलण्याचा अर्थ कळला नव्हता. त्यामुळे तिला त्याचा फार राग आला होता. आपण अगदी ‘अे’कारान्त कोकणस्थ मंडळी, आपणच आपल्या जातीविषयी असे म्हणावयाचे म्हणजे काय ? आता बऱ्याच वेळा ह्या जातीचे गुण बघून आपला जातवालासुद्धा त्याला ‘भलतीच’ जात म्हणण्याचा संभव असतो, नाही असे नाही.

पण श्याम तसे भलतेच घडी–घडी म्हणू लागला तेव्हा राधाने त्याची कान–उघाडणी केली. त्या कान उघडणीला श्यामने दिलेल्या उत्तराने तिचे समाधान झाले होते श्याम म्हणाला होता, ‘ह्या जातीत जन्माला आल्यामुळे मला फक्त मध्यमवर्गावरच लिहिता येते व त्या लिहिण्याची आजकाल तेव्हढी चहा राहिली नाही. हाच जर मी कोणी दलित म्हणजे मांग, गारुडी वगैरे असतो तर ह्याच्यापेक्षा किती तरी मोकळेपणाने नाव, पैसा व वाहावा मिळवता आली असती !’

‘नशीब आपले दुसरे काय?’ राधा श्यामपेक्षाही खोल सुस्कारा टाकून म्हणाली होती. मध्ये कोणा दलित लेखकाला फोर्डसाहेबाची वा रोकेफेलरसाहेबाची जंगी रक्कम मिळाल्याचे वाचून तिच्या पोटात असंख्य लेखक व त्यांच्या असंख्य बायकांप्रमाणे दुखले होते व आपल्या ‘भलत्या’ जातीबद्दल तिच्याही मनात खूप चीड निर्माण झाली होती.

आजचा, श्यामने प्रेक्षकात फेकलेला प्रश्न तिला कळला नाही मंत्र्यांना बोलवावे की नाही ? कश्याकरता मंत्र्यांना बोलवावयाचे बाई ? मुलीचे लग्न मागल्या वर्षीच होऊन गेले होते. त्या वेळी कोणाला बोलवावे, कोणा बोलवू नये, परत कोणाला जेवायला बोलवावे व कोणाला फक्त स्वागतसमारंभाला बोलवावे ह्या विचार, खल व वादावादी होऊन गेली होती. मुलाच्या मुंजी सुधारकपणाच्या नावाखाली पण मुळात पैसा वाचेल म्हणून करावयाच्याच नाहीत असा निर्णय मागेच घेतला गेला होता. आता मुले मुंजीला मोठी व लग्नाला लहान अश्या अवस्थेत होती. आजकाल त्याचे हॅपी बर्थडे पण साजरे केले जात नसत. खरं म्हणजे आता सत्यनारायणसुद्धा करू घातला नव्हता. मग मंत्र्यांना बोलवावे की नाही ? म्हणजे कधी व कशाकरता ?

बर, मंत्री तरी काय एका तऱ्हेचे वा जातीचे आहेत? वैद्य हे आडनाव कोकणस्थ देशस्थ व कायस्थ ह्या तिन्ही जाती–पोट-जातीत असते. त्यात उरवठ्या–पुरवठ्याला कुटून औषध देणारे वैद्य असतात व असे कुटलेले वैद्य बनवण्याच्या आता तर काय गावोगावी शाळा निघाल्या आहेत.

त्याच चालीवर मंत्र्यांचे पण आहे मंत्री काय एक तऱ्हेचे आहेत काय? क्रिकेट खेळणारे मंत्री, विनोदी लेख लिहिणारे मत्री. मंत्र सांगणाऱ्याना मंत्री म्हणत नाहीत ही मजेची गोष्ट तशीच नशिबाचीसुद्धा. त्यांना भटजी म्हणतात नाहीपेक्षा किती तरी गोंधळ ह्या मंत्री नावामुळे झाला असता.

आता कोणीही ह्या भाबडेपणाला हसून म्हणेल, इतकी साधी गोष्ट कळत नाही? अहो, मंत्री म्हणजे राज्यकर्ते मत्री–जे मुख्यमत्र्यांच्या वा पंतप्रधानाच्या फडताळात असतात म्हणजे colainet मध्ये असतात ते व तत्सम मत्री.

आता असले मंत्री तरी एक तऱ्हेचे आहेत? प्रथम म्हणजे चालू मंत्री. येथे चालू शब्दाचा वाईट तेवढा अर्थ घेण्याचे कारण नाही. चालू मत्री म्हणजे सध्या जे राज-शकट चालवतात ते मंत्री त्यात परत दोन भेद आहेत एक दिल्लीचे व एक गल्लीचे. ह्याचा अर्थ दिल्लीच्या मंत्र्याना गल्लीत भाव नसतो वा गल्लीच्या मंत्र्याना दिल्लीत महत्त्व नसते असे नाही. येथे फक्त भेद स्पष्ट केले आहेत.

देवाच्या वा देवीच्या दयेने आता सगळीकडे खऱ्या कॉंग्रेसचे राज्य असल्यामुळे सगळे मंत्री कॉंग्रेस (I) म्हणजे कॉंग्रेस पहिल्या वर्गाचे असतात. नाही तर मध्ये काही दिवस जनता वर्गाचे, जपानी बनावटीचे व डालडा प्रकृतीच्या मंत्र्याचा चागलाच सुळसुळाट झाला होता. ह्या जनता मत्र्याना बोलवावे किंवा नाही असा कधी वादच निर्माण झाला नाही. एक तर ती बालके अल्पायुषी होती व ते मंत्र्यासारखे वागत नमल्यामुळे त्याच्या मत्रीपणाबद्दल व्हावा तसा दबदबा निर्माण झाला नव्हता.

काही व्यक्ती अशा असतात की, त्या कै. असूनही त्यांचा चा. इतका दबदबा असतो. येथे कै. हे व्यक्तिला उद्देशून नाही, त्याच्या मंत्रीपणाला उद्देशून आहे. ह्याचा अर्थ असा की, काही मंडळी पूर्वाश्रमीची मंत्री असूनही चालू मंत्र्याइतके वजन ठेवून असतात. आता अश्या कै. मंत्र्याना बोलवावे की नाही असा उप–प्रश्नही राधाच्या मनात आला.

असे सगळे प्रश्न राधाच्याच पुढे उभे राहिल्यामुळे श्यामच्या 'मंत्र्याना बोलवावे की नाही' ह्या प्रश्नाला तिला उत्तर सुचेना. तेव्हा ती होती तशीच आपला प्रश्न बरोबर घेऊन व श्यामला व त्याच्या प्रश्नाला बालकनीत सोडून घरात गेली.

एखाद्या स्थानकावर आगगाडी काही वेळ थाबते व मग परत सुरू होऊन परत वेग घेऊ लागते, त्याप्रमाणेच श्यामची विचारगाडी राधास्थानकावर काही काळ थाबली, परत सुरू झाली व वेग घेती झाली. मत्री–मत्री-मंत्री-बोलवावे?-बोलवावे?बोलवावे? कथेचा नुसता मथळा पाहिला तर कोणालाही छपाईत काही चूक झाली आहे असेच वाटेल आतापर्यंतच्या श्याम-लीलावरून तो किती वर्षांचा असणार ह्याचा लोकानी अंदाज केला असणार व ह्या कथेचा मथळा –श्याम ६१ वर्षांचा झाला नाही तोच–असा असावयास पाहिजे होता असा दुसरा ठाम अंदाज करतील. आता ६१ वर्षांचाच का अंदाज? ५१ वर्षांचा का नाही?

६१ वयाला महाराष्ट्रात व मराठी साहित्यात फार मोठे स्थान आहे. ६० वर्षापर्यंत लपून असलेले गुण ६१ व्या वर्षी फार प्रखरतेने चमकू लागतात. पूर्वी जसे 'मेलेल्या म्हशीला मणभर दूध' त्याचप्रमाणे 'एकसष्टी झालेल्यात बासष्ट गुण' अशी नवी म्हण तयार करून कोणा मासिकाचा एक अक व एक रुपया उकळता येईल. अर्थात एक अक व एक रुपया हे पूर्वीचे भाव दिले आहेत. आता बहुधा तीन अक व तीन रुपये देत असावेत.

ही सगळी लावण व ६१ वर्षासंबंधी खडूस लिहिण्याने एकच सागावयाचे आहे. ते म्हणजे मथळ्यात तशी काही छपाई–चूक नाही. तो आहे तोच म्हणजे 'श्याम वर्षांचा झाला नाही तोच– ह्य मथला बरोबर आहे

मराठी भाषेत चागली नाट्यछटा लिहिणारे दिवाकर हे पहिले व शेवटचे लेखक होऊन गेले. त्याची 'चिगी महिन्याची झाली नाही तोच...' नावाची एक मोठी बहारीचो नाट्यछटा आहे. त्या नाट्यछटेचे सार खालीलप्रमाणे आहे.

चिंगीची आई चिंगीला पायावर घेऊन पूर्वीच्या बायका लहान मुलांना न्हायला घालत तशी घालत असते व न्हायला घालता घालता स्वत शीच पण चिंगीला उद्देशून बोलत असते, 'आता तू मोठी होणार, तुझे शिक्षण होणार, मग तुझे लग्न होईल, मग पहिल्या बाळंतपणाला मात्र माहेरी यावे लागेल हा. आताच सागून ठेवते. नाही वगैरे काही चालावयाचे नाही!'

आणि हे सगळे केव्हा? तर चिंगी अजुनी महिन्याचीही झाली नव्हती तोच...तिची आई तिच्या शिक्षणाची व लग्नाचीच नव्हे तर तिच्या पहिल्या बाळंतपणाची स्वप्ने पाहू लागली होती! मनाचे असेच आहे. 'मन चिंती ते वैरी ना चिंती' असे जसे म्हणतात तसे 'मन मारे अशी भरारी! गरुडालाही पडावी भारी! मनाच्या बाबतीत म्हणता येईल.

श्याम गेल्या पाच–सहा महिन्यापासून काही कथा वगैरे लिहू लागला होता. त्याने ह्या साहित्यिक कामाची दोन भागात विभागणी केली होती. वाचन व मनन हे घरी करावयाचे. काही कल्पना वगैरे सुचली की ती राधा व मुले म्हणजे मुख्यतः राधालाच सागावयाची व लिहिण्याचे काम कचेरीत करावयाचे.

श्याम सरकारी कचेरीत होता त्यामुळे लिहायला लागणारा वेळ, साहित्य व सुविधा त्याला भरपूर प्रमाणात मिळत कचेऱ्याची एक खुबी आहे तुम्ही जर जागेवर नसलात वा असून वर्तमानपत्र वा पुस्तक वाचत असलात तर त्याबद्दल फार आरडाओरड होते. पण जर तुम्ही आपल्या जागीच बसून काही लिहीत असलात तर आरडाओरड तर सोडूनच द्या तुमच्याकडे चक्क दुर्लक्ष होते! श्यामने ह्या दुर्लक्षाचा खूप फायदा घेतला.

अशाच काही दिवस कथा लिहावयाच्या. मग अमिताभ बच्चन-कथा वा मुकरी कादंबरी म्हणजे लाबड्या कथा वा बुटक्या कादंबऱ्या लिह'वयाच्या. हल्ली असे हे लाबड्या व बुटक्याचे पेवच फुटले आहे जणू. पूर्वी धान्याची वगैरे पेवे फुटत. आता तो सभव राहिला नाही, तर ह्या साहित्यिक पिकांची पेवे फुटतात.

असे एकदा कथाकार व लघुकथाकार म्हणून बस्तान बसले की, मग नाटकाकडे वळावयाचे. वळताना मात्र एक काळजी

घ्यावयाची. आता 'जुडगां' चा वा 'जाग येण्याचा' जमाना गेला आहे. तो तर गेलाच आहे; पण साधं-सरळ आयुष्य व त्यात येणारे नाट्य ह्यात काही मजा राहिली नाही आहे. काही म्हटले वा भाव आणला तरी शेवटी जनता नाटकाला मजा मारायला म्हणूनच येते व पैसा व वेळ खर्च करते. सगळीकडे वैफल्य आहे–जग रसातळाला जात आहे अशा भावनेने लिहिलेली नाटके मात्र नट-मंडळी मोठा रस घेऊन बसवत असतात व प्रेक्षकमंडळी तेव्हढाच रस घेऊन पहात असतात.

पण नाटकाचे काही भरवशाचे कूळ राहिले नाही. मोठमोठ्या कथालेखकांचे व कादंबरीकाराचे नाटकापायी लागून तोंड फुटले आहे व त्या फुटण्यामुळे रंगले आहे; पण नाटक रंगो न रंगो माणसाची एकदा का लेखक म्हणून प्रसिद्धी झाली की मग त्याच्या साहित्याला मरण नाही.

जर नवीन काही लिहावयाचे सुचले नाही की आपल्या न. चिं. केळकर व बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाडावर भारदस्त लेख ठोकून देता येतो. खरं म्हणजे आता ह्या दोघांच्या जीवनाचा आजच्या जीवनाशी काही म्हणून काही संबंध राहिला नाही आहे. आता केळकर जहाल होते की मवाळ हे सिद्ध करून वा सयाजीमहाराज कसे धोरणी व जनहितदक्ष होते हे सिद्ध करून त्यांचे इतिहासातले स्थान काय बदलणार आहे? ह्या थोर लोकांचा फायदा हाच की, वर्षानु वर्षे भाकड लेखांना ते विषय म्हणून चालतात.

जर हेही करावयाची व, त्याच्याकरता थोडे-फार वाचावयाची तयारी नसेल तर मग आत्मचरित्रात्मक लेख आहेतच. मात्र ह्या लेखनप्रकाराला बाकी कोणत्याही वाङ्मय-प्रकारापेक्षा फार प्रखर कल्पनाशक्ती लागते

आता आत्मचरित्रात्मक तरी लिहून लिहून किती लिहिणार? अशा वेळी संपादकच लेखकाच्या मदतीला येतात. तेच लेखकाला विषय सुचवतात वा काही प्रश्नावली देतात. आता कधीकधी तर ते लेखकाला प्रिय पत्नीबद्दलच लिहायला सांगतात. आता असले लेख म्हणजे तारेवरची कसरतच असते. बहुतेक लेखक अशा वेळी ती तार जमिनीवर ठेवूनच त्यावर चालतात!

आता चिंगीला न्हाऊ घालता घालता बाळंतपणाचा प्रश्न आला तसा श्यामच्या गरुडझेपीत मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपणाचा आला. कारण आजकाल प्रत्येक लेखकाला आपण संमेलनाध्यक्ष व्हावे असे वाटते. त्यात काही गैरही नाही व जे कोणी अध्यक्ष होताहेत ह्यावरून ते कोणालाही शक्य व्हावे. फक्त त्याकरता कराव्या लागणाऱ्या खटपटी–लटपटी करण्याची तयारी असावयास पाहिजे. अर्थात श्यामची त्याला तयारी होतीच.

तेव्हा आता आपली निवड तर पक्की झाली आहे हे गृहीत धरून पुढे काय काय करायला लागेल ह्याचा श्याम विचार करू लागला. प्रथम म्हणजे खूप लांबडे व कंटाळवाणे भाषण लिहून काढावयाचे मराठीत ज्याला हात धुऊन घेणे म्हणतात तसे सगळे अध्यक्ष ह्या भाषणात हात धुऊन घेतात. जसं काही ह्यांना पूर्वी कधी बोलायला मिळालेच नाही आहे वा ह्यापुढे कधी बोलायला मिळणारच नाही आहे. वा त्यांच्या आजपर्यंतच्या बोलण्याचालण्यावरून वा लिहिण्यावरून लोकांना त्यांचे विचार व मते कळलीच नाही आहेत.

पण भाषणाचा प्रश्न तसा काही महत्वाचा नाही, हे श्याम चाणाक्ष असल्यामुळे त्याच्या तावडतोब लक्षात आले. नाही तरी अध्यक्षाचे भाषण वाचतो कोण? म्हणजे स्वतः अध्यक्षमहाराज सोडून व ऐकतो तरी कोण इतके मन लावून? म्हणजे त्याची मंडळी सोडून!

मग कर्नाटकात जी मराठी गावे व विभाग गेले आहेत त्याचा प्रश्न त्याचे मनासमोर आला. त्याबरोबरच सरकारचे वेगवेगळ्या बाबतीतले, मुख्यत: अनुदान व बक्षिसा-संबन्धी धोरण, दलित लेखक व त्यांचे वाङ्मय असे वेगवेगळे प्रश्न श्यामच्यासमोर मोठ्या प्रखरतेने आले; पण सधा म्हटल्या-प्रमाणे श्याम चाणाक्ष असल्यामुळे त्याने ह्या प्रश्नापेक्षाही मोठा ज्वलंत प्रश्न मराठी साहित्यापुढे आहे हे झटकन ताडले.

तो प्रश्न म्हणजे दुसरा तिसरा कोणताही नसून पहिलाच म्हणजे मंत्र्यांना साहित्य-संमेलनाला बोलवावे की बोलवू नये हा होय. श्याम त्यावर विचार करू लागला. असा बराच वेळ गेला. आता भूक पण लागली होती. तेव्हा जेवून परत विचारास बसावे ह्या विचाराने तो उठला. तेव्हढ्यात राधाच जेवायचे तयार आहे म्हणून सांगायला आली स्वैपाक करताना तिने श्यामला विचारलेल्या प्रश्नावर विचार केला होता. आता समस्त मराठी माणसाला मंत्र्यांना बोलवावे की बोलावू नये ह्या प्रश्नामागचे भाव माहीत आहेत. मत्र्याना बोलवावे की बोलावू नये म्हणजे संमेलनाला बोलवावे की बोलावू नये असे असते.

'मग राधा, काय वाटते तुला?'

'हे बघा, आयुष्यात एकदा संमेलनाध्यक्ष व्हायला मिळणार. मंत्री आले तर त्याचा गाजावाजा जास्त होणार. आकाशवाणीवर व दूरदर्शनवर जाहिरात होणार. लोकांना बोलायला काय होते? मी सांगते, तुम्ही जर अध्यक्ष निवडून आलात तर मंत्र्यांना जरूर बोलवावे. नाही म्हटले तरी ते जनतेचे प्रति-निधीच आहेत; पण जर दुसरा कोणी सोम्या-गोम्या अध्यक्ष झाला तर मात्र मंत्र्यांना अजिबात बोलावू नये म्हणून आरडाओरडा करावा!'

श्याम राधाकडे मोठ्या आदराच्या भावनेने पाहू लागला व त्याचे न जेवताच पोट भरले. □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे



# संगीताच्या विचारांनी दरवळलेले सात दिवस

डॉ. श्रीरंग संगोराम

पुण्यात गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात 'गानवर्धन' या संगीत प्रसारक संस्थेतर्फे 'मुक्त संगीत–चर्चा 'सप्ताह' आयोजिण्यात आला. तो अत्यंत यशस्वी रीतीने पार पडला. सर्वांना खुली असणारी संगीतावरील चर्चा आणि तीही सप्रयोग व बैठकींतून घेण्याचा अभिनव उपक्रम महाराष्ट्रात तरी प्रथमच अस्तित्वात आला आणि 'माणूस (१२१६)' च्या 'उत्तरमीमांसा' ने देखील त्याची मनापासून दखल घेतली इतकेच नव्हे तर काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून पुढील चर्चेला वाट करून दिली.

'गानवर्धन' ही श्री. कृ. गो. धर्माधिकारी यांची चार वर्षापूर्वी स्थापन झालेली संस्था, धर्माधिकारी यांनी निखळ समाजसेवा घडावी म्हणून सुरू केलेली. खूप मेहनत घेऊनही मैफलीत न येऊ शकलेल्या कलाकारांना हक्काचं रंगपीठ मिळवून द्यायचं ही तिची प्रतिज्ञा. दर महिन्यास न चुकता अशा संगीत–बैठका झालेल्या आहेत. यातूनच 'मुक्त संगीत–चर्चा सप्ताह' हा कार्यक्रम निष्पन्न झाला यशाची फारशी आशा नव्हती. एखाद्या शाळेच्या वर्गखोलीत २५–३० डोकी जमताल एवढीच अपेक्षा; परंतु कल्पनेबाहेर यश मिळालं आणि २५ मे च्या दिवशी पं. ओंकारनाथांचे शिष्य श्री. पद्माकर बर्वे व सौ. मालती बर्वे यांच्या भाषणानं १२५ श्रोत्यांच्या उपस्थितीत आणि 'महाराष्ट्र हेरल्ड' चे संपादक श्री. वाघ यांच्या अध्यक्षतेनं चर्चा–सप्ताहाचा श्रीगणेशा झाला. चर्चा–सप्ताहाचं बहिर्वर्तुळ श्री. धर्माधिकारी आणि श्री. पुरुषोत्तम गोडबोले यांनी उत्तम सांभाळलं. सप्ताहाचं अंतर्वर्तुळ म्हणजे प्रत्यक्ष चर्चा–संयोजनाचं काम डॉ. श्रीरंग संगोराम यांनी केलं. प्रवेशमूल्य अर्थातच नव्हतं. अनेक क्षेत्रांतील तोलामोलाच्या 'सभ्यां' च्या उपस्थितीत हा सप्ताह रोज रंगतच गेला आणि त्याची सांगता श्रेष्ठ गायक–समीक्षक व चिंतक श्री. वामनराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सुविख्यात सांगीतिक डॉ. वसंतराव देशपांडे आणि कविवर्य सुरेश भट यांच्या साक्षीनं झाला.

पं. पद्माकर बर्वे यांचा 'संगीताचा उगम व त्यातील काव्य' हा विषय होता विषयाची मांडणी चर्चा–संयोजकांशी संवाद करीत करीत झाल्यामुळे तिला रंजकत्व प्राप्त झालं. शिवाय चर्चेचे सर्वच कार्यक्रम 'सप्रयोग' त्यामुळं सामान्यांना कंटाळवाणेपणा असा जाणवला नाही. बर्व्यांच्या चर्चेतून काही लक्षणीय मुद्दे पुढे आले. आधी नृत्य की आधी संगीत हे सांगणं जरी कठीण असलं तरी गायनाबरोबर हावभाव अगदी अनिवार्यपणे होतात हे पाहिलं म्हणजे सुरांची भाषा आणि नृत्याची भाषा यांचा काही दुवा जमत असावा असं लक्षात येतं. तरी पण शास्त्रीय नृत्यातले हावभाव पूर्वनियोजित आणि विशिष्ट असतात, तर गायकागणिक हावभाव बदलतात आणि ते खास हावभाव 'दर्शनीय' च असतात; पण मग स्त्री–गायिकांचे हावभाव कमी का होतात? बर्व्यांचं म्हणणं असं की, हावभाव आवाजाच्या देणगीवर अवलंबून असतात. जिथं आवाजाचा लगाव आयासान जमणारा असतो; तिथं हावभाव जास्त होतात. स्त्रियांचा आवाज सहजी लागतो; पण मग हावभाव करणाऱ्याही सिद्धहस्त गायिका आहेत ना? आणि हा स्त्रीवरील सामाजिक बंधनांचा परिणाम नसेल कशावरून? असे विचाराला गती देणारे प्रश्न निर्माण करीत ही चर्चा रंगत गेली. आपलं संगीत हे सात स्वरांवर आधारलेलं आहे. त्यात 'सा' आणि 'प' हे दोनच स्वर न बदलणारे आहेत. रे, ग, ध, नी हे कोमल होऊ शकतात तर म हा तीव्र होऊ शकतो. 'सा' आणि 'प' च्या अचलतेचं कारण काय? त्याचं असं आहे की, पुरुषाच्या गायकीतील 'स्टार्टिंग' चा स्वर 'सा' आहे. आणि स्त्रियांच्या गायनातील स्टार्टिंगचा स्वर 'प' आहे. म्हणजे असं की, स्त्रियांचा 'सा' चा जो 'पिच' आहे तो पुरुषांच्या

प' चा पिच असतो. 'चर्च' मध्ये स्त्रीपुरुषांचं एकत्र गायन होतं. त्यात याचा अनुभव सहज मिळतो.

तेव्हा 'सा' आणि 'प' हे स्थिर झाले आणि इतर स्वर त्यांच्या जोडीला आले. सप्तकाची स्थापना झाली; पण ते गळ्यातून प्रकट करण्याकरता शब्दाची जरुरी भासू लागली. म्हणून संगीताला काव्याचा आधार घ्यावा लागला; पण मग चर्चेच्या ओघात प्रश्न आला की, संगीतात काव्य महत्त्वाचं की गायन महत्त्वाचं? कर्नाटकी संगीतात गायनाच्या बांधणीला जसं महत्त्व आहे तसंच कवनालाही आहे आपल्याकडील ध्रुपद-धमारात तसंच आहे; पण अस्सल शास्त्रीय संगीतात काव्याचं स्थान काय? याही प्रश्नावर उलट-सुलट चर्चा झाली. -'तुटे वाद-संवाद तो हीतकारी' असं असलं तरी अशा प्रकारच्या वादांची लज्जत त्यांच्या चालू राहण्यात असते. श्रोतीत्यांना चाखायला मिळाली.

## पारख शाळेत होऊ द्या

'बेघर' कादंबरीच्या लेखिका आणि निर्भीड संगीतसमीक्षण करणाऱ्या सौ. शांताबाई निसळ यानी एक वेगळाच 'सूर' मांडला. त्यांचा विषय होता 'संगीताचे मानसशास्त्र'; परतु त्याचं विवेचन मुख्यतः संगीताच्या सहजवृत्ती (ॲप्टिटयूड)च्या चाचणीवर केंद्रित झालं. प्रश्न महत्त्वाचाच आहे. शालेय शिक्षणात मुला-मुलींची शारीरिक तपासणी जशी होते तशी अभिरुचीचीही तपासणी व्हायला पाहिजे एखाद्या मुलात/मुलीत संगीताची आवड फार सखोल आहे हे शालेय जीवनातच कळलं तर होतकरू पालक किंवा शाळा (तो काळ इ. स. २००० मध्ये येईल) त्याला संगीताचं दर्जेदार प्रशिक्षण देऊन त्याच्या व्यक्तित्वाची खऱ्या अर्थानं जोपासना करतील. आज शाळांच्यामधून संगीतशिक्षणाची जी परवड चालू आहे ती सर्वांना माहीत आहे. ईशस्तवन, स्वागतपद्य आणि वेगवेगळ्या स्पर्धा यात भाग घेणारी हुकमी टोळी एवढीच अपेक्षा मनात बाळगून, 'असून अडचण नसून खोळंबा' या दृष्टीनं संगीताकडं पाहिलं जातं. आरंभी संगीताच्या इतिहासाचा आढावा घेण्यात सौ. निसळ यांचा वेळ खर्च झाला. तरीही त्याचं पुढील विवेचन संगीताच्या उपजत गुणाची मानसशास्त्रीय चिकित्सा, संगीत आणि वांशिक परंपरा आणि मैफल जिंकण्याचे तंत्र या मुद्द्यांवर झालं. पाश्चात्य देशांमध्ये मुलांच्या संगीतक्षमतेची चाचणी करणारे तक्ते तयार करण्यात आले आहेत. उदा. ध्वनिमुद्रिका वाजवून आवाजाची उच्चनीचता, तीव्रता, लय, लहरीबंध (टिंबर), स्वरवाक्याचे पृथक्करण इत्यादि उपजत सामर्थ्यांची चाचणी करण्यात येते आणि त्यावरून अमुक विद्यार्थ्यास गायनाकडे, वादनाकडे किंवा केवळ रसग्रहणाकडे वळवावे असा सल्ला (गाइडन्स) देण्यात येतो. 'मैफलीचे मानसशास्त्र' असा मुद्दा घेऊन बाईंनी 'ऑडियन्स सायकॉलॉजी'च्या आधारे मैफल जिंकण्याचे काही आडाखे सांगितले.

विषय नेहमीपेक्षा वेगळा त्यामुळे चर्चाही तिककीच आगळी झाली. काही चांगले प्रश्न उपस्थित केले गेले व जाऊ शकतील. उदाहरणार्थ,पाश्चात्यानी आपल्या संगीतानुसार शोधून काढलेल्या चाचण्या आपल्याकडील स्वर, श्रुती, मीड यांच्यावर आधारित संगीताला कशा लागू करणार? याला उत्तर अर्थातच अशा चाचण्या तयार कराव्यात आहे. स्वरवाक्याचं पृथक्करण (म्हणजे एखादी लकेर घ्यायची आणि त्याची 'सारेगम' ओळखण्यास सांगायचं) ही संगीताच्या विकसित अभ्यासानंतर जमणारी गोष्ट. ती शाळेतील मुलांना कशी पेलेल? परंतु चाचणीची काही चढती मांजणी ठरवल्यास हे काही प्रमाणात शक्य होईल. उत्तम उपजत संगीतगुण असणारा शागीर्द संगीताचं केवळ व्याकरण शिकवणाऱ्या गुरूच्या तडाख्यात सापडला तर त्याची मातीच होईल. तेव्हा विद्यार्थ्यांच्या मानसिक घडणीबरोबरच गुरूच्या मानसिक घडणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. खरं तर 'संगीत कसे शिकवावे' याचं मानसशास्त्राधारित प्रशिक्षण संगीत-गुरूंना देणं फार जरुरीचं आहे. आजही आपण संगीताच्या बाबतीत तरी गुरूची 'आंधळी देवपूजा' सहन करण्याच्या अवस्थेतून बाहेर पडलेली नाही.

जास्त फी वसूल करण्याकरिता काळकाढू धोरण अवलंबणे, शागिर्दाचा मनोभंग करून त्याच्या व्यक्तिमत्वाचा कणा मोडण्यात फुशारकी मारणे असले दोष आजही गुरुमंडळीमध्ये आढळतात. या सर्व दृष्टीनी संगीताचं शैक्षणिक मानसशास्त्र या विषयाकडं लक्ष देणं आज फार अगत्याचं आहे. त्याचप्रमाणे संगीताचं खरोखरीचं रसग्रहण करण्याच्या दृष्टीनं श्रोत्यांच्या मनाची तयारी कशी करून घेता येईल हाही विचार यात येतो. कारण गायकाची खोटी स्तुती करून किंवा नको तिथं दाद देऊन किंवा दर्जेदार मैफलीत अतिसामान्य संगीताची फरमाइश करून रंग बिघडवणाऱ्या श्रोत्यामुळे मैफलीची उंची खाली येते. साराश, सौ. निसळ यानी संगीताच्या व्यवहारात उपेक्षित राहिलेल्या या संगीत-विचारात महत्त्वाची भर टाकली हे नि:संशय!

## नृत्यात काय पहावे?

सौ. सुचेता भिडे-चापेकर या 'भरतनाटयम्' शैलीतील सर्वोत्तम नर्तिकांपैकी एक. प्रत्यक्ष नृत्याबरोबरच त्यावर चिंतन, लेखन व संशोधन करणाऱ्या आणि नृत्यविषयावर प्रात्यक्षिकासह देशविदेशात व्याख्याने देणाऱ्या. त्याचं 'शास्त्रीय नृत्यकला' या विषयावरचं व्याख्यान हे अर्थातच नवीन ज्ञान देणारं असल्यामुळं ते माहितीनं ओतप्रोत होतं आणि ही माहिती भरतनाटयशास्त्राचे अभ्यासक डॉ. तारलेकर याच्यापासून इतर सर्वांना आवश्यक वाटली. तथापि भाषणोत्तर चर्चाही कमी झाली नाही.

पहिली गोष्ट ही की, नृत्याचा आस्वाद फॅण्टसीच्या रूपानं घ्यायला हवा. नाहीतर शोकाकुल झालेली नायिका नाचेलच कशी? असले प्रश्न निर्माण होत बसतील. नृत्याचे दोन भेद लक्षात घेतले पाहिजेत. एक 'नृत्त' आणि दुसरं 'नृत्य' नृत्तामध्ये नृत्याचा शास्त्रीय पक्ष असतो. मुद्राचे विविध प्रकार आणि त्यामधील भाव, पदन्यासाचे वेगवेगळे भेद या सर्वांचे एकत्रित असलेले ज्ञान म्हणजे नृत्त. भावदर्शनासाठी मुद्राभिनय कसा करावा, पदन्यासाचे कोणकोणते प्रकार कसे वापरावे याचं तंत्र 'नृत्त'मध्ये असतं. या सर्व साधनभूत सामग्रीचा उपयोग नृत्यामध्ये होत असतो. नृत्य म्हणजे कोरडा पदन्यास किंवा हावभाव नव्हे. त्यामागे काही भावसूत्र, कथासूत्र आणि एखादा रचनाबंध असतो.

आज भारतात नृत्याच्या सात पद्धती प्रचलित आहेत. दक्षिण भारतात भरतनाटयम्, कथकली, मोहिनी आट्टम् आणि कुचिपुडी या

शैली मिळतात, तर जयपूर, लखनौ येथील कथ्यक, मणिपूर येथील मणिपुरी आणि ओरिसामधील ओडिसी या आणखी तीन शैली आहेत. (इथे जाता-जाता हे लक्षात येईलच की, महाराष्ट्राची अशी कोणती शास्त्रीय नृत्यशैली नाही.) या सर्व नृत्यशैलींचा उगम भक्तीच्या प्रेरणेतून झालेला आहे. यांचं मूळ स्थान तामिळनाडू आहे. भरतनाट्यम्‌चा जन्म इथेच झाला. मात्र हे नाव अगदी अलीकडे ५०-६० वर्षांपूर्वी प्रचारात आलं. मुळात याला दासी-आट्टम् म्हणत. अर्थ आहे देवदासींनी देवाच्या मूर्तीपुढे भक्तिभाव प्रकट करण्याकरिता केलेली नृत्यसेवा. देवदासींच्या नावाचा संपर्क नको म्हणून भरतनाट्यम् हे भारदस्त नाव. यात फक्त एकच नर्तकी नृत्ताच्याद्वारे देवासमोर नर्तन करते. या वेळी प्राय: तामिळ भाषेतून कवन म्हटले जाते. याच नृत्याचा ओरिसामध्ये झालेला अवतार म्हणजे ओडिसी नृत्यप्रकार. कथकलीमध्ये रामायण-महाभारताच्या कथासूत्रावर तासन तास नृत्य रंगवलं जातं यात प्रामुख्याने पुरुष नर्तक असतात. कथ्यकमध्ये कथासूत्र असं नसतं. त्यात 'नृत्ता'चं प्रमाण अधिक असतं. भावदर्शनाला आणि पदन्यासातील करामतीला इथं विशेष प्राधान्य आहे. कुचिपुडी (आंध्र) मध्ये प्राय: तीनच पात्रं असतात आणि त्यातून कृष्ण व सत्यभामा-रुक्मिणीची कथा प्रस्तुत केली जाते. सर्व शैलींच्यामध्ये मुद्रांचं मूळ रूप समानच असत; पण त्यांच्या वापरात फरक असतो. व्याख्यात्यांनी या मुद्रांची सप्रयोग माहिती दिली आणि त्याचबरोबर हेही दृष्टोत्पत्तीला आणून दिलं की, अति जलद पदन्यास किंवा धामाधूम होणं हे यशस्वी नृत्याचं गमक नाही. सहजपणे न दमता नृत्य सादर झालं पाहिजे.

चर्चेतून जो मुद्दा उपस्थित झाला तो नृत्यातील काव्य आणि प्रत्यक्ष वर्तन याच्यातील संबंधावर केंद्रित होता. भरतनाट्यम्, कथकली ही नृत्यं पाहताना तामिळ-तेलगू भाषा आपल्याला कळत नाही मग केवळ 'नृत्त' पाहून समाधान मानायचं काय? मराठी गीतावर नृत्य का बसवू नये? व्याख्यात्यांनी दोन मुद्दे सांगितले. एक म्हणजे या नृत्यप्रकारांची जन्म-जोपासना भारताच्या पूर्वकिनारपट्टीवर झाली असल्यामुळं त्याची सरचना तिथल्या संगीताला धेऊनच येणार. दुसरं असं की, तंजापूरच्या मराठी राजानी नृत्याकरिता दाक्षिणात्य चालीवर मराठी कथनं रचली आहेत. त्यावर सौ. भिडे विशेष संशोधन करीत आहेत आणि नृत्यात त्यांचा उपयोगही करीत आहेत. (त्यांचे गुरू पं. पार्वतीकुमार यांचा या विषयावरील ग्रंथही लवकरच प्रकाशात येणार आहे.) परंतु दाक्षिणात्य चालीवर मराठी कवन म्हणण्याने हे नृत्य महाराष्ट्रीय बनू शकेल का? जर कथ्यक नृत्यात हिंदी भाषेतील कथनं हिंदुस्थानी संगीताच्या चालीवर म्हटली जाऊ शकतात तर महाराष्ट्रात असे का होऊ नये? अशा प्रश्नावरून हे लक्षात आलं की, महाराष्ट्रात नृत्यातील नवीन प्रयोगाला भरपूर वाव आणि आव्हान आहे.

## संगीत आणि कविता

'कविता आणि संगीत' या विषयावरील वाद अपेक्षेप्रमाणं रंगतदार झाला. डॉ. संगोराम यांनी हा विषय कविता व गायन यांची सप्रयोग उदाहरणं सादर करून मांडला. यासाठी साहित्याचा व्यासंग आणि संगीताचे (एके काळी) गुरुमुखातून प्राप्त केलेले ज्ञान याचा त्यांनी उपयोग करून घेतला. कविता आणि संगीत यांचं नातं अतूट आहे अशी समजूत मराठी समाजात भक्कमपणे रुजली आहे; परंतु संगीत हे सच्चा कवितेला तारक ठरण्याऐवजी बाधक ठरण्याचीच शक्यता जास्त असते. कवितागायनातून संगीताचाही आविष्कार हवा तसा पूर्णत्वानं होत नाही आणि कवितेतील भावाचंही व्यतीकरण मूळ कवितेच्या अंगानं होऊ शकत नाही. गाण्याचे कायदे वेगळे, कवितेचे कायदे वेगळे. संगीत आणि कविता ही कलेतील दोन 'एव्हरेस्टस्' आहेत. त्यांची सरमिसळ केली की, त्यांची उंची खाली येणारच. सुरांचं काम रंजन हे आहे. शब्दाचं काम खोल भावार्थ आणि जीवनार्थ रसिकाच्या हृदयात आणि मेंदूत पोचविणे हे आहे. त्यामुळं कवितेतील प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह, उपरोध, उपहास, तिरकसपणा यांचं व्यतीकरण तंबोऱ्याच्या आधारावर चढ-उतार करणारे स्वर आणि तालचक्राच्या चौकटीत अडकलेलं गायन करू शकणार नाहीत.

कविता गायची म्हटलं की, सादरीकरण आलं. मग त्यातून समुदायाला रिझविण्याची जबाबदारी, त्यासाठी सोपेपणा आणि त्यातून काव्याची कृत्रिम रचना हे ओघानं येणार. अशा प्रकारच्या शब्दप्रधान गायनात आज कवितांचे तीन स्तर दिसतात. काव्यभानाची कविता (उदा. 'बगळ्यांची माळ फिरे', 'जिवलगा राहिले दूर घर' इ.) स्वरभानाची कविता (तांबे, बोरकर, संजीवनीबाई यांची कविता), गायनभानाची कविता ('जो आवडतो देवाला', 'शरण तुला भगवता' असल्या तिय्यम रचना) यातील पहिल्या प्रकारची कविता श्रेष्ठ तिचा जन्म काव्याच्या स्फुरणातून होतो. चाल नंतर येते दुसऱ्या प्रकारात कविता गुणगुणत जन्माला येते. यातही चागली कविता भेटते आणि तिसऱ्या प्रकाराबद्दल तर बोलायलाच नको. आज मराठी गान-रसिकसमुदाय या तीनही प्रकारच्या कवितांचा आस्वाद एकाच रसिकतेनं घेताना दिसतो. गायनात कवितासुद्धा चांगलीच पाहिजे असा आग्रह ही मंडळी धरीत नाहीत. "गीतरामायण' ऐकत असताना आपण कवितेचा आनंद लुटत आहोत अशी भाबडी समजूत ते करून घेत असतात. असं का होतं? कारण सामान्यांना कवितेशी काही देणं-घेणं नसतं. त्यांना गीतगायनातून संगीताची गोड गोळी मिळत असते. त्याना हे गायन अंगाईगीतासारखं सुखकारक वाटतं. कवितेकडे ते कशाला पाहतील?

साराश, संगीताच्या माध्यमातून रसिकापर्यंत कविता पोचविण्याचा गायकाचा दावा व्यर्थ आहे. कविता ही अर्थानुसारी विराम, बोल-आवाजातील उतारचढाव इत्यादींच्याद्वारे बिनचालीवर वाचायची (म्हणायची) शब्दरचना आहे. या संदर्भात व्याख्यात्यांनी तांब्यांची 'घट भरे प्रवाही' ही कविता वरील पद्धतीनं वाचून दाखविली आणि तिला गायनातून सादर करणं अशक्य आहे असं स्पष्ट केलं. श्रोत्याकडून अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. प्रसिद्ध भावगीतगायक श्री. गजानन वाटवे यांनी 'घट भरे' ही कविता गायनातून पोचविणं कसं शक्य आहे याचं प्रात्यक्षिकही दुसऱ्या दिवशीच्या सभेत करून दाखविलं; परंतु या प्रयत्नातून मूळ विचाराला धक्का पोचेल असं वाटत नाही. कारण तांब्यांच्या या कवितेत एक नायिका एकीकडे नदीवर पाणी भरीत आहे आणि दुसरीकडे तिचं मन नायकाची वेणूची शीळ ऐकायला आसुसलं आहे. पानाची सळसळ किंवा बाबू-

तून वाजणारी शीळ देखील तिला अस्वस्थ करीत आहे. कवी तिला जे सांगत आहे, त्याचा 'टोन' असा आहे :–' अग, किती बावळी तू ! ती शीळ त्याची नाही आहे. आटप उचल ती घागर...' प्रश्न असा आहे की, ' सा, रे, ग, म 'च्या अपरिवर्तनीय आवाजातून भावनेचा हा तिरकस पदर कधी तरी व्यक्त होऊ शकेल काय ?श्री. वाटव्यांनी प्रयत्न केला एवढंच यातलं सत्य आहे.

या ठिकाणी सुरुवातीस उल्लेखिलेल्या ' उत्तरमीमांसा 'तील काही प्रश्नासंबंधी थोडक्यात विचार करणं अगत्याचं आहे. प्रा. स. शि. भावे यांनी एक महत्त्वाची शंका उपस्थित केली आहे. त्यांचं म्हणणं असं–' मानवी भाषा ही संगीतमयच असते. कारण भाषेच्या उच्चारणात त्या त्या वेळचा षडज् असतो. स्वरावर्तनं असतात, विराम, हेलकावे, बलाघात, सकोचविस्तार अशी सारी सांगीतिक अंगे असतात. आपण ज्याला संगीत म्हणतो ते या व्यापक संगीताचा अधिक नियमबद्ध आविष्कार होय.' प्रा. भाव्यांनी आणखीही काही मुद्दे उपस्थित केले आहेत; पण तूर्तास या मुद्द्याचाच विचार करू.

' भाषा संगीतमय असते ' हे विधान पूर्णतः पटणारे नाही कारण या विधानात ' संगीत ' याचा अर्थ नाद, लय, आघात इथपर्यंतच मर्यादित आहे. खरं संगीत हे आधारस्वराशी एकजीव होणारा सूर आणि तालचक्राचे कठोर नियम यांनी ' प्रशासित ' असतं. म्हणूनच भाषिक आविष्कार संगीताच्या नियमबद्धतेतून प्रकट झाल्यास तो आपला भाव व्यक्त करण्याची शक्ती गमावून बसतो. भाषेतील षडज् (जो संगीताच्या दृष्टीने कायम बेसूर असतो), विराम, उतारचढाव ही सर्व उपकरणे अर्थाचे अनुसरण करणारी आणि त्याचा उत्कर्ष साधणारी असतात. संगीतात याच बाबी रंजकतेचा आणि अनामिक भावांचा उत्कर्ष साधण्यासाठी येत असतात. तालमात्राचे कायदे भाषण–व्यवहाराला लागू करता येणार नाहीत. कंठसंगीताला शब्द हे हवेच असतात; पण इथे भाषा माध्यम नसते तर साधन असते. संगीत तिचा फार वेगळ्या प्रकारांनी उपयोग करून घेते. उदाहरणार्थ, भाषमुळे संगीतातील आकारहीन स्वरांना ' ई ' ' ऊ ' सारखे आकार प्राप्त होतात. तसेच बाराखडीयुक्त व्यंजनांच्यामुळे हे आकार आणखी बुलंद होऊ शकतात. दुसरे म्हणजे, महाप्राण, अनुनासिक, कोमल इत्यादि व्यंजनभेदामुळे नादसृष्टीमध्ये नवनवोन्मेष साधता येतात. आपाततः निर्माण होणारे वेगवेगळे स्वरगुच्छ व व्यंजनगुच्छ याच्यामुळे कलात्मक नादनिर्मिती होऊ शकते. आणखी असे की कविता शब्दार्थयुक्त असल्यामुळे गायकाला एखादा ' मूड ' मिळवून देण्यापुरता तिचा उपयोग होतो. शिवाय गायनासाठी कविता निवडताना संगीतदिग्दर्शकाचं पहिलं लक्ष तिच्यातील नादमयतेकडे असतं. (उदा- ' नंदाघरी नंदनवन फुलले '). आज दुय्यम दर्जाच्या कविता गायनातून विपुल प्रमाणात अवतरत आहेत याचं कारणही हेच.

उत्कृष्ट कविता स्वरतालयुक्त गायनातून आपल्या अंगभूत भाषिक संगीताबरहुकूम पोचणे हे केवळ काकतालीय न्यायानेच संभवनीय आहे. अन्यथा या गायनातून संगीतच आधी पोचणार. कविता नंतर (किंवा आधी) समजून घ्यावी लागणार. मात्र अतिसामान्य कविता गायनातून बऱ्याच प्रमाणात पोचू शकेल. कारण ती एक ' सोपे पद्यमय गद्य ' असते. कवितेत वसणारे जे संगीत आहे तिने भाषिक संगीताचे अनुसरण करणेच इष्ट. तरीही संगीताच्या मोहापुढे कुणाचे चालत नाही. म्हणून सर्व थरातील कवितांना स्वरतालाच्या संगीतात बसवले जात असते व नादलुब्ध श्रोते त्यांचा आस्वाद घेत असतात. श्री. पु ल. देशपांडे यांचे मर्ढेकर व आरती प्रभु यांच्या कवितांचे वाचन हे भाषिक संगीतावरच आधारलेले आहे......असो. हा वाद इतक्या त्रुटितपणे संपवता येणार नाही. त्याला आणखी एका व्यासपीठाची गरज आहे.

## काही बदसूर

श्री. मा. कृ पारधी यांनी ' संगीतातील काही बदसूर ' हा विषय घेतला होता. विषयातच एक प्रकारचं आव्हान होतं आणि श्री. पारधी यांचं संगीतसमीक्षणातील वैशिष्टच पाहता ते विचाराला खाद्य पुरवणार याची अटकळही अनेकांनी बांधली होती. ' महाराष्ट्र हेराल्ड ' मधून सांस्कृतिक कार्यक्रमांच दर्जेदार परिक्षण करणारे आणि २५ वर्षं दिल्लीमध्ये शासकीय वृत्त–विभागामध्ये अधिकाराच्या जागा साभाळून गेली काही वर्षं पुण्याला वास्तव्य करून असलेले पारधी हे आता आपल्या विशेषत्वानं साक्षेपी साहित्य-संगीतवाल्यांना नवे राहिलेले नाहीत. त्यांनी आपल्या भाषणातून प्रचलित संगीत–व्यवहारात आढळणाऱ्या काही बदसूर घटनांच्याकडे सर्वांचं लक्ष वेधलं. एक म्हणजे आपण जुनं उराशी बाळगण्याच्या वृत्तीतून बाहेर आलेलो नाही. त्यामुळं आज संगीताची वाढ खुंटल्यासारखी झाली आहे. दुसरं असं की, प्रत्यक्ष गायन–वादन म्हणजेच सगीतव्यवहार ही समजूत दृढ झालेली दिसते. संगीतावर विचार, त्यावर सशोधन यालाही महत्त्वाचं स्थान आहे, इकडे श्रेष्ठ कलाकाराचं लक्ष नाही. आपले सगीत अपरिवर्तनीय आहे हा समज अगदी पक्का होऊन बसला आहे. असं दिसतं की, संगीतावर देशाच्या राजकीय परिवर्तनांचा परिणाम कसा झाला आहे याचा विचारच कुणी केलेला नाही. आणखी एक मुद्दा असा की, तांत्रिक उपकरणातील क्रातीमुळे संगीतावर काय परिणाम झाला याचा विचार होणं आवश्यक आहे. तोही फारसा झालेला नाही.

व्याख्यात्यांनी डोळ्यासमोर एकूण संगीताचा व्यापक व्यवहार-पट ठेवलेला होता. त्यांनी या संदर्भात संगीताचा विकास चाहणाऱ्या रसिकाना न पटणाऱ्या गोष्टीचा परामर्श तर घेतलाच; पण त्याचबरोबर संगीत–व्यवहारातील काही घटनांचं विवेचनही केलं आणि अपेक्षेप्रमाणं या विषयावर बरीच चर्चाही झाली.

त्याचा मुख्य भर संगीतातील वैचारिक व संशोधनात्मक दारिद्र्यावर होता. आपण कलांचा पारस्पारिक संबंध लक्षात घेऊन विचारच करायला तयार नसतो. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र याचा संगीताशी सबंध काय याचा विचार आपण करीत नाही. संगीताच्या व्याकरणातून संगीताला सोडविण्याचा प्रयत्न कुमार गंधर्वांनी केला; पण ते एकाडेच राहिले आहेत. श्री. वामनराव देशपांडे याच्यासारखी एखाद–दुसरी व्यक्ती आज संशोधनात निमग्न असल्याचं दिसत. डॉ. अशोक रानडे, पं. भास्कर चंदावरकर हीही नावं आहेत; पण ती अगदी अल्प आहेत. आज आकाशवाणी व दूरदर्शनमुळे संगीतावर जे दूरगामी परिणाम झालेले आहेत त्याची दखल घेणं आवश्यक आहे. मुसलमानी दरबार नसता तर ' ख्याल ' आला असता का असाही विचार करता येण्यासारखा आहे. कारण ध्रुपदात विलास

नव्हता. दरबारी ख्यालात तो शिरला. तसंच ब्रिटिश राजवटीमुळं संगीत आपल्या बंदिस्त दरबारातून पुनः एकदा जनसामान्यांकडं वळलं याची विस्तृत नोंद घेणेही आवश्यक आहे. आज गुरूचं फाजील महत्त्व कमी झाल्यामुळं संगीतातील घराणी संपुष्टात आली आहेत. आणि संगीत एकीकडे मुक्त होत आहे तर दुसरीकडे त्याची शिस्त बिघडत आहे.

चर्चेमध्ये मुख्यतः श्री. वामनराव देशपांडे यांनी या बदसुरात देखील काही सुरेख सूर आहेत याची सर्वांना जाणीव करून दिली. आखिल भारतीय पातळीवर पाहिल्यास चित्र तितकं निराशाजनक नाही हे सांगत असतानाच त्यांनी हेही मान्य केलं की, यापेक्षा अधिक कार्य होणं हे खरोखरच अगत्याचं आहे. पूर्वी संगीतात जो खोलपणा, सच्चेपणा होता तो आज दिसत नाही. सुधारणेला निश्चित वाव आहे.

## बनारसी गीतप्रकार

ठुमरी, टप्पा दादरा चैती, कजरी, होरी हे बनारसी गीतप्रकार मराठी रसिकांना ऐकायला मिळतात; पण कुणी बोटाला धरून त्यांना नेमकेपण सप्रयोग समजावून सांगत नाही. त्यामुळे ख्यालाच्या पुढचं पाऊल ती ठुमरी किंवा दादरा तालात गाइली जाणारी जलद रचना म्हणजे दादरा अशा समजुतीत तो वावरत असतो. डॉ. अलका देव यांचा अनुभव या क्षेत्रातला. इंग्रजी घेऊन एम. ए. शिवाय संगीतात एम. ए. आणि पीएचडी. आणि या विदुषीपणाबरोबर संगीतातील सौंदर्याची जाण, तितकाच वजनदार आणि तरळ असा आवाज. या सर्वांनी युक्त अशी अडीच तासाची मैफल, सव्वातीनशे श्रोत्यांच्या संगतीत लुटण्याचा योग या व्याख्यानात आला. स्वत: बनारसला पाच–एक वर्षं राहून त्यांनी या गीतप्रकारांचा अभ्यास केल्यामुळे एकूण विवेचन साक्षात्कारी झालं.

ठुमरी हे लोकसंगीतातून विकास पावलेलं ललित संगीत आहे. ध्रुपदातून ख्याल आला तशी ख्यालातून ठुमरी आलेली नाही. ठुमकत जाते ती ठुमरी. म्हणजे तिच्यात नृत्याचं अंग भरपूर असतं. तिचा जन्मच मुळी नृत्यातून झालेला. लखनऊच्या वाजिदअलीशहाच्या दरबारातील नर्तिकाच्या संगीतयुक्त अदाकारीतून अवतरली. तिचे पुढे दोन प्रकार झाले. लखनवी ठुमरी–जी नृत्यातून सादर केली जाते (प्रसिद्ध बिरजूमहाराज हे करतात) आणि त्यातूनच विकसित झालेली बनारसी ठुमरी–जी बैठकीत गायनाद्वारे मांडली जाते. भक्तियुक्त शृंगार हा ठुमरीच्या कवनाचा आशयपक्ष. त्यामुळं अनेक ठिकाणी भजनांची ठुमरी झाली आहे असं आढळून येईल. ठुमरीच्या गायनातही वेगवेगळे ढंग आहेत. ती ख्याल, मिश्र तिलककामोद, भैरवी इत्यादी विशिष्ट रागांतून गाइली जाते आणि तबलावादकाच्या कौशल्यानं ती खूपच रंगतदार बनत जाते. डॉ. देव यानी किती तरी ठुमऱ्या प्रत्यक्ष गाऊन दाखवल्या. त्यात आपल्या वडिलानी (श्री. राजाभाऊ देव, तेही उपस्थित होते) देस रागात बांधलेली आणि बनारसच्या लोकाना जुनी खानदानी ठुमरीच वाटलेली रचनाही त्यांनी म्हटली.

होळीचं वर्णन ज्यात असतं ती होरी. चैत्र महिन्यात रामजन्मोत्सवानिमित्त 'हो रामा' असे पालुपद घेत विशिष्ट थाटात जी गीतं म्हटली जातात ती चैती. कजरी म्हणजे काळीसावळी. पावसाळ्यात आकाश असंच असतं. ते कृष्णाचंही रूप आहे. त्याच्या विरहात तडपणाऱ्या गोपीच्या रूपानं जीवघेण्या अदाकारीनं ही गाइली जाते. उदा. 'तुम बिन मोरे बिदेसी पहिरवा, कैसे कटे बरसात.' दादरा हा ठुमरीचाच गतिशील व चंचल प्रकार आहे. लयीची लज्जत घेत घेत तो मांडला जातो. टप्पा ही त्याच्या पुढची पायरी. पहाडी आवाज, गळ्याची फिरत आणि कलात्मक 'पॉज' घेत घेत म्हणायचा हा गीतप्रकार आहे.

व्याख्यान बहारीचं झालं. मनात विचार आला की, यांना गीतप्रकार म्हणण्याऐवजी 'गायनप्रकार' म्हणणं अधिक अर्थपूर्ण झालं असतं चर्चा होऊ शकली नाही; पण श्रोत्यांनी नंतर कोंडाळं केलंच होतं. बनारस–लखनऊकडचं हे संगीतवैभव पाहून महाराष्ट्रात आपण मागासलेलेच आहोत असं वाटायला लागलं. आपल्याकडं गीतप्रकार आहेत; परंतु त्यात संगीतशास्त्राची नजाकत नाही आणि तिकडे तर एका भैरवी रागात रात्रभर ठुमऱ्या म्हणण्याचा कार्यक्रम असतो. नावेच्या टपावर चढून जलविहार करीत संगीताचा जलसा उपभोगण्याची प्रथा तिकडं आहे. आपल्या 'दगडांच्या देशात' असं काही दिसत नाही, असा विचार मनाला चाटून गेला.

## गझल

सप्ताहातील सातव्या संध्याकाळी 'गझल' या विषयावर सप्रयोग चर्चा होती. बोलणारे होते सुप्रसिद्ध सुरेशचंद्र नाडकर्णी–उत्कृष्ट गझलकार, क्रीडासमीक्षक, प्राणिशास्त्राचे प्राध्यापक आणि डॉ. वसंतराव देशपांडे याचे गायनशागीर्द. गाणार होत्या प्रा. शशिकला शिरगोपीकर. उत्कृष्ट गायिका म्हणून त्यांची ओळख पुण्यात आणि पुण्याबाहेर झालेली आहे. शिवाय समारोपाला मान्यवरांची उपस्थिती. यामुळं ही 'महफिल' सजली आणि रंगली.

मराठी रसिकाना गझल हवीहवीशी वाटते ती त्यातील इष्काच्या धुंद वातावरणामुळं. तसे पाहिल्यास गझलची भाषा अस्सल उर्दू. जिथं हिंदी कळत नाही तिथं हे उर्दू कुठून कळणार? पण 'गझल'च्या वृत्तात एक मोहिनी आहे आणि तिच्या गायनात एक प्रकारचा कैफ निर्माण करण्याचं सामर्थ्य आहे. त्यामुळं मराठी रसिक त्या उन्मुक्त, उत्तान अशा अनुभवात रमण्यासाठी उत्सुक असतो. गझल हे वृत्त आहे, गायनप्रकार आहे की काव्यप्रकार आहे याचंही सामान्याना फारसं ज्ञान नसतं आणि त्यात त्याचं चुकतही नसतं. नादलुब्धाना या 'ज्ञानडोसा'ची गरज का वाटावी? परंतु मुक्त चर्चा-सत्राचा हेतू 'ज्ञान आणि गान' असा दुहेरी असल्यामुळं श्रोत्यांना 'एक पंथ दो काज'चा लाभ मिळाला.

'गझल' हा मुख्यत: एक काव्यप्रकार आहे. त्यात एकापेक्षा अधिक द्विपद्या किंवा शेर असतात. प्रत्येक शेर हा भावदृष्ट्या स्वतंत्र असतो आणि सुरुवातीच्या 'शेर'बरोबर बांधला गेलेलाही असतो. प्रत्येक 'शेर'मध्ये उत्कट काव्यबिंदू असतो, त्यामुळं 'गझल' ही अशा उत्कट काव्यबिंदूंची मालिकाच असते. 'गझल'मधील प्रत्येक शेर एक विशिष्ट बांधणी घेऊन येतो. या बांधणीचे नियम गझलकाराला पाळावेच लागतात. त्यामध्ये 'रदीफ' किंवा यमकाचं बंधन महत्त्वाच असतं. या दृष्टीनं पाहिलं तर गझल ही एक कृत्रिम रचनाच मानायला हवी; परंतु कृत्रिम असली तरीही ती हळवी असते. ती

कारागिरी असली तरी तिच्यातील कल्पनेची भरारी; तिचं बांधणीचं सौष्ठव आणि तिची अदाकारी यामुळं ती रसिकांना प्यारी असते. प्रा. नाडकर्णी यांची निवेदनशैली लाजवाब. पाठांतरही तसंच. त्यामुळं त्यांनी 'गझल'चं स्वरूप अगदी सोपं करून श्रोत्यांसमोर ठेवलं आणि त्यानंतर प्रा. शशिकलाजी यांचं उत्कृष्ट गझलगायन झालं. त्यांना वेळ आणखी थोडा मिळायला हवा होता. त्यांनी 'हजारो ख्वाहिशें निकलीं' ही गालिबची गझल म्हटली. इतरही गझलां-बरोबर प्रा. नाडकर्णी यांचीही गझल त्यांनी पेश केली. ती विशेष रंगली. 'शबाबो हुस्नका पैकर कहाँ नहीं मिलता ? मगर जो दिलमें है उसका निशाँ नहीं मिलता ।।...तमाम उम्र सितारों के दरमियाँ भटके । जहाँ वह चाँद है वह आसमाँ नहीं मिलता ।।' कवी म्हणतो, सौंदर्य सर्वत्रच पहायला मिळेल; पण माझ्या मनात 'ते' जे रूप साठलेलं आहे त्याचं दर्शन काही घडत नाही. आयुष्यभर तारकां-मधून हिंडलो; पण तो चंद्र ज्या आकाशात आहे ते आकाश काही अजून भेटलेलं नाही !—रसिकांना यातील रम्य कल्पना मोहवून टाकील यात शंका नाही. या गझलमध्ये 'नहीं मिलता'चं यमक आहे. ते इथं आधीच ठरून गेलं आहे. 'आयुष्यभर तारकांमधून हिंडलो' हे एक स्टेटमेंट आहे. त्याला 'मिस्रा' म्हणतात. कवीला करामत दाखवायला यातही वाव नाही. 'तो चंद्र ज्या आकाशात आहे ते आकाश...' एवढ्या पाव ओळीतच कवीला आपली चमत्कृती दाखवायची संधी मिळाली आहे. 'गझल'ची रचना अशी खडतर आहे आणि गझलकारांना कायमची नादी लावणारी आहे. 'मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे' या श्री. सुरेश भटांच्या गझलची बांधणी अशीच आहे. प्रा. नाडकर्णी यांनी या बांधणीवर विशेष भर दिला.

चर्चेला वेळ राहिलाच नाही. मैफलच रंगत गेली; परंतु प्रश्न निर्माण व्हायचे थांबले नाहीत. गझलची कृत्रिमता, तिच्यातील चमत्कृती, भाषेचा अडसर, शृंगारिकतेचा अतिरेक व तोचतोचपणा या सर्व दृष्टिकोणातून महाराष्ट्राच्या 'माहौल'मध्ये आणि एकूण साहित्य व संगीताच्या प्रांगणामध्ये 'गझल'ला फार वरची पायरी देता येईल का ? असे व इतर काही प्रश्न नंतर ऐकू आले.

परंतु ही चर्चा याच वर्षी संपणारी नाही. ती प्रत्येक वर्षी होणार आहे. मुक्त संगीत-चर्चा सप्ताहाचे हे पहिले वर्ष आहे. त्या मानानं या कार्यक्रमाला चांगलाच प्रतिसाद मिळाला आणि उत्तरमीमांसेतून समारोपाच्या भाषणाद्वारे महनीयांच्या मुखातून त्याबद्दलची पावतीही मिळाली. 'संगीत-प्रसाराबरोबर संगीत-विचारही होत राहिला पाहिजे.' चर्चा-सप्ताहाची ही तळमळ काही प्रमाणात शमली; पण संपली नाही. □

---




# ब्लॅक इज् ब्युटिफुल

## भरकटलेला प्रवास

मध्यंतरी 'स्त्री' मासिकात 'ब्लॅक इज ब्युटिफुल' या नावानं प्रवासवर्णनवजा लेखांची मालिका प्रसिद्ध होत होती. या लेख-मालेत विशेष काहीच नव्हतं; पण लेखिका सुधा गोखले यांना 'स्त्री' म्हणून ज्या वाईट प्रसंगांना तोंड द्यावं लागलं; त्याच्या धीट वर्णनानं जरा लक्ष वेधून घेतलं होतं आणि या बाई आफ्रिकेला आता सुखरूप पोचतात की नाही, या एकाच काळजीनं त्यांचा पुढचा प्रवास वाचून काढला होता. सुधा गोखल्यांचं हे 'प्रवासवर्णनपर अनुभवकथन' त्यांची मुलगी आणि श्रीविद्या प्रकाशनाच्या सह-कार्यानं नुकतंच पुस्तकरूपानं प्रसिद्ध झालं आहे.

हे पुस्तक वाचून झाल्यावर वाटतं की, अगदी जवळच्या प्रवासाला जाण्यापूर्वीसुद्धा आपण आवश्यक ती पूर्वतयारी करतो मग कोणतंही planning न करता या बाई सरळ उठून आफ्रिकेला गेल्याच कशा ? पाल्र्याचा विमानतळ जरी लेखिकेच्या परसात असला तरी आफ्रिका नक्कीच दूर होती. येवढा लांबचा प्रवास, त्यात या बाईंना थ्रिल वाटतं; पण स्मार्टनेसचे धडे मात्र वारंवार सोबत असलेल्या डॉक्टरांना (कै. डॉ. लिमये) द्यावे लागतात. नाही तर या वेळी-अवेळी भोकाड पसरून रडायला तयारच ! परक्या देशात जाताना Comunication ची सोय आधी लावावी लागते. पण सुधाताईंना मात्र 'माझं इंग्रजीचं ज्ञान यथातथाच' असं स्वतःच कौतुकच वाटतं. त्यामुळे 'मी कसं काय निभा-वून नेणार' ही सुधाताईंची भीती आपल्या-लाही वाटते. इतकंच नाही, तर पॉली-रेडिक्यूलॉपॅथी (Pollyradiculapathy) सारख्या क्वचित होणाऱ्या चमत्कारिक रोगातून त्या नुकत्याच अगदी मृत्यूशी झुंज देऊन बऱ्या झाल्या होत्या. (असं पुस्त-कातल्या त्यांचा सुरुवातीच्या आजारपणाच्या वर्णनावरून तरी वाटतं.) शारीरिक पाठबळ नाही, की मानसिक स्वास्थ्य नाही, प्रवासपूर्व नियोजन तर नाहीच नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत अधिक पैसे मिळवण्यासाठी म्हणून नायजेरियाला गेलेल्या मि. गोखल्यां-कडे जाण्याची सुधाताईंना अचानक सणक येते. त्यातच एकटीनं जाण्याचं थ्रिल, पहि-ल्यांदा विमानात बसण्याचा आनंद आणि त्यामुळं पोटात गुदगुल्या इ. आहेच.

ही प्रतिकूल परिस्थिती लक्षात घेतली की, सुधाताईंच्या अनुभवांचं वेगळेपण निश्चित होतं. तरी देखील अचानक मुंबईचा एअरपोर्ट जळल्यामुळं दिल्लीहून जावं लागणं,

मेधा देशपांडे

दिल्लीमध्ये पासपोर्ट, व्हिसा, तिकिट मिळवताना आलेल्या अडचणी, एकदा तिकिट मिळाल्यावर विमानाला होऊ घातलेला भयानक अपघात, त्यातूनही सुटका. परत लेगॉसच्या मुरताला अहमद एअरपोर्टवर आलेला थरारक अनुभव, तिथे सुधाताईंसारख्या पूर्णपणे एकट्या स्त्रीवर होऊ शकणारा बलात्कार, त्यातून त्याचं निभावून जाणं आणि सरतेशेवटी योग्य मुक्कामी पोचणं हे विलक्षण अनुभव ज्या झपाट्यानं येतात आणि अपुऱ्या शक्तीनिशी सुधाताई त्याना ज्या पद्धतीनं तोंड देतात, ते विलक्षण आहे.

यानंतर मात्र 'ब्लॅक इज ब्युटिफुल' असं म्हणायला लावणारे, सुधाताईंना सुखवणारे प्रसंग आहेत. नायजेरियातली सुबत्ता, 'पॉश' राहणी, दिमतीला नम्र नोकर इत्यादी तरीही मुलगा, मुलगी, सून आणि इतर नातेवाईक याच्याशिवाय त्याना सुनं सुनं वाटतं. 'काही एका वयानंतर नवऱ्यापेक्षा ही इतर नाती जास्त जवळची वाटतात' हे सुधाताईंचं यावरच मत. मुबईत एक छोटासा ब्लॉक घेण्यासाठी हा वनवास पत्करावा लागतो आहे हे त्या सरळ कबूल करतात. आफ्रिकेत रहाणाऱ्या असख्य भारतीय कुटुंबाची हीच व्यथा असेल का ?

नायजेरियातल्या एक महिन्याच्या वास्तव्यात तिथल्या सामाजिक, राजकीय परिस्थितीबद्दलचे त्यांना आलेले अनुभव सुधाताई जाता जाता सांगतात. त्यात तिथली अकार्यक्षम पोलीसयंत्रणा, मशीनगनच्या धाकानं गाडी पळवणारे गुंड, डॉ. शहाचा 'तिनबु' चौकात भर गर्दीत झालेला खून, लेगॉस एअरपोर्टवरचा तो थरारक अनुभव या सर्वाचं वर्णन आहे. तसंच तिथं आलेले काही गमतीदार अनुभव–म्हणजे बाजारात जोंधळ्यांचा ढीग पाहिल्यावर सुधाताई हुरखून जातात आणि गरम भाकरी करायची या विचारानं जोंधळ्याचा भाव करायला लागतात.

"जोंधळे काय भावाने दिले ?" या प्रश्नाला प्रश्नार्थी उत्तर, "किती कोंबड्या आहेत तुमच्या ?" आणि पुढं हा रंगत जाणारा संवाद, यासारखे काही प्रसंग आहेत. कोणत्याही परदेशी व्यक्तीला 'भटुरे' म्हणण्याची पद्धत किंवा परदेशी व्यक्तीला काही त्रास झाला तर स्थानिक लोकांनी 'सॉरी' म्हणण्याची पद्धत (एका हॉटेलमध्ये सुधाताईंना फटाफट शिंका यायला लागतात. प्रत्येक वेळी समोरचा नायजेरियन 'सॉरी' म्हणत होता ) यासारख्या गंमतीनी पुस्तक किमान वाचनीय झालं आहे.

सुरुवातीच्या मनोगतात सुधाताई म्हणतात की, 'मनस्मृती'नं घालून दिलेल्या आदर्शवादी चौकटीत मी न बसणारी. म्हणजे स्त्रीनं काय बोलावं, कसं वागावं या चौकटीत; पण कधी तरी वाटलं या चौकटी मोडून लिहावं पुस्तक वाचल्यानंतर सुधाताईंनी ती अदृश्य चौकट मोडली आहे असं अजिबात जाणवत नाही. समोर अतिप्रसंग उभा ठाकला तेव्हा चार सर्वसामान्य भारतीय स्त्रियांप्रमाणं त्यांनी अब्रू वाचवण्याचा प्रयत्न केला अर्थात असा अवघड प्रसंग माझ्यावर आला होता हे कबूल करण्यात त्यांनी चौकट मोडली असेल तर ठीक. दिल्लीतल्या आफ्रिकन एजंटला लाच हवी असते. त्या वेळी सुधाताई म्हणतात, "समाजवादी मित्राबरोबर येऊन लाच द्यायची ?" पुढे नायजेरियात गेल्यावर मात्र घरातली क्रोकरी फुटली, फुट दे, ऑफिसचीच आहे. गाडी, पेट्रोल सरकारीच आहे, आपल्याला काय त्याचं ?' असा लेखिकेच्या मनात सतत घोळणारा विचार, तिथल्या भारतीयांची वृत्ती सहज स्पष्ट करतात. सुधाताई एजंटला लाच देत नाहीत; पण त्याच एजंटनं 'स्पेशल केस' म्हणून दिलेली ट्रीटमेंट आणि तिकिट मिळवून देण्यासाठी केलेली खटपट सहज स्वीकारतात.

पुस्तकात एक गोष्ट महत्त्वाची आहे, ती म्हणजे आपण चार सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणेच आहोत याचं ठेवलेलं भान. त्यामुळंच सुधाताई आपल्या अनुभवांना उगाचच व्यापक' प्रातिनिधिक स्वरूप द्यायच्या भानगडीत पडत नाहीत आणि आपणही त्यांनी केलेला हा अकारण अचाटपणा सहन करत पुस्तक वाचू शकतो.

एखाद्या मध्यमवयीन exposure न मिळालेल्या गृहिणीने अशा एकाकी प्रसंगाला तोड कसं द्यावं इतपत मानसिक तयारी हे पुस्तक वाचून स्त्रियांना करता येईल; पण तरीदेखील पुस्तक वाचून झाल्यावर खटकते ती सुधाताईंची अपरिपक्वता आणि अस्वस्थता.

असा हा दिशाहीन प्रवास – एका अस्वस्थतेतून दुसऱ्या अस्वस्थतेकडे नेणारा.

ब्लॅक इज ब्युटिफुल
लेखिका – सुधा गोखले
प्रकाशक : सौ. माधुरी अविनाश परांजपे
पृष्ठे : ११०, किंमत : १५ रु.


**– नवीन दाखल झालेली पुस्तके –**

१. बिलवर–(व्यक्तिचित्रे) पु. भा. भावे
२. मुंबईचे फुलपाखरु–(आठवणी) रवींद्र पिंगे
३ माओनंतरचा चीन–माधव गडकरी
४. सुख-दुःखाच्या रेषा–(कथासंग्रह) जयवंत दळवी
५. द्वंद्व–(एका तज्ज्ञ डॉक्टरवर भरलेला जीवघेणा खटला चित्रित करणारी खळबळजनक कादंबरी) अनंत मनोहर

1. **Wodehouse On Wodehouse** – ( Autobiographical fiction ) P. G. Wodehouse
2. **Debts of Honour** – (Witty sketches of famous people including Beaverbrook) Michael Foot
3. **Mougham**–(Biography) Ted Morgam
4. **Mountbatten and the Partition of India**–Larry Collins & Dominique Lapierre

★ जे ग्रंथ व कलाकौशल्यादी वस्तूंचा विध्वंस करतात त्यांना Vandals म्हणतात आपण जर ग्रंथालयाचे पुस्तक कायमसाठी परत केले नाही किंवा ग्रंथालयाची बाकी बुडवली तर ते याच प्रकारात मोडेल. ग्रंथालये ही मंदिरे असतात !

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

क्रिकेटक्षेत्रातल्या आपल्या सहकाऱ्यांबद्दल बोलताना रवी अगदी रंगात येतो. सुनील त्याला आदर्श कर्णधार वाटतो; पण विशी हा मात्र त्याचा वीक पॉइंट ! तो म्हणतो, "विशी हाच माझा बालपणापासूनचा आवडता क्रिकेटर होता." कपिलदेव त्याला भारतीय संघाचा 'दादा' वाटतो. दिलीप आणि संदीप हे तर रवीचे रूम-पार्टनर ! त्याच्या मते दिलीप मितभाषी तर संदीप म्हणजे बोलता धबधबाच!

याशिवाय यशपाल, 'किरी', 'एकी', 'कडूभाई' या ज्येष्ठ सहकाऱ्यांबद्दलही रवीनं अगदी रंगून लिहिलं आहे.

रवी शास्त्री आणि संदीप पाटील हे क्रिकेट-रसिकांचे लाडके खेळाडू !

या दोघांच्या क्रिकेटजीवनाची आत्मकथा मुंबईच्या 'आदित्य प्रकाशन'तर्फे लवकरच प्रकाशित होत आहे.

पुस्तकांचे नाव आहे 'षटक आणि षटकार' या पुस्तकातला हा काही भाग....

# माझे सहकारी

## रवी शास्त्री

विशी हाच माझा बालपणापासूनचा आवडता क्रिकेटर होता. त्याला पाहिलेले नव्हते तेव्हाही विश्वनाथ माझे दैवत होते. मग मी त्याला पाहिले व वाटले त्यापेक्षा लवकर त्याच्याबरोबर खेळावयास मिळाले. माझे त्याच्याबद्दलचे मत बदलले नाही, तर अधिक पक्के झाले. 'विशीच' माझे दैवत राहिले.

८० कसोटी सामने खेळलेला व पाच हजारावर धावा काढणारा हा महान फलंदाज किती साधा आहे ! आपण इतके खेळलो व छान खेळलो याचा त्याला दर्प नाही. त्याच्या फलंदाजीवर खूष होऊन मी म्हणालो, 'विशी, क्या बॅटिंग किया !' तर तो एवढेच म्हणाला, 'चलता है यार !' विशी आत्मस्तुती टाळणार; पण एरवी शेजारी कोणीही असो, विशी त्याच्याशी चार शब्द बोलणारच

मी आधीच सांगितले आहे की, माझ्या डॅडीनासुद्धा विशीच फार आवडतो. डॅडीना तसेच मम्मीलाही. आमच्या घरात सारेच त्याचे चाहते. पहिल्या डावात विशी शून्यावर बाद झाला तर डॅडी लगेच पैज लावणार की दुसऱ्या डावात त्याचे शतक होणारच. स्वभावाने विशी फार शांत आहे; पण त्याचे निरीक्षण अतिशय चांगले आहे. फलंदाजाचे तंत्र सदोष आहे वा चेंडूचा टप्पा बदलला पाहिजे वा क्षेत्ररचनेत फेरफार केला पाहिजे, असा काही सल्ला तो नवीन षटक सुरू होण्याआधी हळूच देणार आणि हा सल्लाही मोजक्या शब्दांत देणार. म्हणजे पुन्हा तो काही आहे असे कोणी म्हणू नये व एखाद्या बळीचे श्रेय त्याचेच, असेही कोणाला वाटू नये.

कट हा विशीचा अतिशय आवडता फटका. त्या फटक्याने त्याला शेकडो धावा मिळवून दिल्या आहेत, तसेच अनेकदा त्याचा घातही केला आहे. म्हणून तो समोर आला की, प्रश्न पडायचा. त्याला कटच्या मोहात पकडणे श्रेयस्कर की त्याला कट मारू द्यायचीच नाही या हेतूने चेंडूचा टप्पा सतत खोलवर देत राहावे ? मी एकदा ठरविले की, कटच्या सापळ्यात त्याला पकडावे आणि मी त्याला एकदा पकडलेही; पण तोपर्यंत त्याच्या शंभर धावा होऊन गेल्या होत्या.

डेरेक अंडरवुडच्या आर्मरने त्याला कटच्या सापळ्यात पकडलेले आहे. ७१ ते ७७ च्या दरम्यानच्या चार मालिकांत अंडरवुडने त्याला बराच त्रास दिला. त्यामुळे यंदा त्याने आपले कटचे तंत्र बदलले. चेंडू कट करण्यापेक्षा स्लिपमधूनच ग्लाइड करावा असे ते तंत्र होते. यंदा फ्लेचरच्या इंग्लिश संघाविरुद्ध सुरुवातीला तरी आडव्या बॅटचे फटके तो टाळू लागला व सरळ बॅटवर भर देऊ लागला; पण चेंडूवर नजर बसली की तो जुना विशी दिसू लागे. दिल्लीच्या कसोटीत ९७ वर असताना त्याने शतक पुरे केले ते कटचा चौकार लगावूनच!

### आदर्श कर्णधार

विशी व सुनील दोघे माझे ज्येष्ठ सहकारी. सुनीललाही गर्व नाही; पण विशीइतका तो शांतही नाही कदाचित कर्णधारपदाच्या जबाबदारीमुळे असेल; पण तो अधिक स्पष्टवक्ता आहे. सहसा हा स्पष्टवक्तेपणा तो संघाच्या भल्यासाठी वापरतो. अधिकारीवर्गाचे खेळाडूंशी वर्तन योग्य नाही असे वाटले तर सुनील त्यांनाही खडसावतो आणि तशीच वेळ आली तर मलाही व माझ्या सहकाऱ्यानाही. यंदाच्या मद्रास कसोटीतील चौथ्या दिवशीची एक आठवण सांगतो. खेळ संपण्याच्या सुमारास कपिलचा मारा चाललेला होता आणि बोथम आणि डावखुरा डिली खेळत होते. बोथमसाठी मी मिडॉनला होतो; पण त्याने एकेरी धाव काढल्यावर डावखुऱ्या डिलीसाठी मी एक्स्ट्रॉ कव्हरला जायला हवे होते. थोडे बाजूला जायला हवे होते; पण खेळ

सपण्याच्या सुमारास माझे लक्ष थोडेसे उडाले असावे व मी जागच्या-जागीच होतो. कपिलने स्टार्ट घेतला तरी मी हलेना. तेव्हा मात्र सुनीलने रागावून सांगितले, ' कॉन्सेंट्रेट, तुझे लक्ष कुठे आहे ?'

या गोष्टी विशीला करायला लागत नाहीत आणि सुनीलला मात्र टाळता येत नाहीत; पण तरीही सुनील हा एक आदर्श कर्णधार आहे. सहकाऱ्यांचा अपमान न करता, त्याना फारसे न दुखवता तो समज देऊ शकतो; पण तरीसुद्धा आम्ही सर्व त्याला मानतो. कारण इतर वेळी तोच आमचे हितसंबंध जपतो. इतका मोठा फलंदाज, जो रंगात आला की, इतरांनी ड्रेसिंग रूममध्ये खुशाल ताणून द्यावी, त्याला चाहत्याचा नेहमीच गराडा पडतो; पण तो मुळीच स्वार्थी नाही. कोणी बिझिनेसमन वा एखादी कंपनी त्याच्यामागे लागली वा त्याला काही देऊ लागली तर तो फक्त स्वत साठी नाही तर साऱ्या संघासाठी त्या गोष्टी मागून घेतो. मग ते किट असो, बक्षीस असो किंवा एखाद्या दौऱ्याचे आमंत्रण असो. दिल्ली कसोटीच्या वेळी मला व एक-दोघांना ग्लोव्हज् हवे होते. सुनील स्वत.साठी मागवणार होता; पण मग त्याने चटकन ग्लोव्हजच्या अर्धा डझन जोड्या मागविल्या.

जमशेदपूरला मी रणजी स्पर्धेत पदार्पण केले व सुनीलने उत्तम पायमोजांची जोडी मला भेट दिली. यंदा दुलीप करंडकाच्या अंतिम फेरीत पूर्व विभागाविरुद्ध ६ गडी बाद झाल्यावर मी व दिलीप वेंगसरकरने विजयश्री खेचून आणली. चहापानाच्या वेळी माझ्या साठ—एक धावा होत्या. सुनील माझ्याकडे आला व म्हणाला, ' शंभर काढ. बॅट देतो. ' मीही शतक झळकविले. तो माझी वाटच पहात होता. पॅव्हेलियनमध्ये आल्या आल्या माझ्या हातात पडली ती कोरी करकरीत इंग्लिश बॅट ! कीर्ती आझादने आमच्याविरुद्ध शंभर धावा केल्या व सुनीलकडून छान पॅडस् मिळविली.

आमच्या संघात आपल्या कर्तृत्वाने उठून दिसणारा तिसरा असामान्य खेळाडू म्हणजे कपिलदेव निखंज. आमच्या संघाचा तो माउंट एव्हरेस्टच आहे म्हणा ना ! आम्ही त्याला ' दादा ' म्हणतो आणि आजच्या भारतीय नव्हे तर जागतिक क्रिकेटमध्येही तो दादाच आहे. सहकाऱ्याना प्रोत्साहन द्यावे हीच कपिलची वृत्ती आहे. न्यूझीलंडमधील माझ्या पहिल्यावहिल्या कसोटी सामान्यात मी ४ चेंडूत ३ बळी घेतले, त्या वेळचा एक किस्सा आठवतो. मी दुसरा बळी घेतला तेव्हा न्यूझीलंडचा शेवटचा गडी बाद व्हायचा होता. पॉइंटवरून कपिल मला म्हणाला, ' रवी, और एक विकेट बाकी है, जादा खूष नहीं होना। ' पुढच्याच चेंडूवर मी शेवटचा गडी बाद केला व कपिलने लगेच आपल्या जागेवरून हात हालवून माझे कौतुक केले.

### दिलीप-संदीप

दिलीप वेंगसरकर व संदीप पाटील हे मुंबईतील माझे सहकारी, माझे रूमपार्टनर. दिलीप न्यूझीलंडमध्ये व रणजी सामान्यात आणि संदीप भारतात इंग्लंडविरुद्ध. दोघेही उच्च दर्जाचे फलंदाज, दोघेही सहा फूट उंच-पण तरीही माझ्यापेक्षा इंचाने तरी कमीच !

दिलीप व संदीप यांच्या स्वभावात तसा खूप फरक आहे. संदीप म्हणजे एक बोलता धबधबाच ! त्याच्या मानाने दिलीप मितभाषी. दिलीपशी दोस्ती जमवायला वेळ लागतो व नव्या माणसाशी एकदम मोकळेपणाने भडाभडा बोलण्याचा त्याचा स्वभावही नाही; पण संदीप आहे विनोदमूर्ती ! गडबड्या आणि गप्पिष्ट ! त्याची सतत फेकाफेक चाललेली असते.

संदीप संगीताचा अगदी वेडा आहे. संगीताचा म्हणजे शास्त्रोक्त संगीताचा नव्हे तर पाश्चात्य संगीताचा—पश्चिमी संगीताचा, जलद ठेका धरायला लावणाऱ्या बीटल्स छाप संगीताचा. अशा संगीताच्या रेकॉर्डस्चा मोठा संग्रहच तो बाळगून आहे आणि त्या रेकॉर्डस् तो लावतो त्याही जोरात—अगदी वरच्या पट्टीत. त्याची म्युझिक सिस्टिम सुरू होते ती एकदम चौथ्या क्रमांकाच्या पट्टीपासून ! त्यात हळुवार किंवा मध्यम आवाजाच्या पट्टीतील पहिले तीन क्रमांक नाहीतच. पत्त्याची जादूही संदीपला अवगत आहे. पत्त्याच्या ट्रिक्स व त्याची हातचलाखी याचा कार्यक्रम सुरू झाला की वेळ कसा जातो ते समजत नाही. मांसाहार त्याला आवडतो. तो चवीने जेवतो आणि भरपूर जेवतो. अगदी माझ्यासारखाच !


**संदीप पाटील आणि रवी शास्त्री सुनील आणि कपिलदेवनंतरची भारतीय क्रिकेटची ही दोन आशास्थाने.**

**संदीप खेळाला निर्णायक कलाटणी देऊ शकतो.**

**तर रवी निर्णायक कलाटणी देणाऱ्या कोणालाही हुकमी साथ देऊ शकतो.**

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे दोन खेळाडू प्रथमच सांगत आहेत — त्यांच्या क्रिकेटजीवनाची कथा.**

## पटक आणि पटकार

लेखक : संदीप पाटील, रवी शास्त्री

मूल्य रुपये तीस

सवलत मूल्य रुपये पंचवीस

आदित्य प्रकाशन, मुंबई

प्रसिद्धी : १ जुलैच्या सुमारास

या मोसमातील कसोटी मालिकेत फ्लेचरच्या इंग्लिश संघाविरुद्ध सदीपच्या धावा झाल्या नाहीत त्यावर जाऊ नका तो एक धोकादायक फलंदाज आहे व सामन्यास केव्हाही कलाटणी देऊ शकतो दिलीपमध्येही फटकेबाजीची क्षमता आहे; पण बचावावर अधिक भर देण्याचे तंत्र त्याला कसोटी क्रिकेटने शिकविले आहे. निवड–समिती ही शतकांची दखल अधिक घेते हा धडा तो शिकला आहे· दिलीपचे बॅट–पॅडचे तंत्र त्यातूनच निर्माण झाले असावे असे मला वाटते.

सदीपला गाडी चालविणे किंवा खरे म्हणजे गाडी उडविणे आवडते. आजच्या भारतीय संघात ड्राइव्हिंगमध्ये तोच सर्वांत कुशल असावा. याबाबतीत त्याचा स्पर्धक आहे यशपाल शर्मा आणि यशपालचे काय विचारता? तो ट्रकही चालवितो. (आम्ही गंमतीने म्हणतो की, पंजाबमध्ये लुधियानात तो ट्रॅक्टरही चालवीत असेल) शर्माजी शुद्ध शाकाहारी आहेत; पण मला वाटते तरीही आमच्या सर्व संघात, अगदी कपिलपेक्षाही ते जास्त ताकदवान आहेत.

यशपालच्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यातील काही गमती मी ऐकल्या आणि त्यामुळे कोणालाही घाबरवून टाकण्याइतकी ताकद व रग त्याच्यात आहे याची खात्री पटली. ऑस्ट्रेलियात एकदा म्हणे त्याचा व टी. ई. श्रीनिवासन्‌चा खूपच वाद झाला कोणी कोणाचे ऐकेना। कोणी मागे हटेना. शेवटी यशपालने बाजूच्या एका पोलीस-अधिकाऱ्याचे पिस्तुल आणले व टी. ई. वर रोखले. टी. ई. ला मोठी मजा वाटली व तो हसू लागला; पण तरीही पिस्तुल त्याच्यावर रोखलेलेच होते. यशपालच्या डोळ्याची पापणी जरासुद्धा हलत नव्हती. तेवढ्यात कोणी तरी टी. ई. ला सांगितले की, पिस्तुल खरे आहे आणि भरलेले आहे, रिकामे नाही. टी ई. एकदम पांढरा फटफटीत पडला. तेव्हापासून तो यशपालपासून दहा फुटांवरच राहायचा.

संदीपची निवड मद्रास–कानपूर कसोटीसाठी झाली नाही, तेव्हा माझा रूम–पार्टनर होता सय्यद किरमाणी. त्याच्याइतका चांगला यष्टिरक्षक मी तरी पाहिलेला नाही. फिरकी माऱ्याला यष्टिरक्षण करण्यात इंग्लंडच्या बॉब टेलरपेक्षाही तो खचितच सरस आहे. 'किरी' लाही विनोदबुद्धी भरपूर आहे; पण त्याची शैली एकदम वेगळी!

उजवी-डावीकडे झेप टाकत किरी भराभर झेल टिपतो. त्यानंतर टाळ्यांचा कडकडाट होतो. एक फलंदाज परततो व दुसरा यायला निघतो दरम्यान खेळपट्टीवर एक छोटे नाटच रंगते आम्ही सारे किरीभोवती जमलेले असतो व त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असतो तरी आपल्या ग्लोव्ह्‌ज्‌च्या थैलीतून चेंडू उंच उडवीत हिंदी फिल्मच्या शैलीत, उर्दूमिश्रित हिंदीत किरी म्हणतो, 'एक और गया थैलेमे!' किंवा 'एक डाल दिया थैलेमे!'

## दिलीप दोशी

फिरकी मारा चालविणारे माझे ज्येष्ठ सहकारी दिलीप दोशी व शिवलाल यादव ही वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे आहेत. दिलीप हा इंग्लिश क्रिकेटमध्ये मुरलेल्या अस्सल व्यावसायिक क्रिकेटपटू आहे. आजच्या कसोटी क्रिकेटमध्ये तोच सर्वोत्तम डावखुरा स्पिनर आहे. डेरेक अंडरवुड हा एके काळी व विशेषत: त्याला हात देणाऱ्या खेळपट्ट्यांवर अतिशय प्रभावी गोलंदाज होता, याविषयी शंका घेण्यास जागा नाही; पण यंदाच्या मालिकेत तरी, उतारवयातील अंडरवुडचा आर्मर दिलीपच्या आर्मरइतका भेदक नव्हता.

शिवलाल यादव ऊर्फ शिव हाही दिलीप दोशीप्रमाणे आपल्या संघासाठी सतत प्रयत्नाची पराकाष्ठा करणार! फलंदाजीतील त्याच्या चिवटपणाने तर प्रतिपक्षास अनेकदा नाउमेद केले आहे. नक्कल करण्यात त्याचा हात कोणी धरू शकणार नाही. विशेषत: जावेद मियादादची नक्कल तो फारच झकास करतो. आम्हालाच काय पण स्वत: जावेदलाही ती नक्कल बघावीशी वाटते असे मी ऐकले आहे.

मदनलाल शर्मा हा असाच सतत धडपडत राहाणारा आणखी एक जिगरी खेळाडू. वयाची तिशी उलटली तरी मदन किती फिट आहे! – किती चपळ आहे! कसोटी क्रिकेटची गोष्टच सोडा; पण रणजी–दुलीप वा अगदी क्लब क्रिकेटमध्येही त्याच्या हातून झेल सुटल्याचे कधी ऐकले आहे का? मदनची विकेट मला जर कधी घेता आली तर मला फारच आनद होतो–कारण फिरकी मारा तो छानच खेळतो.

भारतीय संघात मदन पुनरागमन करीत असतानाच करसन घावरीसारखा तितकाच जिद्दी खेळाडू कसोटी-क्रिकेटबाहेर जात होता याचे मात्र दु:ख होत होते. कसोटी क्रिकेटमध्ये बळींचे शतक साजरे करणारा, कपिलखेरीज हा एकमेव भारतीय जलद गोलंदाज. न्यूझीलंड दौऱ्यात कडूभाईची मान धरली होती व तो पूर्णपणे फिट नव्हता; पण संदीपप्रमाणे तोही कधी आपल्या अडचणींची वा अपयशाची जाहीर वाच्यता करणार नाही व कोणाची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्नही करणार नाही,

कडूभाई कोणालाही मदत करण्यास नेहमीच पुढे असतो. रोहटकला हरयाणाविरुद्ध दिलीप वेंगसकरने गाजविलेल्या त्या सामन्यात माझ्याकडे चागली पॅडस् नव्हती कडूभाईने लगेच स्वत:ची पॅडस् मला दिली खोलीत त्याचा पसारा पडलेला असतो व शर्टही इकडे-तिकडे पडलेले असतात. एकदा मला त्याचा एक शर्ट फारच आवडला. 'कडू, वो शर्ट अच्छा है.' मी म्हणालो. लगेच कडूभाई म्हणाला, 'कौनसा? वो शर्ट? ले–ले.'

आजच्या भारतीय संघात नसलेला आणखी एक खेळाडू नवोदिताना नेहमी असेच प्रोत्साहन द्यायचा. तो म्हणजे चेतन चौहान. न्यूझीलडमध्ये अधूनमधून म्हणायचा, 'शाब्बास बेटे, छोडना मत.' आणि स्वत: इतका जिद्दी की, क्राइस्टचर्चच्या कसोटीत रिचर्ड हॅडलीचे उसळते चेंडू छातीवर आदळले तेव्हा त्याने चेस्ट–पॅड मागविले व तीन तास फलंदाजी केली.

भारतीय संघातून ज्याच्याबरोबर खेळण्याची संधी मला कधी मिळाली नाही; पण मुबईच्या संघात ज्यांचे मार्गदर्शन व आपुलकी मला नेहमी लाभली असे दोघे मोठे क्रिकेटर म्हणजे अशोक मांकड व एकनाथ सोलकर. मैदानात अशोक फार कडक असतो. दया-माया करीत नाही. सोलकर ऊर्फ एक्की मुंबईचे नेतृत्व करीत असताना अशोक आमच्याकडून भरपूर सराव करून घ्यायचा. धावायला लावायचा. फलंदाजी–गोलंदाजी करायला लावायचा. पुन्हा धावायला लावायचा; पण खेळ संपला की, अशोकचे किंवा 'काका'चे दुसरे रूप दिसायचे खेळकर, खोड्या काढणारे, फिरक्या घेणारे. एकच विनोद त्याच्याकडून पंचवीसदा ऐकला तरी तुम्हाला पचविसाव्यादाही हसायला येणारच. कारण काकाची शैलीच तशी आहे. दर वेळी तो परिस्थितीनुसार त्या विनोदाला वेगळा मिरची–मसाला लावणारच.

एक्की नेतृत्व करीत होता त्याआधीच्या मोसमात मुबईने त्याला कोठे सतत खेळविले होते? पण जणू काही एक्कीचा ओघ कोठेच तुटला नव्हता– इतक्या सफाईने फलंदाजी केली, गोलंदाजीत बदल केले, क्षेत्रव्यूह लावले व फलंदाजीचा क्रमही लावला. उपजत खेळाडू कसा असतो, हेच जणू त्याने आम्हाला दाखवून दिले. □

चित्रपट

# बाजार

## आव्हानात्मक विषयातील काव्यात्म तडजोड

रेखा देशपांडे

स्मगलिंग, काळा बाजारी, दरवडेखोरी, वेश्याव्यवसाय, हुंडापद्धती, जातीभेद, धार्मिक असहिष्णुता अशा अनेकानेक सामाजिक समस्यांवर धाड घालून आपल्या ' भव्य सामाजिक चित्रपट ' वाल्यांनी त्या समस्यांचा चावून चोथा करून टाकला आहे. आपल्या ग्लॅमर आणि ढिशुम ढिशुमच्या साच्यात ते त्या समस्यांना अगदी फिट्ट बसवून टाकतात. इलेक्ट्रॉनिक साधनांच्या सहाय्याने टॉर्चर करणाऱ्या हिंसक खलनायकांना स्मगलिंगचं कोंदण कसं छान शोभून दिसतं ! आणि ' औरत की मजबूरी ' दाखवायची असेल तर वेश्या आणि मुजरेवालीचा रोल छान असतो. शिवाय त्यात चमचमाट, ग्लॅमर असतं ते वेगळंच !

सामाजिक समस्याप्रधान विषयांच्या खजिन्यात आणखी एका अस्वस्थ करणाऱ्या सामाजिक समस्येची भर पडली आहे. हैद्राबादेत चालू असलेला गरीब मुस्लिम मुलींचा बाजार !

पेट्रोडॉलर्सच्या राशींवर खेळणाऱ्या अरबांचा, आखाती देशातील रहिवाश्यांचा प्रमुख षौक आहे तो भोगविलासाचा आणि त्यासाठी कोणताही विधिनिषेध न बाळगता लग्न करीत सुटण्याचा. नुकतीच एका मराठी दैनिकात ह्या अरबांच्या लग्नांची आकडेवारी प्रसिद्ध झाली होती. एका वेळी त्यांच्या आठ–आठ, नऊ–नऊ बायका असतात. मध्यपूर्वेतील त्या षौकीन नवऱ्या मुलां (?) च्या बायकांत ८० टक्के बायका भारतीय असतात. पैशाच्या जोरावर भारतातील गरीब मुस्लिम समाजातील अल्पवयीन मुलींशी निका लावायचा. रात्र किंवा रात्री भोगायच्या आणि त्या मुलीला आपल्या देशात नेऊन वेश्याव्यवसाय करायला भाग पाडायचं किंवा तिच्यासाठी पासपोर्ट–व्हिसा पाठवून देतो म्हणून सांगून स्वतः जे गायब व्हायचं ते पुन्हा कधीच तोंड न दाखविण्यासाठी. शारीरिक रूपानं भ्रष्ट झालेल्या, मानसिक रूपानं मोडलेल्या त्या मुलीचं उर्वरित आयुष्य मग दुबईत गेलं काय किंवा हैद्राबादेत–हिशोब एकच होतो. असे निका लावणाऱ्या दलालांची एक जातच निर्माण झाली आहे ह्या शहरात आता !

तर त्या ज्वलन्त विषयावर एखाद्या फॉर्म्युलेबाज धंदेवाईक निर्माता–दिग्दर्शकानं डल्ला मारण्यापूर्वीच निर्माता दि जय तलवार आणि दिग्दर्शक सरहदी या सुजाण द्वयीनं ' बाजार ' चित्रपट काढला – ही अतिशय समाधानाची बाब आहे.

आगळा–वेगळा ज्वलन्त विषय, प्रसंगांची रेखीव बांधणी, स्वाभाविक संवाद, त्या त्या प्रसंगांना उठाव आणणारी शायरी आणि संगीत आणि स्मिता, फारुख व सुप्रिया पाठकचा नितान्त सुंदर अभिनय–ह्या अलंकारांनी नटलाय सागर सरहदींच्या 'बाजार'. सुप्रिया ही तर ' कलियुग 'पेक्षा ' बाजार ' नंच चित्रपट माध्यमाला देऊ केलेली देणगी ठरावी. खरं तर हा चित्रपट एकीकडे नजमा (स्मिता) आणि दुसरीकडे शबनम (सुप्रिया) अशा प्रमुख दोन स्त्री–पात्रांनी समर्थपण तोललेला आहे. त्यातलं एक पात्र जरा कमकुवत ठरतं, तर कलाकृती पार कोसळते. स्मिताचा आवाका एव्हाना सर्वांच्याच परिचयाचा झाला आहे. त्यामुळं स्मिताचा अभिनय जणू आपण गृहीतच धरायला लागलो आहोत. त्याचमुळं सुप्रिया हीदेखील एक सुखद सुरुवात आहे हे जाणवतं ' बाजार ' मध्ये. स्वतः सुप्रियालादेखील हे ' बाजार ' मध्ये जाणवलं आहे. ती म्हणते, ' कलियुग '-मध्ये भूमिकेचा म्हणावा तसा ग्राफ माझ्याजवळ नव्हता. स्वतः विचार करून ठरवलेली सलग प्रक्रिया नव्हती. त्यात जे होतं ते प्रामुख्यानं श्यामबाबूंचं होतं. '

सागर सरहदींनी कलियुग पाहिला होता का ? प्रश्नाचं उत्तर देताना ती सांगते, ' मुळीच नाही. त्यांनी ना माझा ' कलियुग ' पाहिला होता, ना माझं एखादं नाटक. ते शबनमच्या भूमिकेसाठी मुलीच्या शोधात होते आणि शशि कपूरनी माझं नाव सुचवलं. सागरसाहेबांनी मला बोलावणं पाठवलं. त्या सुमाराला माझी तर शेवटच्या वर्षाच्या परीक्षेची तयारी चालली होती. मी सहजपणे त्यांना भेटले. त्यांनी मला ' बाजार 'ची कथा सांगितली आणि अगदी सहजगत्या म्हणून मी त्यांना माझ्या मनात उद्भवलेले प्रश्नही विचारले. शेवटी ते म्हणाले, ' तुझ्या डेट्स् कोणत्या देतेस ?' आणि मीही सांगितलं, ' सध्या माझी परीक्षा चालली आहे ' म्हणून. त्यावर ते माझ्या सोयीनं डेट्स् अॅडजस्ट करू लागले.

" पहिलंच दृश्य घेतलं सुलभा देशपांडेबरोबर. शबनम लग्नापूर्वी दर्ग्यात जायचं म्हणते ते. दृश्याचं चित्रीकरण झालं आणि सागरसाहेब प्रांजळपणे म्हणाले, ' मी स्वतः खरंच खूप नर्व्हस होतो. मनात येत होतं, ही मुलगी जर चांगली अभिनेत्री नाही निघाली तर...? –– तर साऱ्या चित्रपटाचीच वाट लागली असती! "

' बाजार 'च्या आपल्या भूमिकेमागे स्वतःचं असं चिंतन होतं हे ती अभिमानानं सांगते. ह्या भूमिकेचा एक ग्राफ तिनं तयार केलेला होता.

सुप्रियाच्या अभिनयाच्या दृष्टीनं साजिद (फारुख) बरोबरची पहिली प्रणयदृश्यं, आईबरोबरची तिची दृश्ये, दर्ग्यातील दृश्ये जेवढ्या उंचीवर पोहोचलेली वाटली, त्या मानानं लग्नापूर्वीची साजिदची अखेरची भेट सुप्रिया उत्कटतेने रंगवू शकली नाही, असे वाटत रहाते. सुप्रिया स्वतः तेवढ्याच दिलखुलासपणे ही गोष्ट मान्य करते आणि

स्वत.चं विश्लेषणही देते.

'खूप खूप रडल्यावर अशी एक वेळ येते की, माणूस रडायचा थाबतो. लहानपणी मी इतकी रडले होते की, प्रत्यक्षात माझे वडील गेले, तेव्हा मी रडलेच नाही! माझा हा अनुभव आहे. त्या अनुभवाच्या आधारावरच मी ह्या भूमिकेचा ग्राफ आखला होता. शबनम मनोमन ठरवून टाकते की, आता रडायचं नाही. ह्याच कारण–तिनं तिचा निर्णयही घेऊन टाकला आहे. साजिद शबनमच्या आई-वडिलांना जाब विचारायला येतो, तेव्हा बाहेरून त्याचा आवाज ऐकूनही ती रडत नाही. खरं तर लग्नात आणि पाठवणीच्या दृश्यातही रडणार नव्हते मी; पण इथे सागर-साहेबाच्या ग्राफशी माझा ग्राफ जुळला नाही आणि पाठवणीच्या दृश्यात सर्वांच्याच रडण्याचे सूर इतके मिसळून गेले होते की, नवरीमुलगी रडली काय, अगर न रडली काय! पण नंतरच्या ह्या रडण्यामुळे साजिदच्या शेवटच्या भेटीत शबनमचं कठपुतळीवत् होऊन राहणं खटकतं. भावनाच्या उत्कटतेत काही तरी कमतरता राहून गेल्यासारखी वाटते.'

## कथा

शबनम (सुप्रिया पाठक) आणि नजमा (स्मिता पाटील) हैद्राबादेतील गरीब मुस्लिम समाजातल्या ह्या दोन दुर्दैवी मुली. नजमाचं घराणं म्हणे एके काळच नबाबी घराण; पण आता दारिद्रचकळा आलेलं. ह्या नबाबी घराण्यात नोकरी करण म्हणे अप्रतिष्ठेचं लक्षण. म्हणून नजमानं कुणाला कळू न देता वेश्याव्यवसाय करून घर चालवावं असा सल्ला तिचीच आई देते. हे घरातले नबाबी थाटाचे निकम्मे लोक तिला कंगाल कवी सलीमला (नसीरुद्दीन) भेटूही देत नाहीत. ह्या नरकातून सुटण्यासाठी नजमा आपल्या मागावर सतत असणाऱ्या आणि लग्नाचं वचन देणाऱ्या अख्तर हुसेन (भरत कपूर) बरोबर पळून मुंबईला येते. अख्तर आखाती देशात असलेल्या आपल्या शाकिर अली नावाच्या प्रौढ दोस्ताच्या आशेवर असतो. लग्नाविना सहा वर्षं जातात. एकदा अख्तरची होऊन राहिल्यानंतर आपल्या प्रियकराशी–सलीमशी–लग्न करण्याचा नैतिक अधिकार आपण गमावून बसलो आहोत अशी नजमाची प्रामाणिक धारणा असते. शाकिर अली (बी. एल. चोपडा) येतो; पण अख्तर–नजमाची मदत करण्यापूर्वी स्वतःच्या लग्नाची खटपट करायला नजमाला सागतो. आता ह्या वयात शाकिर लग्न करणार–नजमाला आश्चर्य वाटतं, चीडही येते; पण अख्तरशी लग्न व्हायचं तर शाकिरसाठी मुलगी शोधणं भाग असतं. नजमा हैद्राबादला जाऊन शाकिरच्या पैशांच्या जोरावर एक गोड षोडशी ठरवून टाकते. ठरवून कसली टाकते–चक्क खरेदी करते! दुर्दैवाने ही गोड शबनम नजमाच्याच मानलेल्या भावाची–साजिद (फारुख शेख) ची प्रेयसी निघते. आपल्या हातून घडलेल्या गुन्ह्याची जाणीव होऊन नजमा सुन्न होते. लग्न मोडण्याचा निष्फळ प्रयत्न करते. अखेर लग्न होतं आणि पहिल्याच रात्री शबनमनं आत्महत्या केलेली आढळून येते. हैद्राबादेतला मुलीचा बाजार नजमाला उध्वस्त करतो. तिच्या असहाय अवस्थेची उरलीसुरली जाणीव तिला सलीम करून देतो ह्या सलीम (नसीरुद्दीन) शायर आहे. प्रखर विचाराचा; पण प्रत्यक्षात बोथट क्रियाशीलतेचा बुद्धिजीवी आहे. बोलणं सोप असतं, म्हणूनच तो नजमाला 'बाजारा'ची जाणीव करून देतो. अर्थात तेही वेळ निघून गेल्यावर. तो शाकिरची निर्भर्त्सना करतो तीही नशा केल्यावरच. प्रत्यक्षात मात्र शाकिरच्या वऱ्हाडाबरोबर तो असतोच. प्रत्यक्ष बंड करणं त्याला जमत नाही. थोडक्यात, सलीम म्हणजे माणसाचा नपुसक विवेक असतो म्हटलं तर खोटं ठरणार नाही.

## विषयाला शिताफीने बगल

वेळ निघून गेल्यानंतर आपल्या अपराधाच्या कबुलीजबाबासहित नजमा अख्तरबरोबरच्या सुखाला सोडून ह्या नपुंसक विवेकबुद्धीकडे निघून येते.

सुरुवातीसच नजमाची आई तिला सागते की, 'आपल्या नबाबी घराण्यात नोकरी करणं प्रतिष्ठेच मानलं जात नाही; पण शरीर विकून पैसे मिळवता येण शक्य आहे आणि ह्या कानाचं त्या कानालाही कळणार नाही.'–इथे वाटू लागतं, सागर सरहद्दीनी अतिशय 'बोल्डली' विषय हाताळायला सुरुवात केलेली आहे; पण जसजसं पुढं जावं तसतसं जाणवतं, ते ह्या वेगळ्या विषयाच्या आधारानं प्रेक्षकाना भावनाच्या कल्लोळात बुडवून टाकताहेत. निरागस प्रेम, अपेक्षाभंगाचं दुःख, निर्दय अत्याचार आणि अगतिकपणे आईवडिलांकडून होत असलेला अत्याचार, त्या अत्याचाराखाली भरडली जाणारी स्वप्नं, अजाणता हातून घडलेल्या गुन्ह्याची हृदय विदीर्ण करणारी जाणीव–अशा विविध भावभावनांच्या कल्लोळात प्रेक्षक साफ विसरून जातो की, प्रत्यक्ष विषयाला शिताफीनं बगल देऊन सागर सरहद्दीनी चित्रपट संपवला आहे.

शबनमच्या आत्महत्येबरोबर तिच्या कोवळ्या स्वप्निल जीवनाच्या शोकान्तिकेचं वाईट वाटत राहातं, हे खरं. तरीदेखील शबनमसारखी कळी पुढं वाढून ठेवलेल्या जिवंत मरणातून वाचली ह्या गोष्टीचा सूक्ष्म-सा आनद झाल्यावाचून रहात नाही हेही खरंच. एक उमलतं निरागस तारुण्य, त्याचं पावित्र्य, त्याची आरस्पानी स्वप्नं–सारं सार एका जीवघेण्या घाणेरड्या विटंबनेतून वाचलं, हे पाहून प्रेक्षक सुटकेचा नि.श्वास टाकतो. इथं आढळतं ते धंदेवाईक फॉर्म्युल्यात अडकलेल्या चित्रपटाशी सागर सरहद्दीच्या ह्या कथेचं सादृश्य. नायिकेचं पावित्र्य विटंबिलं जाण्यापूर्वीच तिनं मृत्यूला कवटाळणं आणि खलनायकानं चडफडत किंकर्तव्यमूढ बघत बसणं हा आपला आवडता फॉर्म्युला. वास्तवतेशी फटकून वागणारा. ह्या फॉर्म्युल्याने प्रेक्षकही खूष होतात की, कशी जिरली खलनायकाची! आणि नायिकेनं आपली प्रतिज्ञा खरी केली–'वरमाला एक नायकाला तरी घालेन नाही तर मृत्यूला कवटाळीन!'

इथे मला आठवते ती एम. एस. सथ्यूच्या 'गर्म हवा'मधली अमीना (गीता सिद्धार्थ) ची आत्महत्या. 'गर्म हवा'ची अमीना आणि 'बाजार'ची शबनम–दोघीच्या आत्महत्या अगदी वेगळ्या वेगळ्या परिस्थितीतल्या, वेगळ्या वेगळ्या कारणानी घडलेल्या; पण 'गर्म हवा'मध्ये आपला प्रियकर चुलतभाऊ काझिम मिर्झा (जमाल हाशमी) ह्याच्याशी विवाह होऊ न शकल्याच्या निराशेतून स्वत:ला कसंबसं सावरून अमीना प्रथम नकोशा वाटणाऱ्या; पण सतत पाठपुरावा करीत राहिलेल्या शमशाद (जलाल आगा) बरोबर लग्नाला तयार होते. तिची ही तडजोडच इतकी मानवीय आहे, केविलवाणी आहे की, त्यामुळेच शमशादचं लग्नही अचानक दुसरी-

कडेच ठरवलं गेल्याचं कळल्यानंतरचं तिचं वैफल्य, फसवणूक झाल्याचं दुःख आणखीच गहिरं होत जातं. स्वतःचा काहीएक दोष नसताना एकापाठोपाठ एक अशी दोन वैफल्यं तिच्या सहनशक्तीचा अंत पाहतात. त्यामुळंच तिची आत्महत्या काळजाला भिडते. तसाच काळजाला भिडतो तिच्या बापाचा शोक आणि आईचा आक्रोश !

'बाजार'मधली आत्महत्या पाहिल्यावर मनोमन सुटका झाल्याचं एक प्रकारचं समाधान लाभतं. गडावर अल्लाउद्दीन खिलजी पोहोचण्याअगोदर राणी पद्मिनीने केलेला जोहार आणि शत्रूच्या स्वाधीन होण्यापूर्वी मृत्यूच्या स्वाधीन होणारी रूपमती जशी आपल्याला भावते, तशी शबनमची आत्महत्या आपल्याला भावते ! तिची आणि साजिदची कुस्करली गेलेली स्वप्नं आपल्याला दुखावून जातात तरीही.

ह्या ज्वलंत समस्येला तेवढ्याच जळजळीतपणे सामोरे जाता जाता अचानक कानावर हात ठेवून आणि डोळे गच्च मिटून 'नको ते ! पहावत नाही ! !' असं म्हणण्यासारखंच आहे हे. आणि ह्या केविलवाण्या आक्रोशाचाही एक काव्यात्म परिणाम साधतोच की ! ही एक प्रकारची काव्यात्म तडजोडच नाही तर काय ? त्यामुळं ही आत्महत्या मनाला तशी भिडत नाही. भिडतो तो तिच्या मृत्यूच्या दृश्यानंतर येणाऱ्या क्षणिक दृश्यातला साजिदचा वेडा आक्रोश. ह्या चित्रपटात मनाला भिडणारे प्रसंग आहेत ते दर्ग्यात एकमेकांना अचानक पाहिल्यानंतर एकमेकांना भेटण्यासाठी होणारी साजिद आणि शबनमची तडफड. भिडतो तो साजिद शबनमच्या आई-वडिलांना जाब विचारायला येतो तेव्हाचा त्याचा आवेग. भिडते ती शबनमची केविलवाणी धडपड— नवऱ्यामुलीच्या पैंजणासाठी माप घ्यायला आई पुढे सरसावते तेव्हाची. आपल्याच मानलेल्या छोट्या भावाच्या प्रेयसीचाच आपण निर्दय बाजार मांडला हे कळताच नजमाच्या पोटात पडलेला खड्डा आपल्याही पोटात पडल्याविना रहात नाही. शाकिर अलीसाठी मुलगी पहायला गेलेली नजमा जेव्हा समोर मांडलेला असहाय्य गरीब मुलींचा बाजार पाहून घाबरते, पळत सुटते— तेव्हा तिची ती घबराट पाहून आपल्याही काळजाचा ठाव सुटतो.

नजमाचं सलीमकडे परत जाणं ही देखील एक प्रकारे काव्यात्म तडजोडच. म्हणजे एकदा आपला गुन्हा कबूल करून टाकला की, पापाचं ओझं कमी झालं, आता आपल्याला आपलं सुख निश्चितपणे चाखायला हरकत नाही— असंच म्हणायचं होतं जणू काही.

आणि ह्या तडजोडींमुळंच अखेर ह्या आव्हानात्मक विषयाची आणि त्यातल्या ट्रॅजेडीची धार बोथट होऊन जाते.

—रेखा देशपांडे

## बातम्या अशाही

### □ फुटपाथ की तुरुंग ?

बेकारीचा वाढत जाणारा प्रश्न दिवसेंदिवस जास्त कठीण होतोय आणि हे फक्त भारतापुरतंच मर्यादित नाहीये.

इंग्लंडमध्ये राहणारा अठरा वर्षांचा पॉल अ‍ॅन्ड्र्यू विल्यम हा तरुण मुलगा असाच बेकारीला वैतागला. घरात पटत नाही म्हणून बाहेर पडलेल्या पॉलला कुठेच नोकरी मिळेना. आधीचे साठवलेले पैसे जोपर्यंत जवळ होते तोपर्यंत लंडनमध्ये एका फ्लॅटमध्ये तो रहात असे; पण केव्हा तरी पैसे संपणारच. मग ती जागा सोडून तो नुसताच नोकरीच्या शोधात भटकायला लागला. मिळेल ते खायचं आणि असेल तिथं झोपायचं. खाण्यासाठीही पैसे लागतातच. एक वेळ अशी आली की, पॉलजवळ जेवायलाही पैसे शिल्लक राहिले नाहीत !

लंडनच्या नॅशनल गॅलरीत पॉल चित्रांचं प्रदर्शन बघायला गेला. 'द सन राइझिंग थ्रू व्हेपर' हे टर्नर या चित्रकारानं काढलेलं चित्र आणि 'द मॅरेज ऑफ आयझॅक अ‍ॅन्ड रेबेक्का' हे क्लॉडनं काढलेलं चित्र एकमेकांच्या बाजूलाच होती. बराच वेळ या सुंदर चित्रांकडे बघत पॉल उभा होता आणि अचानक खिशातून चाकू काढून पॉलनं एका चित्रावर वार केला. आजूबाजूच्या माणसांनी ते बघून आरडा-ओरडा करेपर्यंत दुसऱ्या चित्राचीही तीच गत झाली होती. या दोन फाटलेल्या चित्रांची किंमत साधारण साठ हजार पौंड म्हणजे जवळजवळ एक लाख अठ्ठावीस हजार रुपये इतकी होती.

पॉलने लगेच आपला गुन्हा कबूल केला. बेकारीनंतर त्याने पुन्हा घरी जायचा प्रयत्न केला; पण आई-वडिलांनी त्याला आपलं म्हटलं नाही. तेव्हा घरातून बाहेर पडताना तो एक चाकू घेऊनच निघाला होता. या चाकूच्या सहाय्याने कुठला तरी गुन्हा करायचा विचार मनाशी पक्का झाला होता. असा विचार करायचं कारण न्यायाधिशांनी खोदून खोदून विचारलं तेव्हा तो रडत रडत म्हणाला, 'अगदीच उपाशी मरण्यापेक्षा तुरुंगात जाणं मी पसंत केलं. इथे निदान दोन वेळच्या जेवणाची तरी चिंता नाही !'

एवढ्याशा पॉलचे हे शब्द ऐकून आणि त्याचं रडणं बघून न्यायाधिशांना त्याची दया आली आणि त्याला शिक्षा न करता त्याची रवानगी रिमांड होममध्ये झाली. दोन वर्षांनी तिथून बाहेर पडल्यावर मात्र पॉलपुढे पुन्हा तोच बेकारीचा प्रश्न आ वासून उभा रहाणार आहे.

### □ दारुडे ड्रायव्हर्स !

ट्रक चालवणारे ड्रायव्हर्स म्हटलं की, 'दारूने तर्र होऊन भरमसाठ वेगात चालवणारे' असं एक चित्र डोळ्यांसमोर उभं रहातं आणि ते अगदीच चुकीचं आहे असं नाही.

अमेरिकेतल्या एका संस्थेनं एक सर्व्हे घेतला, त्यातूनही हेच दिसून आलं. एकूण २,६५० माणसांची माहिती त्यांनी गोळा केली. यातले जवळजवळ पन्नास टक्के ड्रायव्हर्स दारू पिऊन गाडी चालवतात, असं उघडकीस आलं. अमेरिकेत शुद्धीत नसताना मोटार चालवणाऱ्याला पकडलं तर जबरदस्त दंड होतो. गंमत म्हणजे सर्व्हे घेतलेल्या नव्वद टक्के ड्रायव्हर्सनी असा दंड असलाच पाहिजे असं मत व्यक्त केलं.

जॉन हेम्फ्रील या माणसानं हा अभ्यास केला. मिळालेली माहिती बघून सुरुवातीला त्याला धक्काच बसला. हीच टक्केवारी जर सर्व अमेरिकेला लागू केली तर जॉन म्हणतो, 'गेल्या सहा महिन्यात एकोणचाळीस कोटी मोटारचालकांनी नशापाणी करून मोटर चालवलीये. (म्हणजे दर चार चालकांमागं एकानं.) त्यातल्या एकचतुर्थांश लोकांनी तीन वेगवेगळ्या प्रकारची दारू वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन नंतर प्रवास केला. याचा अर्थ २९ टक्के प्रवासी प्रवास करताना आपलं जीवन अशा दारू पिऊन चालवत असलेल्या मोटरचालकांच्या हाती सोपवतात.'

—मीना कर्णिक

# सर्चलाइट

# ची पटाख डमऽऽडम ऽ!!

काही काही विषयांबद्दल माणसाला वर्षानुवर्षे आकर्षण वाटत आलेले आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर भूतं–खेतं, चेटुक–जादुटोणा, देव आणि साक्षात्कार इ. या विषयांबरोबरच माणसाला काही कल्पनासुद्धा अशाच पिढ्यान पिढ्या साथ देत आल्या आहेत. गुप्त होणे किंवा उडणे ह्यासुद्धा त्यातल्याच कल्पना आहेत. मला तर वाटतं की प्रत्येक माणसाला कधी ना कधी अशा प्रकारच्या कल्पनांनी स्वप्नात गाठलेलं असेल. मलासुद्धा अनेकदा अदृश्य झाल्याची स्वप्न पडलेली आहेत. बहुतेक वेळेला मी अदृश्य होऊन कुठल्यातरी मित्राच्या घरी जात असे आणि त्याला आश्चर्यचकित करून टाकत असे किंवा वर्गामध्ये गृहपाठ चुकवला म्हणून मास्तर जेव्हा छडी उगारून अंगावर धावून येत. तेव्हा मी बघता, बघता लुप्त होत असे. त्या वेळी (माझ्या स्वप्नात) त्या सरांचा भुवया वर गेलेला आणि तोंडाचा चंबू झालेला चेहेरा बघून मी मोठ्यांदा हसत असे. एकूण काय तर माणसाला जे जे काही गूढ आहे त्याबद्दल प्रचंड आकर्षण आहे.

आता अशी कल्पना करा की, तुम्ही एका वैराण रस्त्यानं चालला आहात. रात्र फारशी अंधारी नाहिये आणि तुमचा मुडसुद्धा चांगला आहे. अशावेळी अचानक तुम्हाला तुमच्यापुढे एक काळी काळी वस्तु दिसली. तुम्ही बारकाइनं बघायच्या आतच ती चटकन सरळ वर गेली. तिचा आकार तुम्हाला तबकडीसारखा दिसला. नंतर ती अतिशय वेगाने क्षितिजाच्या दिशेने निघून गेली. तुम्ही तुमच्या घरी आलात ... तुमची काय परिस्थिती असेल ?

अहो, अशी परिस्थिती खरोखरीच एका कॅनेडियन सुताराची झाली होती. त्याचे नाव रॉबर्ट सुफर्न. घटना घडली १९७५ मध्ये. बरं नुसतं इतकंच असतं तर ठीक होतं; पण त्याला हे यान निघून गेल्यानंतर एक चार फूट उंचीची आकृती दिसली. तिचे खांदे ' फारच ' मोठे होते. म्हणजे सर्वसाधारण माणसाच्या प्रमाणापेक्षा बरेच मोठे होते. तिनं चकचकीत सूट आणि विजेच्या दिव्यासारखं दिसणारं हेलमेट घातलेले होते. ती आकृती वेगाने पळत कडेच्या कुंपणापर्यंत गेली आणि बघता बघता त्या कुंपणावरून उडी मारून अदृश्य झाली. आपल्या रॉबर्टच्या मते त्या आकृतीनं उडी मारली ती इतकी लिलया मारली की, जणु काही तिला काही वजनच नसावं ! दुसऱ्या दिवशी ही घटना सर्व गावात पसरली आणि नंतर स्थानिक वर्तमानपत्रातसुद्धा छापून आली.

इथपर्यंतच जर का घटना संपली असती तर ती इतर अनेक अशाच प्रकारच्या घटनांच्या ओळीत जाऊन बसली असती; परंतु ... ची पटाख डमऽऽममऽऽ ... इथेच गोष्ट एकदम वळण घेते.

या घटनेचा पुढला भाग सांगायच्या आधी मी काही गोष्टी स्पष्ट करतो. आत्तापर्यंत आपल्या लक्षात आलेच असेल की वरील अनुभव U. F. O. (Unidentified Flying Objects) संबंधी आहे. हा विषय इतके वेळा इतक्या ठिकाणी चर्चिला गेला आहे की, जवळजवळ प्रत्येकाला याविषयी काही तरी माहिती असते; परंतु वेगवेगळे अनुभव जमा होत असतात, वेगवेगळ्या घटना घडत असतात. असो –

तर UFO बद्दल थोडं सांगतो. आत्तापर्यंत ज्या काही UFO's दिसल्या आहेत त्या मुख्यत्वेकरून दोन प्रकारच्या. एक म्हणजे साधारणपणे ८ फूट व्यासाची तबकडीच्या आकाराची आणि दुसरी म्हणजे लांबट आकाराची (' सिगार 'च्या आकाराची) प्रचंड मोठी (साधारणपणे ९० ते १०० फूट लांबीची). चमकणारी वस्तु. जगामध्ये अनेक ठिकाणी, अनेक लोकांनी अशी तबकडी किंवा वस्तु पाहिल्याची वर्णने केली आहेत. यातले जवळजवळ प्रत्येक वर्णन हे गोष्टीचा एक विषय होऊ शकेल. कोलंबसालासुद्धा म्हणे अशाच तबकड्या दिसल्या होत्या. या तबकड्यांनी प्रथम कोलंबसाच्या जहाजांना फेऱ्या मारल्या,मग त्या एकदम समुद्रात लुप्त झाल्या ! नंतर त्या पुन्हा समुद्रातून बाहेर आल्या व आकाशात उंच जाऊन नाहीशा झाल्या !! असे U. F. Os पाहिलेल्यांची संख्या सध्या काही लक्षांच्या घरात जाईल.

याबाबत अजून एक उदाहरण उपलब्ध आहे. १९७३ मध्ये अमेरिकेत अनेक ठिकाणी अनेक UFOs एकाच वेळी दिसल्या आहेत. एखाद्या सैन्याची तुकडी ज्याप्रमाणे 'मार्चींग' करते त्याप्रमाणे या तबकड्यांनी अनेक शहरांवर ' मार्चींग ' केल्याचे अनेक लोकांनी पाहिले आहे. लाल आणि नारिंगी रंगाच्या किंवा हिरवा–निळा प्रकाश सोडणाऱ्या या तबकड्या बघण्यासाठी इतकी गर्दी झाली की, रस्त्यातली सर्व वाहतूकव्यवस्था कोलमडली.

याचप्रमाणे पण काही विचित्र अनुभव काही लोकांना आलेले आहेत. अनेकदा रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारी अचानक बंद पडल्या आहेत. त्यानंतर तबकड्या दिसल्या आहेत. या तबकड्या निघून गेल्यावर पुन्हा मोटारी चालू झाल्या आहेत. १९७५ मध्ये फ्लोरिडामध्ये तर सतत आठवडाभर UFO दिसल्याचे सांगितले जाते. एका गृहस्थाला एकदा असाच विचित्र अनुभव आला. तो रेडिओ ऐकत असताना अचानक रेडिओ बंद झाला म्हणून तो घराबाहेर गेला. तेव्हा त्याला त्याच्या डोक्यावर ७० ते ८० फूट मोठी तबकडी दिसली. तिच्या खिडक्यांमधून आतली यंत्रे आणि 'माणसे'(?) दिसली. एवढ्यात त्या तबकडीमधून एक प्रखर प्रकाशस्रोत त्याच्या अंगावर पडला आणि ती तबकडी निघून गेली.

परंतु त्या प्रकाशामुळे त्या माणसाच्या शरीराला म्हणे मुंग्या आल्या. नंतर काही दिवस एकामागे एक आजार झाले. पण गंमत अशी की, त्यानंतर त्याची प्रकृती एकदम सुधारली. इतकी की, त्याच्या टकलावर केस येऊ लागले !


असो. तर आता मी मूळची घटना पुढे सांगतो...तर जेव्हा प्रथम वर्णन केलेल्या वरील सुताराने, वरील घटना वर्तमानपत्रांना सांगितली तेव्हा त्याच्या सत्यतेचा पडताळा घेण्यासाठी म्हणा किंवा फॅड म्हणून म्हणा, अनेक लोकांनी त्याच्याकडे भेट दिली. परंतु नेहमीपेक्षा विचित्र घटना एक दिवस घडली. अचानकपणे त्याच्या घरी कॅनेडियन पोलिसची तीन माणसे उपटली त्यांनी रॉबर्टला संपूर्ण मेडिकल चेक अप करायला लावला. त्यानंतर त्यांनी रॉबर्टला अनेक

प्रश्न विचारले व त्याच्या अनेक प्रश्नाची अतिशय मोकळेपणाने उत्तरं दिली ! (हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. कारण, यापूर्वी कोणी अशी चर्चाच केलेली नाही.)

प्रथम या तिघानी रॉबर्टची माफी मागितली ! यामुळे रॉबर्टसाहेब चांगलेच चकित झाले. कारण UFO त्याच्या घराच्या हद्दीत उतरली म्हणून कॅनेडियन पोलिसखात्याच्या अधिकाऱ्याने त्याची माफी मागायचे काहीही कारण नव्हते. याबद्दल रॉबर्टने जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा त्याला असे उत्तर देण्यात आले की, 'अमेरिकन सरकारचा आणि या तबकडीतल्या लोकांचा 'एका वेगळ्या पातळीवर' (?) गेली अनेक वर्षे संबंध आहेत. रॉबर्टच्या घराबाहेर उतरलेली तबकडी ही बिघडलेली होती 'किंवा ती बिघडल्यामुळेच त्या ठिकाणी उतरवली होती.' याबद्दल जेव्हा रॉबर्टने आणखी खोलात जाऊन प्रश्न विचारले, तेव्हा त्याला असे कळले की, १९४३ साली अमेरिकेन नेव्हीने एक प्रयोग केला होता. तो फसला, परंतु त्याच वेळी या तबकडितल्या लोकांचा आणि अमेरिकन सरकारचा काही तरी संबंध आला...वगैरे...' हे पोलिसलोक रॉबर्टकडून कोणतीही गुप्ततेची शपथ न घेता निघून गेले. (ही शपथ घेण्याची तिकडे पद्धत आहे.) आहे की नाही गौडबंगाल ? परंतु हे रामायण नुसतं इथेच संपलेलं नाही. वरती वर्णन केलेल्या १९४३ सालचा प्रयोग म्हणजे आणखी एक गूढ आणि तितकाच विचित्र प्रकार आहे. एखाद्या रहस्यकथेप्रमाणे खरोखरच चमत्कारिक प्रकार म्हणावा लागेल. ची पटाख डमऽऽडमऽऽ...

विल्यम मूर नावाचा एक संशोधक लेखक अमेरिकेत आहे. त्याला वरील घटना प्रथम समजली. १९४३ साली अमेरिकन नौदलाने काय प्रयोग केला होता याची बरीच माहिती त्याने आधीच जमवली होती. चार्लस बेर्लिट्झ नावाचा अजूनएक लेखक आहे. या माणसाला ३० भाषा येतात म्हणे. 'बर्मूडा ट्रँगल' हे अतिप्रसिद्ध पुस्तक यानेच लिहिले आहे. तर हे लेखकद्वय एकत्र आले आणि त्यानी या प्रयोगावर एक पुस्तकच प्रसिद्ध केले.

१९४३ म्हणजे दुसऱ्या महायुद्धाचा काळ. अमेरिका संपूर्ण ताकदीनिशी या युद्धात १९४१ मध्येच उतरलेली होती. याच वेळेला अनेक शास्त्रज्ञ अनेक विषयाचा अभ्यास करत होते.




उडत्या तबकडीमधून प्रकाशस्रोत पडला आणि एका माणसाच्या टकलावर चक्क केस उगवू लागले !

अनेक नवीन शस्त्र, अस्त्रनिर्मितीचे प्रयोग चालू होते. त्यातच अणुबाँबचा एक प्रयोग होता. दुसरा प्रयोग होता मॅग्नेटिक लहरी निर्माण करून एखादे जहाज अदृश्य करायचा (किंवा तसे भासवायचा). या प्रयोगात स्वत: आइन्स्टाइन सहभागी झाला होता. त्याने अनेक सूत्रं बनवून दिली होती. काम कमालीच्या गुप्ततेनं चालले होते. कारण अर्थातच शत्रूला त्याचा थांगपत्ता लागू न देणे.

या प्रयोगासाठी एक विनाशिका निवडण्यात आली. या विनाशिकेवर एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत एक इलेक्ट्रोमॅग्नेट बसवण्यात आले. या मॅग्नेटचे वजनच कित्येक टनाचे होते. याला इलेक्ट्रिक जनरेटरने वीज पुरवठा करण्यात आला आणि 'रेझोनन्स'चे तत्त्व वापरून तसेच आइन्स्टाइनची 'युनिफाइड फिल्डथिअरी' वापरून हा प्रयोग करण्यात आला.

जर का एखाद्या वस्तूपासून निघणारे प्रकाशकिरण वक्रीभूत झाले तर त्यामुळे त्यांच्या मूळच्या मार्गातील (सरळ मार्गातील) व्यक्तीला ती वस्तू अदृश्य झाल्याचा भास होईल आणि नेमकं हेच तत्त्व या प्रयोगात वापरण्यात आले. परंतु...ची पटाख डमऽऽ डमऽऽ.. ऐनवेळेला काही भयंकरच अनुभव आले.

प्रयोग चालू झाल्यावर थोड्याच वेळात त्या बोटी भोवती हिरवट रंगाचे चमकणारे धुके जमले. नंतर ती बोट हळूहळू अदृश्य झाली. नुसतीच अदृश्य झाली नाही तर ती नॉर्फोक या कित्येक मैल अंतरावरच्या दुसऱ्या बंदरामध्ये अवतीर्ण झाली. तिथून पुन्हा अदृश्य झाली आणि ... ची पटाख डम ऽ ऽ डमऽऽ, पुन्हा मूळच्या जागी प्रगट झाली आतमधली सर्व माणसे 'इन्टॅक्ट' अदृष्य झाली परन्तु जेव्हा परत आली तेव्हा मात्र अनेक जण वेडे झाले होते, अनेकजण 'फ्रीझ' झाले होते. अनेकजण या प्रचंड इलेक्ट्रिक फिल्डमुळे मरणसुद्धा पावले.

आणि म्हणूनच हा प्रयोग याच ठिकाणी थांबवण्यात आला. मग हा प्रयोग पुढे का चालू केला नाही ? एवढे मोठे संशोधन इतके दिवस गुप्त का राहिले ?

रशिया, चीन यासारखे देश या विषयावर काहीच अभ्यास करत नाहीत का ? आइन्स्टाइनची युनिफाइड फिल्डथिअरी सर्वांना माहित नाही का? ...ची पटाख डमऽऽ डमऽऽ.. ची पटाख डमऽऽ डमऽऽ... ची पटाख ....□

MANOOS ( Marathi Weekly )    1.50 Paise    Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )


# तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास

'माणूस' साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी रुपये पन्नास आहे. या वर्गणीत दिवाळी अंक वर्गणीदारांना दिला जातो. शिवाय वर्षातून निघणारा एकाद-दुसरा विशेषांकही.

पोस्टाचे दर भरमसाठ वाढले आहेत.

वार्षिक वर्गणीदारांप्रित्यर्थ होणारा टपाल व इतर कार्यालयीन खर्च वाचविण्यासाठी तीन वर्षांची वर्गणी एकदम पाठवून सगळयांचाच त्रास थोडा कमी करणे शक्य आहे.

# सप्रेम भेट

आपण आपली वर्गणी संपेपर्यंत वाट न पाहता ३ वर्षांची वर्गणी चालू किंवा जुलै महिन्यातच पाठवणार असाल तर एक नवी कोरी करकरीत पुस्तकभेट आपल्याला आम्ही देऊ शकू.

# पटक आणि पटकार

**लेखक : संदीप पाटील**
**रवी शास्त्री**

**आदित्य प्रकाशन, मुंबई**

**किंमत : पंचवीस रुपये**

ही पुस्तकभेट पाठविण्याचा खर्च मात्र आम्ही करू शकणार नाही !

जून-जुलै महिन्यात ३ वर्षांची १५० रुपये वर्गणी भरणाऱ्यांनी वरील पुस्तक माणूस कार्यालयातून १ जुलै नंतर घेऊन जावे किंवा फक्त टपाल-पाठवणी खर्चाची व्ही. पी. केली जाईल, ती सोडवून घ्यावी.

## आपणास ही पुस्तकभेट नको असल्यास

## आपण सरळ एकशे पंचवीस रुपये पाठवा

तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास ही पंचवीस रुपयांची सूट आहे. ही सूट-सवलतही फक्त ३१ जुलैपर्यंत !

**साप्ताहिक माणूस १०२५ सदाशिव, पुणे ३०.**